म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ..... निबंध .....
सं. क्र. २८३७



REFBK-0023070

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

05 MAR 1981

18 MAR 1981

08 MAR 198

10 AUG

14 AUG 1983

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

सामाजिक विषयक लेख
शिक्षण
निबंध
२८३६.
२३०००
२४१९८९
संग्रह शास्त्र

शिक्षणाच्या दिशा

डॉ. भालचंद्र शंकर भणगे

REFBK-0023070

मॅजेस्टिक बुक स्टॉल

प्रकाशक
केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका,
मुंबई ४.

पहिली आवृत्ती
ऑक्टोबर १९७९

मुखपृष्ठ
जयंत ताडफळे

© भा. शं. भणगे

मुद्रक
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ३०

मूल्य : बारा रुपये

सहकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांस
स्नेहपूर्वक अर्पण

–भालचंद्र शंकर भणगे

१
गुरूची प्रतिमा

पुण्यात त्या काळात (१९४४–४६) एम्. ए. चे वर्ग ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होण्याची पद्धत नसावी. निदान अर्थशास्त्र–राज्यशास्त्र विषयांपुरते हे विधान खरे होते. त्या विधानास एकमेव अपवाद प्राध्यापक ध. रा. गाडगीळांचा ! गुरुवारी सकाळी आठ वाजता सर्व्हेट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या ग्रंथालयात त्यांचे व्याख्यान होई. आधल्या दिवशी ते मुंबईस रिझर्व्ह बँकेच्या बैठकीसाठी असत. तेथे उशीर झाला, तर रात्री प्रवास करून गुरुवारी सकाळी एम्. ए. च्या व्याख्यानासाठी गाडगीळ नेमाने हजर राहात. आठला पाच मिनिटे असताना पलिकडच्या कालव्याच्या बाजूने ते सायकलवरून येताना दिसत. पोशाखात कधी फरक पडला नाही, वेळेत कधी फरक पडला नाही. मोठ्या लांबट टेबलाच्या शेवटी उभे राहात. दोन्ही हातांची बोटे गुंतवून छातीवर धरलेली, मान थोडीशी खाली झुकलेली (त्यामुळे डोळे मिटल्यासारखे वाटत) अशा थाटात पुरा एक तास बोलत. जसे लिहीत, तसे बोलत. एक अक्षर इकडचे तिकडे नाही. स्पष्टीकरणासाठी पुनरुक्ती नाही. इंग्रजी लिहिताना इटॅलिक ठशात जे शब्द असतात (उदा., *inter alia, pari passu, per se*) ते बोलण्यातही असत. जणू ग्रंथच बोलतो आहे. ग्रंथातला पाठ संपतो आणि ग्रंथ बंद होतो. गाडगीळ त्यांच्या जागेवरून सरकतात आणि निघून जाताना दिसतात.

सुरुवातीस १०–१५ विद्यार्थी असत. प्राध्यापक आपल्याकडे पाहात नाहीत, ते फक्त आपल्या विचारात मग्न आहेत, असे पाहून १–२ विद्यार्थी पाय न वाजवता उठून जात. बाकीचे ऐकण्यात आणि लिहून घेण्यात खिळून बसत. आपण काही विशेष ऐकले, असे समाधान त्यांना वाटे (आणि फार थोर माणसांशी बोलावे, तसे गाडगीळ आम्हां विद्यार्थ्यांशी बोलले, त्याबद्दल स्वतःबद्दलही

विद्यार्थ्यांना समाधान असावे.)

विद्वत्ता, काटेकोर मांडणी, वक्तशीरपणा, आणि ह्या सर्वांतून व्यक्त होणारी कर्तव्याची जाणीव–यांचा सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर कायमचा ठसा उमटायचा. माझ्यानंतरचे दोन–तीन वर्षांतले विद्यार्थी पुढे माझे मित्र म्हणून भेटले, ते आणखी एक गोष्ट सांगत. गाडगीळ त्यांच्यामध्ये मिसळू लागले होते, त्यांची चौकशी करीत, त्यांच्याशी साधेही बोलत आणि हसतही. माझ्या मनावरचा ठसा मुख्यतः त्यांच्या 'रिगर'चा राहिला; नंतरच्या विद्यार्थ्यांमध्ये स्नेह अधिक आला असेल.

पुण्यात विद्यार्थ्यांना राहायला खोल्या मिळत नसत. मी प्रा. गाडगीळांकडे भीत भीत चौकशी केली, की मला गोखले इन्स्टिट्यूटच्या (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या) खोलीत राहता येईल का? अपेक्षित उत्तर आले: "विद्यार्थ्यांना ह्या खोल्या देण्याचा अजून नियम झाला नाही." नियमाच्या बाहेर जायचे नाही, हा आमच्या गुरूंचा बाणा! पुढे गाडगीळांनीच नियम बदलून घेतले असावे आणि विद्यार्थ्यांची सोय झाली.

गाडगीळांनी एकदा नियम मोडला होता, असे नंतर माझ्या लक्षात आले. तो फक्त × × या विद्यार्थ्याकरता. हा विद्यार्थी महार जातीचा असून भाऊराव पाटील यांच्या आवडत्या विद्यार्थ्यांपैकी होता–कदाचित तो त्यांच्या वसतिगृहातून आलेला असावा, त्यांच्या शब्दाने आलेला असावा. तोही एम्. ए. चा अभ्यास करत होता. त्यानेच माझी भाऊरावांशी ओळख करून दिली.

भाऊराव वारंवार गाडगीळांकडे येत. जाड शरीराचा, भरड आवाजाचा, जाड्या-भरड्या कपड्यांचा आणि वेडर दिसणारा हा माणूस कोण, असा मला प्रश्न होता. ह्या विद्यार्थ्याने सांगितले, की तो गाडगीळांचा मोठा स्नेही. गाडगीळांचा शुभ्र पांढरा पोशाख, त्यांचे वागणे–बोलणे यांवरून हे फार उंचावरून चालताहेत, असे माझे मत झाले होते. ते एकदा भाऊरावांच्या खांद्यावर हात टाकून पायऱ्या उतरताना दिसले. तेव्हा गाडगीळांच्याबद्दलचे माझ्या मनातले अंतर तुटले, असे वाटले.

मी नोकरीनिमित्त मुंबईस असताना मधून मधून गाडगीळांना तेथे भेटत असे. भेटण्याचे ठिकाण एकदम 'रिझर्व बँक ऑफ इंडिया.' मी पहिल्याने बँकेत शिरलो, तेव्हा तेथील कामाच्या आदराने नव्हे, पण इमारतीच्या भव्यपणाने आणि माणसांच्या रुबाबाने, मनात थोडी भीती वाटली. मुळापासून असल्या गोष्टींची भीती. परकेपणा. इंग्रजीत चौकशी करत गाडगीळांच्या खोलीत पोचलो. तेथे शेतकरी किंवा तसलेच कोणी बसलेले! एकाच्या हातात थैली आणि त्या थैलीतून केळी आणि फडकी डोकावत होती. हे लोक येथे पोचले!

त्यांना गाडगीळांनी नेले ! !

पुण्यात एक त्रैमासिक ('नवा महाराष्ट्र') निघे. कानेगावकरांचे. ते संपादक होते किंवा मुद्रक-मालक असतील. हे नियतकालिक जाडजूड असे, आणि गंभीर प्रकृतीचे (: वर्षातच बंद झाले). एका अंकात मी प्रा. गाडगीळांवर लेख लिहिला. त्या वेळी गाडगीळ सरकावर टीका करत आणि ते डावे असल्याबद्दल बोलले जाई. माझ्या लेखाचे सार असे : गाडगीळ केंब्रिज विद्यापीठातल्या मार्शल-पिगू संप्रदायातले असून, समाजवादी वगैरे काही नाहीत ! प्रा. रा. वि. ओतुरकर माझे लेख आस्थेने वाचीत आणि त्याविषयी उत्साहाने बोलत. त्यांनी त्याच उत्साहाने माझ्या टीकेचा गाडगीळांकडे उल्लेख केला. (ओतुरकरांनी मला सांगितल्याप्रमाणे) गाडगीळांनी नुसते स्मित केले आणि गाडगीळ एवढेच म्हणाले, "ठीक आहे. तो तरुण आहे. तो असे लिहायचाच. त्याने काळजीपूर्वक इतके वाचले आहे, त्याचाच आनंद."

एम्. ए. झाल्यावर एक-दोन वर्षांत पीएच्. डी. साठी नाव नोंदवू काय, असे विचारायला नानासाहेबांकडे (गाडगीळांचे घरगुती नाव) गेलो. त्यांचा सल्ला उफराटा ! "आणखी खूप वाचा, नंतर बघू. लेक्चरर म्हणून नाव झालं पाहिजे."

मध्ये बरीच वर्षे गेली. मी प्रिन्सिपल झालो होतो. गोखले इन्स्टिट्यूटचे रूप पार बदलले होते. पुण्यात नानासाहेबांना भेटायला जावे, तर गोरेसाहेब बसलेले दिसत ! एकदा ह्या साहेबांबरोबर त्यांनी मला चहासाठी नेले. माझी ओळख करून देताना सांगितले, "हे डॉक्टर भणगे !" साहेब गेल्यावर मी नाना-साहेबांना आठवण करून दिली, की मी पीएच् डी. झालो नाही. माझ्या बोलण्यात खंत असावी. नानासाहेब ममतेने म्हणाले: "कसली खंत पीएच्.डी. नसल्याची ? काय करायचे डिग्री घेऊन ?"

स्वातंत्र्याच्या आधी सरकारबद्दल दुरावा, इतकेच नव्हे तर तिरस्कार वाटणे साहजिक होते. स्वातंत्र्याच्यानंतरही दुरावा वाटू शकतो. सरकार म्हणजे सत्तेचे माध्यम, सरकार म्हणजे सत्तेचा विजय (म्हणून बुद्धीची, विवेकाची गळचेपी). सरकारच्या बाहेर राहून सत्तेवर अंकुश चालवला पाहिजे. ह्यापैकी प्रा. गाड-गीळांची भूमिका काय होती, ते मला कळले नाही. विद्वानांनी सत्तेपासून दूर राहिले पाहिजे, अशीही त्यांची, सरकारविरोधी नव्हे-पण विद्वानांविषयी, खास अपेक्षा असेल. मला एवढेच कळले, की गाडगीळांना सरकार ह्या संकल्पनेबद्दल दुरावा आहे. एकदा सरकारमध्ये शिरलेल्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांबद्दल ते रागाने सांगू लागले, "काय यांची शिक्षणक्षेत्राची निष्ठा ? ते अमकेतमके. सरकारी नोकरीची वाट पाहात होते. एका पायावर तयार !" तेथे दुसरे प्राध्यापक हजर होते, त्यांनी पुष्टी जोडली, "लंगडी घालत गेले !" ह्यावर

गाडगीळ संमतिदर्शक हसले.

माझे कोल्हापूरचे अडचणींतून वर आलेले काम त्यांनी पाहावे, असे मला फार वाटे. मी एक-दोनदा त्यांच्यापाशी बोललो. त्यांचे उत्तर असे : "तूही समारंभ साजरे करायला लागलास का? समारंभात वेळ फार जातो. तुझा वेळ घालवू नको; माझाही नको!" शेवटी एकदा, डॉ. वालचंद श्रीश्रीमाळांच्या कल्पनेने, गाडगीळ कोल्हापुरास आले. त्या वेळी ते नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाले होते. आवर्जून माझ्याकडे आले, व्याख्यान दिले. कोल्हापुरात इतर तीन-चार व्याख्याने झाली. माझ्याकडले व्याख्यान सर्वोत्तम झाले. व्याख्यान संपल्यानंतर त्यांनी विचारले, "×××कोठे दिसले नाहीत?" ते आजारी असल्याचे मी सांगितले. संध्याकाळी परत निघावयास त्यांना उशीर झाला. त्यांच्या निवास-स्थानी ते येतील आणि तेथून निघतील, म्हणून मी तेथे थांबून राहिलो. आल्यावर लगेच त्यांनी मला सांगितले : "××× आजारी आहेत, म्हणून त्यांना भेटून आलो!" दिवसभर व्याख्याने झाली होती. त्या संदर्भात ते मला म्हणाले, "समाधान वाटले तुझ्या कॉलेजमधल्या व्याख्यानाचे. इतर ठिकाणी माझा अगदीच मंत्री झाला, असे नाही ना वाटले?"

मी आता पन्नाशीच्या जवळ आलो. थोडेसे लेखन केले आहे. पंचवीस वर्षे अध्यापन केले, हे काही कमी नाही. आता एखादा गुरू मानायला हवा, असे नाही. असे असूनही बालपणापासून दोन-चार गुरूंची, आयुष्याच्या त्या त्या टप्प्यांत त्यांनी दिलेल्या संस्कारांमुळे, सदैव आठवण राहील. गाडगीळ त्यांच्यापैकी प्रमुख. ज्यांच्याकडे आदराने बघावे, ज्यांचा मोठेपणा सांगावा (उदा., एका 'फिस्कल कमिशन' पुढे गाडगीळ साक्ष द्यावयास गेले, तेव्हा अध्यक्ष अशोक चंदासकट सगळे कमिशन उभे राहिले!), आपले काही चुकले तर त्यांचे मत काय होईल अशा शंकेने ज्यांचा धाक वाटावा, असा हा गुरू आज नसावा त्याचे दुःख वाटते. पोकळी वाटते.

['साधना', १५ मे १९७१]

२
कॉलेज–जीवनाचा आदर्श

स्वातंत्र्योत्तर काळात, स्वातंत्र्यामुळे सबंध समाजच बदलला तसा विद्यार्थीही बदलला. समाजात स्वार्थ वाढला, आदराची भावना कमी झाली, निष्ठा पातळ झाल्या. थोड्या कष्टाने खूप मिळविता येते, हा विश्वास वाढला. उलटपक्षी समाजातील अभिसरण वाढले. आत्मविश्वास वाढला. खालच्या आर्थिक थरांमध्ये, व खेड्यांतून शहरात, लहान शहरांतून मोठ्या शहरात असे संचलन झाले. मागास आणि मध्यम जातींतील व्यक्तीही प्रतिष्ठा मिळवू लागल्या. सर्व थरांत शिक्षण वाढले. मागास आणि मध्यम जातींतील मुले मोठ्या संख्येने शिक्षण घेऊ लागली. इतकेच नव्हे, तर अनेक शिक्षणसंस्था ह्या जातींतील व्यक्तींनी कष्ट उपसून उभ्या केल्या. राजकीय सत्ता मध्यम जातींच्या हाती आली. खाण्यापिण्याच्या, चालचलणुकीच्या आणि करमणूक-चैनीच्या पद्धतींत वरिष्टपणा आला. समाजातील हे बदल विद्यार्थ्यांमध्ये किंवा नव्या विद्यार्थ्यांच्या रूपाने दिसू लागल्यास नवल नाही.

ह्या नव्या विद्यार्थ्यांची जुन्या विद्यार्थ्यांशी तुलना करून त्यांच्यामध्ये सरस कोण, हे ठरविण्यात अर्थ नाही. खरा प्रश्न असतो, तो असा की त्या त्या काळचा विद्यार्थी त्या त्या काळी मिळालेल्या संधीचा फायदा किती घेतो आणि त्या त्या काळाचे आव्हान किती यशस्वीपणे स्वीकारतो. विद्यार्थ्यांच्या मागील पिढ्यांनी ह्या बाबतीत काय केले त्याचा विचार करता येईल, तशी चालू पिढी ह्या बाबतीत काय करते ते पाहता येईल. दोन पिढ्यांची ही तुलना नसून प्रत्येक पिढीची तिच्या काळाशी ही तुलना आहे.

किती तरी जुने–नवे ग्रंथ मोठ्या ठिकाणी त्याचप्रमाणे लहान ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. त्यांचा उपयोग तोकडा पडतो. काय वाचावे, ह्याचाही विचार व्हावयास हवा. वृत्तपत्र आणि नियतकालिके ग्रंथवाचनाच्या बदली वाचली

जातात. वृत्तपत्रांतील आणि नियतकालिकांतील विचार, ग्रंथांतील अधिक खोल आणि टिकाऊ विचारांपेक्षा अधिक लोकप्रिय होतात ! ग्रंथालयात गर्दीने बसलेले ऋषिमुनी दीर्घायुषी आहेत. काही अमरही आहेत. चालू पिढी मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करते आणि स्वतःच वंचित राहते. राज्यशास्त्रातील मार्क्स, डायसे, ब्राईस, ग्रीन, लिंडसे, बार्कर, वेब, शॉ, लास्की, रॉय, जावडेकर ह्यांस कोणी विचारीत नाही. अर्थशास्त्रातले मिल, मार्शल, पिगू, केन्स, रानडे, दादाभाई नौरोजी ह्यांस कोण विचारतो ? पानोपानी चुका असलेली फालतू इंग्रजी आणि मराठी पाठ्य-पुस्तके मानाने मिरवितात–गांडुळांनी शेषाच्या ऐटीने मिरवावे, तशी. आमच्या विद्यार्थ्यांना हा फरक कळलाच नाही. त्यामुळे कॉलेजांतील भव्य ग्रंथागारे सलारजंग म्यूझियम ठरणार, की काय ?

जग क्षणाक्षणाला वेगाने बदलते आहे, म्हणून वृत्तपत्रे आणि रेडिओ यांचा उपयोग करून हे बदल जाणून घेतलेच पाहिजेत, पण या बदलाचा अर्थ लावायचा, ह्या बदलातच स्थैर्याचा शोध घ्यावयाचा, मानवी इतिहासाचा मागोवा घ्यावयाचा तर प्रगत ग्रंथांवाचून गत्यंतर नाही. कॉलेजमध्ये पाच–सहा वर्षे अध्यापन करीत असलेल्या एका गृहस्थांना मी परवा विचारले, "अलीकडे कोणती पुस्तके वाचली ?" त्यांचे उत्तर असे, की त्यांना सुरुवातीला वाचनाचा नाद खूप होता, पण नंतर त्यांच्या लक्षात आले, की विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या दृष्टीने त्यांचे (प्राध्यापकांचे) वाचन मुळीच उपयोगाचे नाही ! म्हणून त्यांनी वाचन सोडून दिले !! म्हणजे विद्यार्थ्यांप्रमाणे प्राध्यापकांनाहीं वाचनाची महती सांगण्याची आज पाळी आली आहे.

आजच्या परिस्थितीचे कोणी सामाजिक पायावर समर्थन करतात. त्यांचे म्हणणे असे, की आजचा विद्यार्थी मोठ्या संख्येने ब्राह्मणेतर समाजातला आहे. त्याला इतके आणि ह्या पद्धतीचे वाचन कसे झेपायचे ? तो ज्या कुटुंबामध्ये जन्माला आला, त्या कुटुंबाला शिक्षणाचा आधी संपर्क झालेला नाही. तो ज्या ग्रामीण भागातील शाळेत शिकतो, तेथील तयारी पुरेशी नसते. थोडक्यात असे, की आजच्या विद्यार्थ्याकडून अधिक वाचनाची अपेक्षा करणे म्हणजे ब्राह्मणेतर समाजांना ब्राह्मणांच्या बरोबर लेखून ब्राह्मणेतरांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणे होय, आणि ब्राह्मणेतर वर्गावर अन्याय करणे होय. ब्राह्मणेतर वर्गाचे हे समर्थन कितीही चांगल्या हेतूने केलेले असो, ते चुकीच्या पायावर आधारलेले आणि ब्राह्मणेतरांवर अन्याय करणारे आहे, असे माझे मत बनले आहे.

माझी कारणे सांगतो. ब्राह्मण कुटुंबात आधीच्या पिढीमध्ये शिक्षण झाले असले तरी त्याचा फायदा चालू पिढ्यांना फारसा मिळतो, असे नाही. भाषेचे, जुन्या वाङ्मयाचे (उदा., महाभारत) आणि काही शिष्टाचारांचे ज्ञान यापलीकडे

ब्राह्मण कुटुंबातील मुलांना ब्राह्मण म्हणून अधिक फायदा मिळत नाही. आजचे ज्ञान हे पाश्चिमात्य असून ते जसे नवे आहे, तसेच ते मिळविण्याची पद्धतीही नवी आहे. हे ज्ञान ब्राह्मणास ब्राह्मणेतरांइतकेच परके आहे. तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, गणित, कायदा हे विषय ब्राह्मण कुटुंबातील मुलास परंपरेने मिळतात असे समजणे सत्यास धरून नाही. दुसरे असे, की ह्या कुटुंबात मुलांना घरी शिकविण्याची काही खास सोय असते असेही फारसे आढळत नाही. मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात सर्व जाती जवळजवळ सारख्या प्रमाणात दोषी आहेत. सुविद्य आईबाप स्वतःच्या कामात किंवा मिजाशीत असतात आणि मुलांचा भार सर्वस्वी शिक्षकावर टाकतात. तिसरी गोष्ट अशी, की ग्रामीण भागातील शाळाही अलीकडे थोड्याफार सामग्रीने आणि शिक्षकांनी सज्ज आहेत. गेल्या पिढीतील शहरी शाळा आणि आजच्या पिढीतील ग्रामीण शाळा ह्यांमध्ये सामग्रीचा फारसा फरक आहे असे नाही. शिक्षकांच्या उपलब्धतेचा फरक आहे; पण तोही ग्रामीण शिक्षक आणि विद्यार्थी अधिक कष्ट करून आणि अधिक निष्ठेने भरून काढण्याइतकाच आहे. उलटपक्षी, ग्रामीण शाळा-कॉलेजांतील आणि मध्यम मागास जातींतील मुले उच्च यश संपादन करीत असल्याची असंख्य उदाहरणे आहेत. शिकलेले आईबाप आपल्यासारखे मुलांनी शिकावे अशा ईर्ष्येने प्रयत्न करतात, तर न शिकलेले आईबाप आपण शिकलो नसलो तरी मुलांनी शिकले पाहिजे या ईर्ष्येने भगीरथ प्रयत्न करतात.

बहुजनसमाजाच्या विद्यार्थ्यांस अमूक दर्जा पेलणार नाही, असे गृहीत धरणे आणि कमदर्ज्याचे समर्थन करणे ह्यांत दिशाभूल आहे. समाजाचे दुर्दैव असे, की काही वरिष्ठ वर्गांतील लोक हे गृहीतकृत्य घेतात, त्याचप्रमाणे एरव्ही कनिष्ठ वर्गाचा पराक्रम सांगणारे कनिष्ठ वर्गाचे पुढारीही शिक्षणाच्या दर्ज्याचा प्रश्न आला म्हणजे कमकुवतपणाचे समर्थन करतात. दुर्दैव ! दुसरे काय म्हणावे ? कोणाचाही तसा हेतू नसताना परिणाम मात्र असा होतो की विद्यार्थी काळाच्या मानाने मागे राहतो. हे माझे दुःख.

विद्यार्थ्यांना आणि त्यांचे भवितव्य ठरविणाऱ्या वरिष्ठांना येथे असा प्रश्न विचारावासा वाटतो, की ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद चालू असताना जग पुढे चालले आहे त्याचे काय ? ह्या लेखाच्या आरंभी मी म्हटल्याप्रमाणे नव्या काळाच्या संदर्भात आपला विद्यार्थी किती यशस्वी होतो ते ठरवावयाचे असते. आमच्या समाजातील अंतर्गत पुढारलेले–मध्यम–मागासलेले ह्या भेदांमुळे सबंध समाजाची चाल मंद ठेवली, तर त्या समाजाचे काय व्हावयाचे ? जगाला आम्ही एक समाज म्हणून काय उत्तर देणार ? मंद गतीची तरफदारी करण्यापेक्षा कष्टाची पराकाष्ठा करून गती वाढविण्यात समाजाचा पुरुषार्थ आहे. मध्यम–मागास वर्गांनी कष्ट

करण्यात पुढेच असले पाहिजे. त्यांनी 'चालू नको मंद' असा बाणा ठेवला पाहिजे. (काळाचे आणि ह्या काळातील विज्ञानाचे आव्हान कोणत्याही वर्गास किंवा समाजास चुकविता येणार नाही.)

आजच्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणी मोठ्या असून, भोवतालचे वातावरणही नाउमेदीचे असूनही हा विद्यार्थी उत्साहाने वावरतो. जेथे राहतो, तेथे रस्त्यातून चालताना, बसमधून जाताना आणि कॉलेजमध्ये उत्साहाच्या भरात मोठ्याने बोलतो, गमतीने बोलतो, चेष्टाही करतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याचे वय आणि दुसरे कारण म्हणजे आपण काही नवे जगतो, ही भावना. ही भावना फार महत्त्वाची आहे. कॉलेजमध्ये जावयाचे किंवा जातो ह्या भावनेने मुलेमुली थरारून जातात. कॉलेजमधील वर्षे हाच आयुष्यातला सर्वोत उत्तम काळ, हे त्यांना माहीत असते–फक्त पुरेसे माहीत नसते, असे माझे मत झाले आहे. त्यांचा उत्साह वर्षारंभी जिमखाना निवडणुकीत आणि वर्षाअखेर स्नेहसंमेलनात केंद्रित असतो. ह्या दोन टोकांच्यामध्ये बहुसंख्य विद्यार्थी कॉलेजच्या कार्यक्रमाबद्दल उदासीनच राहतात, ही केवढी मोठी चूक आज होते आहे. वर्षभर अनास्था ठेवल्यामुळे निवडणुकीत आणि स्नेहसंमेलनात उत्साहाला अतिरेकी स्वरूप प्राप्त होते. ह्या अनास्थेमुळे कॉलेजचे मधले कार्यक्रम फिके पडतात, कॉलेज नीरस वाटते आणि बरीच मुले कॉलेजच्या बाहेरच्या केंद्रांकडे वळतात. ही केंद्रे म्हणजे शिकवणीचे वर्ग असतील, विद्यार्थी संघटना असतील, सिनेमागृहे असतील किंवा रस्त्याचे कोपरेही असतील ! विद्यार्थी रस्त्यात येतात, ते असे. कॉलेजमधील लहानशा प्रश्नावर आणि देशातील त्यांच्याशी संबंध नसणाऱ्या प्रश्नावर विद्यार्थी संप पुकारतात. त्याचे एक कारण असे की कॉलेजातील नीरसतेमध्ये तेवढाच रंग भरतो.

विद्यार्थ्यांचा सर्वांत मोठा तोटा असतो तो असा, की कॉलेज-जीवन ज्या खऱ्या अर्थाने जगावयास हवे तो अर्थ त्याला नुसता स्पर्श करून जातो. तो अर्थ असा, की कॉलेजचे जीवन हे एक समाजजीवन आहे आणि ते जगण्याचा आगळा आनंद आहे. आणि ते जगण्यात त्याचे व्यक्तिमत्त्व नितळ आणि समृद्ध बनते. इंग्लंडमध्ये अलिकडच्या काळात जो महत्त्वाचा शैक्षणिक अहवाल (रॉबिन्स कमिटी रिपोर्ट) तयार करण्यात आला, त्यात म्हटले आहे, " Instituions of higher education are not merely places of instruction. They are communities. " या नव्या समाजात कुठून कुठून आलेली अनेक जातींची, धर्मांची, भाषांची मुले आहेत. बाहेरचा बहुरंगी समाज येथे कॉलेजच्या आवारात अवतीर्ण झालेला असतो. ह्या नव्या समाजात नवा उत्साह आहे, नवी जिद्द आहे, नव्या प्रेरणाही आहेत.

बाहेर जी एकी नाही, म्हणून मन कष्टी होते आणि देशाची हानी होते, ती एकी येथे दिसली पाहिजे. एकात्मता येथे अंगवळणी पडल्यावर विद्यार्थ्यांनी ती नागरिक म्हणून बाहेरच्या समाजात न्यावयाची आहे. उलट, बाहेरच्या समाजातील जाती-धर्माची-भाषेची फुटीरता येथे आणणे, नैराश्य आणि वैर येथे आणणे हे विद्यार्थी म्हणून लांछनास्पद समजले पाहिजे.

कॉलेजच्या ह्या नव्या समाजात विद्यार्थ्याने दर दिवशी अधिकाधिक वेळ काढला पाहिजे. कॉलेजचे तास संपले, म्हणजे कॉलेजचे आवार कसे भयाण वाटते ! तेथे विद्यार्थी नसतातच मुळी ! त्याऐवजी कॉलेजमध्ये अनेक कार्यक्रम आहेत; वाचन, लेखन, खेळ, वादविवाद, मनोरंजन, गप्पाटप्पा, (बागेत फिरणे-सुद्धा). त्यात विद्यार्थी उत्साह दाखवीत आहेत, असे चित्र दिसले पाहिजे. ह्या कार्यक्रमांतून, उत्साहातून आणि उपक्रमशीलतेतून विद्यार्थ्यांचे शील आणि व्यक्तिमत्त्व घडणार आहे, समृद्ध होणार आहे. फुटीरता झडणार आहे. त्यांचे मन स्नेहाने आणि एकात्मतेने भरणार आहे. ह्या लहान समाजाची आठवण आयुष्यभर काढावी आणि सुख मानावे. बाहेरचा मोठा समाज ह्या लहान समाजाच्या आदर्शाप्रमाणे निर्माण करावा, असे वाटावे.

[' बियॉंड फ्रेंडशिप ', जानेवारी १९७१, पुणे]

३

"तू येथे काय मिळविलेस ?"

दरवर्षी शेकडो विद्यार्थी माझ्या डोळ्यांदेखत कॉलेजमध्ये प्रवेश करतात. त्यानंतर पुढील चार वर्षांत, नापास झाल्यामुळे किंवा दुसऱ्या काही कारणाने गळती लागून, थोडेसे पदवी घेऊन, बाहेर जातात. मध्येच कॉलेज सोडून जाणारा किंवा पदवी घेऊन जाणारा विद्यार्थी मला भेटावयास येतो आणि तो परत जाताना माझ्या मनाला एक प्रकारची हुरहूर वाटते. मनात विचार येतो, 'हा विद्यार्थी येथून जाताना बरोबर काय नेत आहे ? त्याने येथे काय मिळविले ? त्याला आम्ही काय दिले ?' जाणारे विद्यार्थी काही उत्साहाने जातात, तर बरेचसे नाराज असतात. आपण काय मिळविले, असा प्रश्न त्यांच्यापुढे असेल का ? येणारे विद्यार्थी बरेचसे उत्साहाने येतात. १६–१८ वर्षे वयातील त्यांचा उत्साह निसर्गदत्त असतो, तसा तो नव्याच्या अपेक्षेमधूनही आलेला असतो. त्यांची नव्याची अपेक्षा म्हणजे तरी काय असते ? त्या अपेक्षेप्रमाणे त्यांचा प्रयत्न असतो, की अपेक्षा आपोआप पुऱ्या व्हावयास हव्या, असे तो मानतो ? मी अडीच तपे ह्या मुलांच्या सान्निध्यात आहे, पण कॉलेज–संघटनेच्या चौकटीत, माझा ठरलेला विषय शिकविण्याच्या चाकोरीत, तथाकथित 'एक्स्ट्रा-करिक्युलर' कार्याच्या उपचारपद्धतीत वरील प्रश्नांची उत्तरे मला त्यांच्याकडून कधी मिळाली नाहीत. मी कोल्हापूरला असताना कॉलेजच्या आवारात मध्यभागी एक प्रचंड वटवृक्ष शंभर वर्षे उभा होता, त्याचा दाखला देऊन म्हणत असे, की माझी भूमिका ह्या वृक्षासारखी होणार काय ?—केवळ अनेक वर्षांचा साक्षी; त्याच्याशी संवाद काही नाही.

मुलांचे मनोगत जाणले नाही; पण त्यांच्याबद्दल किंवा त्यांच्या शिक्षणाबद्दल माझ्या अपेक्षा काय ते मी मधूनमधून सांगितले. किंबहुना, माझी शिक्षक म्हणून जी भूमिका मी माझ्याशी स्पष्ट करून घेण्याचा प्रयत्न करतो त्यात विद्यार्थ्यांच्या

शिक्षणाचे उद्दिष्ट मला मांडून पाहायलाच हवे.

कॉलेज म्हणजे शाळेचा विस्तार नव्हे. कॉलेजमध्ये जावयाचे म्हणजे मोठे स्थित्यंतर व्हावयाचे, असे विद्यार्थ्यांना वाटते, त्यांच्या पालकांनाही वाटते, पण प्रत्यक्षात मुलांचे वागणे पाहिले म्हणजे वाटते, की त्यांची शाळा कधीच सुटत नाही. शाळेचे शिक्षण आणि कॉलेजचे शिक्षण ह्यांत प्रकाराचा भेद आहे, हे कधी कोणी ह्या विद्यार्थ्यांना सांगत नाही, त्यांच्या उदाहरणावरून विद्यार्थ्यांना उमगत नाही, की विद्यार्थीही कळून घेत नाहीत. शाळेचे शिक्षण अभ्यासक्रमाला संपूर्णपणे बांधलेले, शिक्षकांनी तपशीलवार करून घेतलेले, शिस्तीच्या आकृतिबंधाने लादलेले. उलट, कॉलेजशिक्षण विद्यार्थ्यांनी स्वतः घ्यावयाचे आणि त्याची शिस्त विद्यार्थ्यांनी स्वतः म्हणून तयार करावयाची. प्राध्यापक किमान शिकवितात, प्राध्यापकांनी जे (किमान) शिकवायचे, त्यात मार्गदर्शन असले पाहिजे आणि विद्यार्थ्याला प्रेरणा दिली पाहिजे, असेही घडत नाही. विद्यार्थी अध्यापकाने दिलेले किमान घेतो आणि त्यावर परीक्षेस बसतो; त्यावर केव्हा उत्तीर्ण होतो, तर केव्हा अनुत्तीर्ण राहतो. तेही किमान त्याच्या पदरी पडले नाही, तर 'क्लास'ला जातो. स्वतः वाचतो तेही किमान असते. वाचनाचा विस्तार नाही; वाचनाची खोली नाही. विविधता नाहीच नाही. वाचनाची सवय नाहीच. परीक्षेला, अभ्यासक्रमाला जखडलेले हे शिक्षण म्हणजे झाडाच्या बुंध्याला साल चिकटलेली असावी–तीही जीर्ण असावी, तसला प्रकार होय. सबंध झाडाचा जिवंतपणा, रसरशीतपणा, वाढीची गती, फुले–फळे हे ऐश्वर्य काही काही नाही. शास्त्राच्या आणि व्यापाराच्या विद्यार्थ्याला वाङ्मयाची ओळख नाही, इतिहासाची माहिती नाही, घटनाशास्त्राची जरुरी नाही ! वाङ्मयाच्या विद्यार्थ्याला तरी पाठ्य–पुस्तकाच्या बाहेर ह्या विषयांची कुठे गोडी असते ? रसाला, आनंदाला हे सगळे विद्यार्थी पहिल्यापासून पारखे झालेले असतात. हमाल हातगाडीवर मोडतोड आणि जुनेपुराणे सामान घालून ती गाडी लोटीत नेतो, तसे विद्यार्थी परीक्षेसाठी राबतात. कॉलेजमधले शिक्षण असे नसावे.

काही विद्यार्थ्यांना वरची श्रेणी मिळते, काही विद्यार्थी वक्ते म्हणून किंवा लेखक म्हणून पुढे येतात. त्यांनी खरे पाहता काय वाचलेले असते ? वाचनाचा आनंद काय अनुभवलेला असतो ? प्रथम श्रेणीच्या विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तके घोटण्याच्या नीरस कामात लक्ष गुंतवण्याची चिकाटी असते, परीक्षेत लिहिण्याची कला असते आणि वक्त्यात आणि लेखकात एक वेगळे कसब असते. बाकी इतर विद्यार्थ्यांसारखे हेही विद्यार्थी. फरक अंशात्मक असतो.

सत्याच्या शोधात निघावे, असे मी म्हणालो तर विद्यार्थ्यांना हे काही भलतेसलते वाटेल. होय, विद्यापीठ-शिक्षणाचे खरे ध्येय हेच असते. प्राध्यापकांनी

आणि विद्यार्थ्यांनी एकेकट्याने किंवा एकत्रित सत्याच्या शोधात निघावयाचे असते. आपल्याकडची विद्यापीठे आणि कॉलेजे कधी सत्यान्वेषणाची स्थले नव्हतीच. ह्यापुढेही मला त्याची शक्यता किमपि दिसत नाही. म्हणून मी नुसता 'कॉम्प्रोमाईज फॉर्म्युला' देतो : विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात व्याप्ती आणि खोली असावी, त्यांनी इतर वाचनही खूप करावे. तरच हे कॉलेजचे शिक्षण; तरच ते आनंददायी. नाही तर ते हातगाडी ओढण्यासारखे कंटाळवाणे.

मी कधी परदेशात गेलो नाही, तेथील विद्यापीठे पाहिली नाहीत. तेथील विद्यापीठांविषयी आणि विद्यार्थ्यांविषयी वाचतो आणि त्यांच्या तुलनेने आम्ही कोठेच नाही, याची खंत वाटते. तेथील विद्यार्थ्यांच्या बंडासंबंधी आपण बातम्या वाचतो, चित्रे पाहतो. ही बंडे सोडून नित्याच्या व्यवहाराकडे वळलो, तर त्या विद्यार्थ्यांचा हेवा वाटतो. काही वर्षांपूर्वी माझा एक स्नेही परदेशात शिकावयास गेला आणि तो परत आल्यावर मी पाहिले, की तो अगदी बदलून गेला होता. त्याने खूप वाचले होते, त्याच्या वाचनाला-विचाराला-प्रतिपादनाला निश्चित वळण होते. त्याने आपले अनुभव सांगताना सांगितले, की 'दे मेक ए मॅन आउट ऑफ यू.' 'दे' म्हणजे ती विद्यापीठे, ते प्राध्यापक इ. अर्थात हे सर्व विद्यापीठांविषयी किंवा प्राध्यापकांविषयी म्हणता यावयाचे नाही, आणि सर्व विद्यार्थ्यांवर हे संस्कार होतील, असेही नाही. पण वरील वर्णनाच्या जवळपास येऊ शकेल, अशी परिस्थिती आमच्याकडे चुकून तरी आढळेल काय ?

रसेलने त्याचे केंब्रिज विद्यापीठातील विद्यार्थिदशेतले अनुभव सांगितले आहेत. 'मंतरलेले दिवस' असे वर्णन करावे, असा त्याचा हा विद्यार्थिदशेतला काळ वाटतो. एका थोर प्राध्यापकाने त्याला दिलेली शाबासकी, प्राध्यापकांची वर्णने, बरोबरच्या विद्यार्थ्यांची वर्णने, त्याची स्वतःची तयारी... ह्या सर्व गोष्टी वाचताना वाचक भारावून जातो. त्याच्यापेक्षा थोडा तरुण असा विद्यार्थी (पुढे जगभर ख्यातनाम झालेला) जॉन मेनार्ड केन्स ह्याच्या बुद्धिमत्तेचे, वादकौशल्याचे रसेलने वर्णन केले आहे. "When I argued with him, I felt that I took my life in my hands and I seldom emerged without feeling something of a fool." हार्वर्ड विद्यापीठात जोसेफ शुंपीटर नावाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांच्या विद्यार्थ्यांपैकी एक प्रसिद्ध मार्क्सवादी-पॉल स्वीझी. शुंपीटरच्या एका पुस्तकाला, शुंपीटरच्या निधनानंतरच्या आवृत्तीला, स्वीझी यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तीत हा विद्यार्थी गुरूच्या संस्कारांचा उल्लेख करतो. तो वाचीत असताना, असा शिक्षक इथे नाही आणि असा विद्यार्थी इथे नाही ह्याचे मनस्वी दुःख वाटते. तुलनेने वाटते, की विद्यार्थी म्हणून आणि शिक्षक म्हणून आमचे आयुष्य नुसते वाया जात आहे !

विद्यार्थ्यांनी वाचनाचा आणि चांगल्या विचारवंतांची व्याख्याने ऐकण्याचा सपाटा लावला पाहिजे. व्याख्याने दुर्मीळ असली, तरी पुस्तके दुर्मीळ नाहीत. पुस्तकेही दुर्मीळ असली, तर विद्यार्थ्यांनी संपावर जावे आणि पुस्तके आणवून घ्यावी ! काय काय वाचावे ? आरंभी आवडेल ते वाचावे आणि नंतर निवडून वाचावे. वाचावयाचे असे ठरविल्यावर आणि ग्रंथालयात पाय ठेवल्यावर काय वाचावे, असा प्रश्न बहुधा पडत नाही. काय वाचायचे, ते डोळ्यांपुढे दिसते. एक वाचून, दुसरे वाचायचे सुचते. परीक्षेसाठी वाचायचे, तर तसे वाचावे. इतर वाचायचे म्हटले तर किती अफाट पुस्तके वाचायची आहेत. अधिकांत अधिक शक्य होतील, तेवढी वाचावी. परीक्षांसाठी लिहिलेली मराठी पुस्तके (तुरळक अपवाद सोडून) चांगली आहेत, असे मी म्हणणार नाही, पण इतर मराठी ग्रंथसंपत्ती मोठी आहे. 'समाजप्रबोधन संस्थे'ने (पुणे) अनेक विषयांवर मराठीत काय वाचता येईल त्यासंबंधी विषयवार लहानसहान पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. त्या किती विद्यार्थ्यांनी पाहिल्या आहेत ? ह्या पुस्तिकांमध्ये केवळ पुस्तकांची यादी नसून त्यांवर समीक्षणात्मक टिपणेही आहेत. (मी स्वतः 'राज्यशास्त्र आणि राजकारण' अशी पुस्तिका लिहिली आणि ती क्वचितच कोणी पाहिली असल्याचा अनुभव घेत आहे.)

जे इंग्रजीत वाचू शकतात, ते खरे भाग्यवान. आमचा मराठीचा अभिमान कितीही असला, तरी नवनवा विचार सतत ज्या भाषेतून येतो आहे ती भाषा इंग्रजीच. ह्या बाबतीत वाद असूच शकत नाही. केवळ मराठी वाचनावर जे विसंबून राहतात ते नित्य बदलणाऱ्या जगाच्या पसाऱ्यात दुर्बळ राहणार. भोवतालचा समाज अज्ञानी असल्यामुळे हा दुर्बळ माणूस टिकू शकतो, मिरवू शकतो. पण माणसाचे मोजमाप करताना बदलत्या जगाचा संदर्भ ठेवला, तर एखाद्या महत्त्वाच्या आधुनिक परकी भाषेपासून दूर राहणारे लोक हे पदवीधर निरक्षर ठरतात ! हे कटु सत्य मी मुद्दाम सांगत आहे. काही अंशी शाळेत असताना झालेली इंग्रजीची आबाळ, काही अंशी इंग्रजी शिकण्यासाठी आणि वाचण्यासाठी कष्ट करण्याची नाराजी, काही अंशी नेत्यांच्या (आणि काही प्राध्यापकांच्याही !) चुकीच्या शिकवणुकीचा परिणाम, म्हणून मराठी विद्यार्थी इंग्रजीची हेळसांड करीत आहे, ती संबंध मराठी समाजाला मारक आहे, हे मला आवर्जून सांगावयाचे आहे. स्वभाषेचा अभिमान, मराठी साहित्याचे परिशीलन, मराठी समाजाचा विचार, मराठी भाषेतून लिहिण्याबोलण्याची सहजता ह्या सर्व गोष्टी अत्यावश्यक आहेतच. तरीही इंग्रजी भाषेचा अभ्यास आणि इंग्रजीतून वाचन करण्याची सवय कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. मराठी दैनिक आणि इंग्रजी दैनिक, मराठीतील उत्तम ग्रंथ आणि इंग्रजीतील उत्तम ग्रंथ त्यात कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मह-

दंतर आहे. त्या बाबतीत मराठी दैनिकांच्या संपादकांच्या आणि ग्रंथलेखकांच्याच साक्षी काढाव्या, म्हणजे झाले. नावाजलेले मराठी साहित्यिक इंग्रजी वाङ्मयाचे मोठे व्यासंगी आहेत. उदा., इंग्रजी वाङ्मयाच्या अध्यापकाइतके श्री. वि स. खांडेकर इंग्रजी वाचन करीत, हे मी स्वतः पाहिले आहे.

खरे पाहता, कॉलेजच्या विद्यार्थ्याला इंग्रजी शिकावयास किंवा सुधारावयास सहा महिन्यांपेक्षा अधिक वेळ लागू नये. पण अकारण भीती, चिकाटीचा अभाव आणि इंग्रजीची खोटी अवहेलना ह्यांमुळे विद्यार्थी इंग्रजी शिकावयाचे, सुधारावयाचे टाळतात. परिणामी, महाराष्ट्रीय विद्यार्थी इतरांच्या मानाने मागे राहतो. त्याचा दोष स्वतःस द्यावयाच्या ऐवजी आपल्याला कोणी इतर लोक छळीत आहेत, असा ग्रह करून घेतो. इतरांशी भांडून, भांडल्यामुळे आणखी नुकसान करून घेतो. मराठीतील एक कथाकार–कवि–टीकाकार श्री. दिलीप चित्रे यांनी एका इंग्रजी लेखात असा दावा मांडला होता, की 'महाराष्ट्राला दुसऱ्यास दोष द्यावयाची मनोविकृती झाली आहे.' त्यांचे हे विधान वादग्रस्त असेल, पण इंग्रजीचा दुस्वास जो महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये चालू आहे, त्याच्या संदर्भात तरी श्री. चित्रे यांचे म्हणणे मला स्वीकारार्ह वाटते. इंग्रजीचा दुस्वास करून आम्हां प्राध्यापकांचे काही वाकडे व्हावयाचे नाही, विद्यार्थ्यांचे मात्र जरूर नुकसान होणार आहे! आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे– ज्याच्या घरी इंग्रजी वाक्य कानी पडत नाही, ज्याच्या ओळखी-वशिले नाहीत, ज्याला केवळ स्वतःच्याच गुणांवर अवलंबून राहावे लागेल–अधिक नुकसान होणार आहे.

पदवी नसलेला आणि पदवी असलेला ह्यांची तुलना करावी (किंवा पहिली पदवी असलेला आणि दुसरी पदवी असलेला ह्यांची तुलना करावी). पदवीने पदरी काय पडले, ते ह्या तुलनेत दिसले पाहिजे. ही तुलना केव्हाही, कोठेही आणि जवळजवळ कोणालाही करता येईल. एस्. टी. स्टँडवर माणसे उभी आहेत किंवा आगगाडीतून प्रवास करीत आहेत, त्यांचे बोलणे ऐकावे. त्यापेक्षा पदवीधर काही वेगळे बोलतो का? पदवीधराच्या बुद्धीचे अधिक संस्करण झाले त्यामुळे एखाद्या साध्या गोष्टीचेही त्याचे आकलन अधिक चटकन् आणि स्पष्ट झाले पाहिजे. पण कोणत्याही कामात (उदा., ऑफिसच्या कामात) तसा अनुभव फारसा येत नाही! (सन्मान्य अपवाद वेगळे).

हे सगळे सांगायचीही शक्यता राहिली नाही. सांगावे, तर 'शिक्षकांना तरी काय येते?' असा पहिला प्रश्न विचारला जातो. शिक्षकांना कमी येते, असे मानले तरी विद्यार्थ्यांची जबाबदारी चुकत नाही. 'काहीच न येण्यापेक्षा हे एवढे तरी विद्यार्थ्यांस येते', असेही म्हटले जाते. त्यावर माझे उत्तर असे, की 'एव-

ह्याच वेळात, एवढ्याच खर्चात आति एवढ्याच बुद्धिमत्तेने अधिक मिळवता आले असते. फक्त वेगळ्या दृष्टीची आणि अधिक श्रमाची जरुरी होती.' कॉलेजांचे दोष मी जाणतो. अनेक कॉलेजांचे स्वरूप नुसते तीन–चार तास शिकविण्याची व्यवस्था करणाऱ्या संस्था, इतकेच असते. चालकांना ग्रंथालयाची काळजी नाही, वृत्तपत्रे वाचावयास देण्याकडे आणि इतर सोयी करण्याकडे त्यांचे लक्ष नाही, विचारवंतांची व्याख्याने घडवून आणण्याबद्दल त्यांना आस्था नाही. ठरलेल्या चाकोऱ्यांच्या बाहेर त्यांना काही नको. चाकोऱ्यांच्या बाहेर जावयाचे, म्हणजे कामे वाढवून घ्यावयाची ! नकोच ते. ह्या संस्थांचे स्वरूप असे असते, की प्राध्यापकांच्या तोंडून ठरावीक विषयावरील पाठ्य–पुस्तकांखेरीज काहीही ऐकण्याची शक्यता नाही. प्राध्यापक आणि विद्यार्थी ह्यांच्यामध्ये संवादच होऊ शकत नाही, ह्याचे मला दुःख वाटते. ह्या बाबतीत जुन्या आणि मोठ्या कॉलेजपेक्षा लहान आणि नव्या कॉलेजमध्ये अधिक संवाद होऊ शकतो. (पण लहान आणि लहान गावच्या कॉलेजच्या अडचणी काही वेगळ्या असतात.)

मला वाटते, ही परिस्थिती अनेकांच्या लक्षात येत नाही. लक्षात येत असती, तर ते एवढे खुशीत दिसते ना, आणि ही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्नही होत असताना दिसले असते.

–आणि जेव्हा पदवीधराला आपल्या हाती फारसे काही लागले नाही हे कळते, तेव्हा बराच उशीर झालेला असतो. त्याला कळो–न कळो, तो खुशीत असो–नसो, पण समाजाचे काय ? असाही प्रश्न उद्‌भवतो. हा समाज स्पर्धेत मागे राहतो, ही केवढी हानी होय : स्पर्धा देशातील इतर समाजांशी आणि जगातल्या इतर देशांशी.

विद्यार्थी कॉलेज सोडून जाऊ लागला, म्हणजे त्याला विचारावेसे वाटते, " तू येथे काय मिळविलेस ? " पण ते धाडस मला होत नाही. तो पाठमोरा जात असताना माझ्याशीच मी म्हणतो, ' बिचारा चार वर्षांपूर्वी आला, तसाच तर जात नाही ना ? ' त्याची गरिबी लक्षात आली, तर ह्या विचाराने मन आणखी कासावीस होते.

[' बियॉंड फ्रेंडशिप ', जून १९७०]

४
दलित वर्गातले विद्यार्थी

१

दलित वर्गातील मुलेमुली मोठ्या संख्येने शाळा कॉलेजात आली आहेत. आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणा लक्षात घेतला, तर दलित वर्गात केवळ महार, मांग, धेड, भंगी, कैकाडी यांचा अंतर्भाव आहे, एवढेच नव्हे, तर कोळी माळी, कुणबी ह्या जाती आणि भूमिहीन किंवा तीन-चार एकर जिराईत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची मुले यांचाही दलितांमधे समावेश करावयास हवा. एकंदर विद्यार्थ्यांमध्ये ह्या अर्थाने दलित असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर ही शहरे सोडली, तर इतर सर्व लहानमोठ्या शहरांत आणि गावांत ही मुले मोठ्या संख्येने असल्याचे चटकन् नजरेत येते. वरील तीन शहरांतसुद्धा, त्यांची संख्या इतरांच्या तुलनेने कमी असली, तरी इतरांच्या पुढारलेपणात त्यांच्या मागासपणामुळे दलित मुले उठून दिसतात. त्यांच्या सामान्य कपड्यांनी, त्यांच्या ओबडधोबड आणि घामटलेल्या चेहऱ्यांनी, त्यांच्या भाषेच्या लकबीमुळे, त्यांच्या बुजऱ्या प्रतिक्रियांनी, कधी अंगचोरपणामुळे, तर कधी संतापयुक्त उद्धटपणामुळे, कोणत्याही शिक्षणसंस्थेत दलितांचे अस्तित्व सहज जाणवते. पब्लिक स्कूल आणि तत्सम इंग्रजी माध्यमाच्या शाळा, परीक्षेतील गुणांची कठीण कसोटी लावणारी महाविद्यालये आणि खिस्ती किंवा सिंधी किंवा गुजराती महाविद्यालये सोडली तर इतरत्र 'द पुअर आर् ऑल्वेज विथ यू' हे खिस्ताचे वचन सहज पटते.

हा वर्ग एवढा मोठा असून, त्याचे प्रश्नही अवघड असून त्याच्याकडे कोणी स्वतंत्रपणे लक्ष मात्र पुरविलेले नाही. डॉ. आंबेडकरांच्या आणि डॉ. भाऊराव पाटील आणि पंजाबराव देशमुख यांच्या प्रयत्नांनी निघालेल्या कॉलेजांमध्ये

दलितांचे शिक्षण ही मूळ प्रेरणा असूनही ह्या मुलांना काही सवलती देण्यापलीकडे त्यांचा अधिक विचार झाला आहे, असे वाटत नाही. मग इतर कॉलेजांबद्दल बोलावयासच नको. सरकारने ह्या वर्गास दिलेल्या सवलती, नोटीस लावून त्यांस वाटून दिल्या, म्हणजे त्यांचे काम संपले, असे सर्व कॉलेजांच्या चालकांनी गृहीत धरले आहे. मागास वर्गातील मुलांसाठी सरकारी तक्ते भरून पाठवावे लागतात आणि ह्या मुलांची इतरांपेक्षा अधिक गाऱ्हाणी ऐकावी लागतात, हेही कॉलेज-चालकांचे खास काम समजण्यास हरकत नाही! इतर मुलांसाठी काही खास वेगळे करावे लागत नाही, मग ह्या वर्गासाठी काही करावे लागते, असे संस्था-चालकांना का वाटावे?

दलित मुलांची काळजी वाहणारा एक नवाच पुढारी वर्ग शाळाकॉलेजांच्या बाहेर तयार झाला आहे. हे पुढारी वसतिगृहे चालवितात. त्यांनी वसतिगृहांतील प्रवेशाबाबत भेदाभेद केल्याची आणि नफा मिळविण्याकडे दृष्टी ठेवल्याची तक्रार काही वेळा ऐकू येते. काही पुढारी कागदी कामात तरबेज आहेत. दलित मुलांची सरकारकडून आलेली रक्कम केव्हा देणार, अशी पृच्छा करणारी, एखाद्याची वर्गाची तुकडी बदलून देण्याबद्दल, एखाद्याला हजेरी कमी असून परीक्षेची परवानगी मिळण्याबद्दल पत्रे ह्या पुढाऱ्यांकडून लिहिली जातात. आमदार, खासदार, जिल्हा परिषदांचे पदाधिकारी यांचाही उपयोग केला जातो. पत्रांच्या प्रती कुलगुरू आणि मंत्र्यांपर्यंत पाठविणे ही त्यांची बहुधा पद्धत असते. पुष्कळदा शाळा-कॉलेजांच्या अधिकाऱ्यांकडून दलित मुलांची उपेक्षा होते, म्हणून आणि काही वेळा तसे गृहीत धरल्यामुळे ह्या बाहेरच्या पुढाऱ्यांना बरेच बळ प्राप्त होते. मला हा बाहेरून होणारा हस्तक्षेप दुःसह वाटतो, पण आमच्याकडून ह्या मुलांची उपेक्षा होते, असेही मनोमन पटते. आमच्याकडून होणाऱ्या उपेक्षेच्या बाबी आणि बाह्य हस्तक्षेपाच्या बाबी मात्र एकच आहेत, असे नव्हे. त्या एकच असल्या, तर मीही हा हस्तक्षेप सह्य मानला असता. किंबहुना, दलित मुलांसाठी आम्हां शाळाकॉलेजांकडून खऱ्या कोणत्या अपेक्षा कराव्यात, त्याची बाहेरच्या पुढाऱ्यांना नीट कल्पना नसावी, अशी शंका येते. कदाचित आमच्यावरील सार्थ रागामुळे, चुकीच्या बाबतीत का असेना, पण हस्तक्षेप करावा, असे त्यांना वाटत असावे.

२

अनिल अवचट/कुमार सप्तर्षी हे युक्रांदचे पुढारी मोठ्या कॉलेजांमध्ये दलित मुलांच्या प्रवेशाबाबत आणि नंतर भेदाभेद होतो, असा आरोप करतात. असा भेद मुद्दाम केला जात नाही; पण भेदाचे वातावरण कॉलेजच्या भोवती असतेच. शहरातले मोठे कॉलेज म्हटल्यावर तेथे गावातील आणि दूरगावांहून

येणाऱ्या वरिष्ठ वर्गांतील जातींतील मुलामुलींची रीघ लागते. त्यांची उंची, त्यांचे गोंडस शरीर, त्यांचा तडफदार, स्वच्छ आणि (लाघवीसुद्धा) उच्चार, त्यांची प्रसन्नता–ह्यांनी कॉलेज सुरेख दिसते, प्रसन्न राहते. कॉलेज सुरेख दिसले पाहिजे, प्रसन्न राहिले पाहिजे. ह्या कॉलेजात मागास मुले मागास दिसतातच आणि तीही हिरमुसली राहतातच. इतर मुले नाटकात भाग घेतात, गाणे–बजावणे करतात, क्रिकेट खेळतात. दलित विद्यार्थी मुख्यतः कब्बड्डी–खो खो खेळतात. फक्त एन्. सी. सी., कुस्ती ह्यांमध्ये दलित इतरांच्या बरोबरीने असतात. स्थूलमानाने इतरांची झळाळी दलितांकडे नसते. ह्यात वावगे काहीच नाही, पण शहरी कॉलेजांत ही मुले दूर टाकली जातात.

पुष्कळदा दलितांचे भाषण–लेखन अशुद्ध असते आणि वाचन परीक्षेच्या किमान मराठी पुस्तकांपुढे जात नाही. अवांतर माहिती नाही, बहुश्रुतता नाही. आयुष्यातल्या निराशाजनक अनुभवांमुळे, एकंदर दृष्टिकोणामुळे कशाबद्दल उभारी नाही. प्राध्यापकांना–प्राचार्यांना भेटावे, इतर मुलांमध्ये मिसळावे, तर तेही जमत नाही.

ह्या वेगळेपणामुळे, गरिबीमुळे, अलगपणामुळे ही मुले आपली वेगळी वसतिगृहे करतात आणि शहरी कॉलेजे टाळून ग्रामीण कॉलेजांत राहतात. तेथे त्यांना अधिक खुलेपणाने राहणे शक्य असते. ग्रामीण कॉलेजांतसुद्धा चालकांनी दलित विद्यार्थ्यांचा स्वतंत्र रीतीने विचार करून त्यांना अधिक जवळ ओढले आहे किंवा त्यांच्या आर्थिक चणचणीपलीकडे लक्ष दिले आहे, असे दिसत नाही. तेथे इमारती, संघटन, प्राध्यापक–प्राचार्य, इतर मुले, गावाचे वातावरण बुजवणारी नसतात, हा निश्चितपणे फरक जाणवतो. तेथील परीक्षांचे निकाल बरे असल्यामुळे उत्तीर्ण होत जाणारा दलित विद्यार्थी आत्मविश्वास मिळवीत असावा. दुर्दैवाने वाचन कमीच राहते, भाषा अविकसित राहते, कल्पनेची कक्षा मर्यादित राहते. पदवी घेऊन ही मुले नोकरीसाठी शहरांत जातात, त्या वेळी त्यांस त्या मर्यादा जाणवतात. शहर आणि ग्रामीण भाग ह्यांत फरक असून तेथल्या कॉलेजांना तो चिकटलेला असतो. शहरीपणा हा सर्वस्वी बरा आहे, असे म्हणण्याचा माझा रोख नसून, काय घडते, तेवढेच मी सांगत आहे. समाजाचा तथाकथित विकास शहरीपणाच्या दिशेने असल्यामुळे, शहरीपणात दलित विद्यार्थी तोकडा पडतो. ग्रामीण कॉलेजांतून पदवीधर झालेले विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी मला पुण्यात भेटले. मी कसून चौकशी केल्यावर त्यांनी मला सांगितले, की मोठ्या शहरांत मोठ्या कॉलेजांतून पदवी घेणे आवश्यक वाटल्यामुळे, आर्थिक अडचणी असूनही, त्यांना आता पदव्युत्तर शिक्षणासाठी पुण्यातच आले पाहिजे!

शहरात आणि काही अंशाने लहान गावी दलित समाजातील मुले दारिद्र्या-

मध्ये आणि सामाजिक अवहेलनेमध्ये पिचत असतात. त्यांना थोडीशी सहानुभूती दाखविली, तर ही मुले भराभरा आपल्या व्यथा बोलू लागतात आणि कधी कधी लहान पोरांसारखी रडतात आणि त्यांचे आई–बापही रडतात. ह्यांतही अनेक मुले मला मधूनमधून विचारतात, "सर, कोठे तरी नोकरी लावून देता का? घरी निभावत नाही, अशी अवस्था आहे." कोणी म्हणतो, "आई-बापांच्या शेतमजुरीत भागत नाही." कोणी म्हणतो, "बाप गाडीवर बटाटावडे विकतो. त्यावर भागत नाही." कोणी म्हणतो, "एकटा भाऊच आमच्याकडे पाहणारा होता, तोच वेगळा राहू लागला आणि आमचा आधार तुटला." कोणी सांगतो, "माझा डबा तीस मैलांवरून एस्. टी. ने येतो आणि तो घेण्यासाठी मला तुमचे लेक्चर चुकवून एस्. टी. वर गेले पाहिजे." कोणी म्हणतो, "मी सकाळची आगगाडी पकडण्यासाठी पहाटे तीन वाजता उठतो आणि दुपारी भूक लागत असल्यामुळे मला घरी परतलेच पाहिजे." कोणी म्हणतो, "पावसाळ्याच्या प्रारंभी बैल विकत घ्यायला अमूक गावी बाजारात गेलो आणि नदीला पूर आल्यामुळे घरी परतून कॉलेजला यायला वीस जुलै उजाडला." परवा एका मुलाने मला सांगितले, की तो खडी टाकण्याचे काम करतो. हे सगळे मी अनेकदा ऐकत आलो आहे. पण नव्या दोन गोष्टी ऐकून चक्कर येण्याची पाळी आली. वास्तव, कथा-कादंबऱ्यांपेक्षा विस्मयजनक असते, अशातल्या त्या गोष्टी आहेत. एक विद्यार्थी सकाळी पहिल्या लेक्चरला नेहमी गुंगारा द्यायचा. त्याला दम भरल्यावर बऱ्याच वेळाने त्याने तोंड उघडले. तो सांगतो, की तो भंगी समाजातला असून, त्याची आई–बहीण सकाळच्या वेळी मैला नेत असताना त्याला बघवत नाही. त्यांच्या कामाची वेळ टाळून तो कॉलेजकडे येतो. एक मुलगी सांगते, की तिच्या आईचा वेश्याव्यवसाय असून अलीकडे ह्या मुलीला त्या धंद्यात पडावे लागले. अर्धी रात्र ह्या धंद्यासाठी जागरण झाल्यावर सकाळी लवकर उठणे शक्य होत नाही! ह्या सगळ्या मुलामुलींना चालू परिस्थिती जाचते. इतकेच नव्हे, तर पुढे काय होणार, त्याची चिंता जाळते. परवा एक मुलगा मला सांगतो, "सर, पुढे तरी आम्हांला नोकऱ्या मिळणार काय? खात्री वाटत नाही. संध्याकाळ झाली म्हणजे कंदिलाच्या प्रकाशात अभ्यासाला बसतो आणि पुस्तकातली अक्षरे दिसतच नाहीत. पुढचा विचार करण्यात मी गढतो आणि नुसता काळोख दिसतो." मग उद्याच्या उमेदीचे मी त्याला एक इंजेक्शन टोचतो.

एकदा औरंगाबादला एका कॉलेजमध्ये नव्या आलेल्या मुलांसमोर मला बोलायचे होते. माझ्यासमोर दीडदोनशे मुले उदासवाणी बसली होती. अगदी गरीब. त्यांच्याकडे पाहून पटकन् एक विचार सुचला आणि तो मी बोलून दाखविला. "तुमच्या दारिद्र्याची लाज वाटून घेऊ नका किंवा दारिद्र्याने खचू

नका. आपापले रूप कसे आहे, त्याची आपण कधी खन्त केली आहे काय ? रूप आईबापांनी दिले, तसे दारिद्र्यही त्यांनीच दिले. केशवसुतांच्या दोन ओळी आहेत– 'आम्ही नव्हतो अमुचे बाप। का मग आता पश्चात्ताप ॥' असेच मानावे. आहे ते रूप घेऊन ते जसे व्यवस्थित ठेवतो, तसे आहे त्या दारिद्र्यात व्यवस्थित राहावे. पदवी घेऊन बाहेर पडताना दारिद्र्य हटवण्याच्या ईर्ष्येने बाहेर पडावे." माझा हा विचार ऐकून त्या मुलांना काय वाटले असेल, कोण जाणे ! कदाचित ती मुले मनाशी किंवा आपसांत म्हणाली असतील, "ह्यांना आमचे दुःख काय कळणार ? सबुरीचा सल्ला द्यायला यांचे काय जाते ? ह्यांचा त्यात स्वार्थ आहे." ह्या टीकेस मी अपात्र आहे, असे कसे म्हणू ?

कोल्हापूरचा एक अनुभव. कॉलेजमधल्या ॲडमिशन संपल्या होत्या, तरी बरीच मुले चौकशीस येत. नकार मिळाल्यावर नाराजीने परत जात. एका मुलाचा बाप परत जाईना. त्याचे नाव त्याने सांगितले : बाबू. २०–२५ मैलांवरून आला होता. नकार मिळाल्यावर बाबू रडू लागला ! बोलण्यात थोडासा बोबडा होता. रडत रडत सांगतो, "मला खुळा बाबू म्हनत्यात. पन माजा मुलगा शाना व्हायला हवा. म्हनून हितं आनलाय !" बाबूचे रडे आवरेना आणि बोलणेही आवरेना. मी त्याला शरण जातो.

३

दलित मुलांना शहरी वातावरणात सहजपणे मिसळणे अवघड जाते. इतर समाजही अडचणी आणतो. मिश्रवसतिगृहात त्यांना टाळण्याकडे कल असतो. काही चालकांना वाटते, की आपण दलितांचे काम करतोच आहोत. खरे असे असते, की आर्थिकदृष्ट्या मागासलेली थोडी मुले त्यांनी घेतलेली असतात. खालच्यांत खालचा थर त्यांना माहीत असतो, तो शेतकऱ्यांच्या मुलांचा. त्याखाली आणखी काही थर आहेत आणि त्यांतील मुलांची संख्या मोठी असते, ही गोष्ट त्यांच्या नजरेतून निसटलेली असते. अशा वसतिगृहात दलित मुले राहू लागल्यावर त्यांस खूप काळजीपूर्वक राहावे लागते. नाही तर इतर मुले त्यांस गोत्यात आणण्याचा खेळ खेळतात. कॉलेजमधल्या किंवा जवळपासच्या मुलींविषयी त्यांस काही सांगणे आणि त्यांच्या प्रतिक्रिया न्याहाळणे, असा एक खेळ एकदा माझ्या लक्षात आला ! खेड्यातल्या मुलांचा आहार शहरी मुलांच्या आहारापेक्षा अधिक असतो, त्यावरून दलित मुलांना नावे ठेवली जातात, असेही मला कळले. भांडणे वाढता वाढता, एका दलित मुलाचा इतर मुले त्याच्या वाईटावर आहेत, असा पक्का समज झाला आणि त्यातून त्याने आपली अनुकंपनीय अवस्था करून घेतली. वसतिगृहाचे संचालक, इतर मुले आणि दलित मुले ह्या तिघांचीही

जबाबदारी वरील उदाहरणांवरून कळून यावी.

प्राध्यापक–प्राचार्यांनी ह्या विद्यार्थ्यांचे नवे आव्हान ओळखले नाही. संस्थांना विद्यार्थ्यांची संख्या हवी असते आणि विद्यार्थ्यांना संस्थेत नाव घालावे लागते, म्हणून जशी काही ही दलित मुले कॉलेजात असतात. काही प्राध्यापकांना ह्या विद्यार्थ्यांविषयी अप्रीती आहे. त्यांना वाटते, ह्या 'पोरां'मुळे शिकवण्यात गंमत राहिली नाही आणि शिक्षणाचा दर्जा खाली आला! अप्रीती असतेच. त्यामुळे इतर मुलांमध्ये ही मात्र 'पोरे.' अप्रीतीला कारण ह्या शिक्षकांचे संस्कार हेच होय. दर्जा खाली आला आणि शिकवण्यात गंमत नाही, ह्या गोष्टी खऱ्या असतात; पण त्या अप्रीतीचे मूळ कारण नाहीत. दर्जा खाली येण्यात वर्गातील संख्या मोठी झाली आहे, हे कारण असून, त्या संख्येत दलित आहेत, हे कारण नव्हे. शिकवण्यात गंमत नाही, त्याचे कारण दलित हे आहेत! जे दलितांच्या अनुभवास आले नाही, ते त्यांस शिकवताना विद्यार्थ्यांस कोठला पुनःप्रत्यय? आणि विद्यार्थी 'अन्–इंटरेस्टेड' राहिले, तर शिक्षकास कुठून आनंद? उत्तम इंग्रजी दलित मुलांना कळत नाही. त्यातल्या 'जोक्स्,' काही रसाळ स्थळे त्यांना कळत नाहीत. मराठी शिकताना 'घागरी फुंकणे' इ. ब्राह्मणी गोष्टी त्यांस माहीत नसतात. महाभारत–रामायणातील दाखले त्यांस कळत नाहीत. शब्दार्थांमुळे होणारे विनोद त्यांस समजत नाहीत. कल्पनेने जाणावयाच्या शहरी माणसांच्या गोष्टी वेगळ्या नि खेडुतांच्या वेगळ्या. शिक्षक काही माहिती गृहीत धरून चालणार. काही शब्दांची फोड त्यांना आवश्यक वाटत नाही. शंभर-दीडशे विद्यार्थ्यांच्या वर्गात तसे करणे त्यांस शक्यही होत नाही. दर आठवड्याच्या पंचेचाळीस मिनिटांच्या तीन व्याख्यानांत त्यांच्या काही मर्यादा आहेत. ह्या सर्वांचा अर्थ असा, की दोष असतो, तो शिक्षणाच्या आशयाचा, शिक्षणात भाषेला दिलेल्या स्थानाचा आणि अध्यापनपद्धतीचा.

दलित मुलांना हेच शिक्षण का हवे? ह्या शिक्षणातही आशय बदलता येईल का? हे मोठे प्रश्न आहेत. निदान अध्यापनपद्धत बदलणे शक्य आहे. अध्यापनाची वेळ वाढविता येईल. वर्ग लहान करता येतील. काही मुलांसाठी जादा वर्ग घेता येतील. कॉलेजच्या प्राध्यापकांकडून किंवा बाहेरच्या व्याख्यात्यांस बोलावून ठरावीक विषयांच्या चाकोरीबाहेरची माहिती विद्यार्थ्यांस देता येईल. कल्पकता, बहुश्रुतपणा यांचा तोकडेपणा काही अंशांनी दूर करता येईल. दर्जेदार मराठी लेखन भाषण करणे म्हणजे संस्कृतातली अवतरणे देणे, असे झाले आहे. अलीकडील शास्त्रीय समाजवाद सांगतानासुद्धा त्यात 'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु' असे वेदवाक्य असते. असले लेखन–भाषण केवळ दर्जेदारच नव्हे, तर विचारप्रगल्भ समजले जाते. ह्यातला धोका समजून घेतला पाहिजे.

दलित वर्गाचा विचार होत नाही, ह्याचे एक नवे उदाहरण माझ्या आढळात आले. ते कॉलेजमधील पी. टी. संबंधी. ज्यांना पी. टी. चुकवायची आहे, ती सधन मुले आपण नोकरीस असल्याचे प्रमाणपत्र आणतात किंवा आजारी असल्याचे डॉक्टरचे सर्टिफिकेट आणतात. हे दोन्ही दाखले नसलेला गरीब मुलगा माझ्यापुढे उभा राहिला आणि पी.टी.साठी हजर न राहिल्याबद्दल माफी मागू लागला. मी त्याला माफी करू शकत नव्हतो. काही वेळाने त्याचा बाप आला. तो स्टेशनवर पोर्टर होता. तो सांगतो, "साहेब, खरं बोलू? दहा मिनिटांच्या अंतरावर कॉलेजला कवायतीसाठी यायला काही हरकत नव्हती. पण गंजीफ्रॉक, बूट आणि मोजे विकत घ्यायला २५–३० रुपये लागतात. ते आम्ही कुठून आणायचे?" हा गणवेश गरीब मुलांना परवडत नसता त्याची किंवा पी.टी.ची सक्ती करणे ही क्रूर चेष्टा आहे.

दलित मुलांच्या परिचयाच्या खेळांना अधिक महत्त्व द्यावयास हवे. श्रमदानाच्या कार्यक्रमात त्यांची चांगली साथ मिळेल. सर्वांत महत्त्वाचे, म्हणजे आपल्याला काही स्थान आहे, आपल्याकडेही शिक्षक लक्ष देतात, असे त्यांना वाटले पाहिजे. त्यांच्यासाठी इंग्रजीचे वर्ग जादा ठेवावयास हवेत. त्यांची वक्तृत्वाची तयारी अधिक करून घ्यावयास हवी. त्यांच्या वाचनाचा व्याप आणि त्यातील विविधता वाढविली पाहिजे. ग्रंथालयातील विविध विषयांवरील पुस्तके त्यांच्यापाशी अधिक सहजपणे आणविली पाहिजेत.

लक्ष देणे, ह्याचा अर्थ नुसत्या आर्थिक सवलती वाढविणे एवढा नाही, हे वरील उदाहरणांवरून स्पष्ट आहे. पण न्याय्य आर्थिक सवलती मिळतात, की नाही, तेही पाहणे जरुरीचे आहे. येथे कॉलेजच्या संचालनातील आणि सरकारी खात्याच्या संचालनातील दोषांवर बोट ठेवले पाहिजे. बी. सी. आणि इ. बी. सी. सवलतींसाठी सरकारकडे अर्ज करावा, अशी नोटीस कॉलेजच्या फलकावर इतर डझनावारी नोटिसांत, कोठे तरी लावली जाते. ती विशेषतः नव्याने कॉलेजमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्या लक्षात येणे अवघड. काही मुलांना ती माहीत नसते आणि त्यांचे अर्ज जात नाहीत. काही बी. सी. मुलांचे अर्ज वर्षअखेर नामंजूर होऊन येतात आणि त्यांची कॉलेजचे पैसे भरण्यासाठी धावपळ सुरू होते. विद्यापीठाची परीक्षा–फी भरण्यासाठी कॉलेजने सद्‌बुद्धीने त्यांना उसने पैसे दिले असले, तर वर्षअखेर, विद्यार्थी कॉलेजमध्ये येण्याचे बंद झाल्यावर, सरकारकडून नामंजुरीचे उत्तर येते आणि कॉलेजला झळ लागते. बी. सी. मुलांना फीखेरीज दर महिन्यासाठी खर्च मिळतो; पण ती रक्कम किंवा त्यासाठी कॉलेजकडे दिलेला आगाऊ निधी दोन-तीन महिने कॉलेजकडे येत नाही आणि मुलांची गैरसोय होते. अनेक मुलांना आजार येतो. अनेक मुलांना पायोरिया असतो. अनेक

मुलांना चश्मा हवा असतो. त्यांच्या ह्या अडचणींत त्यांना कोणी वाली नाही. कॉलेजकडे गरीब मुलांसाठी निधी असतो, त्याची नोटीस लागत नाही. नोटीस लागली, तर ज्यांस खरी गरज असते, त्याच्यापर्यंत मदत पोहोचतेच, असे नाही. ओळख-वशिला यांचा उपयोग सरकारात असतो, तसा येथेही असतो. "ह्यांना सरकार अफाट देतं आहे," असा शेरा मी अनेकांच्या तोंडून ऐकला आहे. ज्यांचे मत हे असे असेल, ते मदतवाटप कसे करीत असतील, ते उघड आहे.

बहुजनसमाजाने काढलेल्या काही कॉलेजांमध्ये थोड्या खर्चात मुलांना जेवण देण्याची सोय करण्यात आली आहे, ही आनंदाची बाब आहे. काही अशा कॉलेजांत रात्री मुलांना कॉलेजच्या इमारतीत राहू देतात. मोठ्या शहरी कॉलेजांना आपल्या इमारतीचा काही भाग अशा रीतीने वापरू देण्यास काय अडचण आहे? उलटपक्षी, ह्यांतली काही कॉलेजे रात्रीच्या वेळी ग्रंथालयात विद्यार्थ्यांस बसू देण्याबद्दल वेगळी फी आकारतात! दिवाबत्तीचा असा किती खर्च येतो, की तो ह्या मार्गाने गोळा केलाच पाहिजे? ही फी आकारली नाही, तर ज्यांना एक-दोन खोल्यांच्या बिऱ्हाडी आधार घ्यावा लागला आहे, अशा मुलांची सोय होईल, आणि त्यापेक्षा अधिक म्हणजे, त्यांचा दुरावा कमी होईल.

अध्यापकांच्या मनातल्या दुराव्याविषयी वर उल्लेख केला होता. हा दुरावा अंशतः त्यांच्या उच्च वर्णाच्या अहंकाराची दुसरी बाजू आहे. अहंकार सुप्त असला, तरी आविष्कार स्पष्ट आहे. जे शिक्षक उच्चवर्णीय नाहीत, त्यांनीही थोड्याफार अंशाने उच्च शिक्षणाच्या धंद्यात उच्चवर्णीयांचे उपचारांतले अनुकरण चालविलेले असते. ह्या सर्वांस काही प्रश्न विचारावेसे वाटतात. ते असे, की दीडशे वर्षांपूर्वी गोऱ्या साहेबांनी येथील वरच्या वर्गास आधुनिक शिक्षण द्यावयास सुरुवात केली, तेव्हा त्यांना हे वर्ग कसे दिसले असतील? रूप, पोशाख, ज्ञान आणि संवेदनक्षमतेची विविधता ह्या बाबतींत साहेब आणि विद्यार्थी ह्यांत किती भेद होता? आजचे काळे साहेब आणि दलित समाजांतील मुले यांत तितका भेद नाही ना? शास्त्याचा अहंकार तितका नाही ना? स्पर्धेची भीतीही तितकी नाही ना?

सगळी जबाबदारी एकतर्फी आहे, केवळ इतर समाजाची आहे, असे मी मानीत नाही. दलित समाजानेही नव्या काळाची मागणी ओळखून प्रयत्नपूर्वक इतर समाजाच्या जवळ गेले पाहिजे. इतर समाजाचा शहरीपणा (भाषा, राहणी इ.), ज्ञानाची अपेक्षा, कल्पकता, लवचिकता इ. सर्व बाबतींत दलित समाजाच्या तरुण पिढीला पुढे यावेच लागेल. ह्या पिढीने ओळखावे, की शेवटी स्पर्धा अपरिहार्य आहे आणि स्पर्धेच्या अटी आधीच ठरल्या आहेत! निकाल ठरला आहे, असे मात्र त्यांनी मानावयाचे नाही.

"पितरः केवलं जन्महेतवः" अक्षरशः अशी ह्या मुलांची अवस्था. पण इतरांचा आधारही फारसा मिळालेला नाही. सवलतीच्या पलीकडे सरकार काय करणार? सरकार म्हणजे काही तरी अमूर्त; त्याच्याविषयी, बापाविषयी वाटावे, तसे प्रेम कसे वाटणार? बाप घरी काही देत नाही आणि आई लोकांकडे काम करते: बाप असून बाप नाही. आई विधवा आहे, ती काम करते. बापच नाही. असे मी अनेक विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकतो. जे ऐकतो, ते त्यांच्या शरीरांवर आणि चेहऱ्यांवर दिसत असते.

मुले विश्वविद्यालयाचे शिक्षण घेतात, तेव्हा त्यांनी रसिकतेने वाङ्मय वाचावे; त्यांनी लास्की आणि रसेल आत्मसात करावा; त्यांनी विनोदात न्हाऊन निघावे; त्यांनी प्रसन्नतेचे चांदणे फेकावे. हो, हे सगळे करण्यातच विश्वविद्यालयीन शिक्षण असते, असे मी मानतो. पण...पण...ह्या दलित मुलांचे काय? ज्यांना बाप असून केवळ जन्मदाता आहे आणि ज्यांना बापच नाही, त्यांचे काय? बराच शैक्षणिक विचार आणि कार्य ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आहे, असे मला वाटते.

['बियॉंड फ्रेंडशिप', जानेवारी १९७२]

५

शाळा-कॉलेजांतील नियोजन

शैक्षणिक नियोजन वरून खाली अशा क्रमाने होत आहे. त्याऐवजी ते प्रत्येक शिक्षणसंस्थेत जेथल्या तेथे झाले पाहिजे. वरून खाली ह्या क्रमातील नियोजनाचे क्षेत्र वेगळे काढावे आणि ते सोडून इतर क्षेत्रांत, संस्थेतील नियोजनावर अधिकांशाने भर द्यावा. वरून येणाऱ्या नियोजनावर— 'डोईजड' नियोजनावर श्री. जे. पी. नाईक यांनी केलेली टीका सर्वस्वी खरी आहे. ती अशी— हे नियोजन स्थूल आणि चाकोरीतले असते आणि त्या त्या संस्थेच्या गरजांना आणि प्रकृतीला धरून नसते. हे नियोजन पैशातले असते. संस्थेला अमूक कार्यक्रमासाठी अमूक पैसा मिळेल, अशी योजना. संस्थेने तितका पैसा खर्च केल्याचे दाखविले, म्हणजे तो कार्यक्रम यशस्वी झाला, असे समजण्यात येते. उलटपक्षी संस्थात्मक नियोजन केले, तर त्या संस्थेला आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वास योग्य असे कार्यक्रम आखता येतील. ह्या कार्यक्रमांमध्ये खर्चाऐवजी, माणसाचे कष्ट, कौशल्य आणि प्रामाणिकपणा यांचा उपयोग करता येईल.. हे कार्यक्रम आखण्यात आणि पार पाडण्यात शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्याही उपक्रमशीलतेला आव्हान मिळेल.

आज शिक्षणसंस्थांत अनास्था आणि त्रयस्थपणा कमालीचा दिसतो. संस्थेत सर्वांचे लक्ष, आकर्षण फक्त किमान असते. जसे स्थानिक समाजाचे, तसे अध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांचेही. स्थानिक समाज कधी तरी कोणच्या तरी शब्दासाठी देणग्या देतो. 'सत्कार्यासाठी' असा शब्द वापरला जातो, पण खरे पाहता देणग्या कोणाच्या तरी शब्दासाठी दिल्या जातात. संस्थेत समारंभाला बोलवावे, विशेषतः नाटकाला बोलवावे, अशी समाजाची अपेक्षा असते. एवढाच समाजाचा संबंध, आणि ही समाजाची दृष्टी. थोड्या विद्यार्थ्यांना खेळ आणि वार्षिक

संमेलनाचे प्रेम असते आणि शाळा-कॉलेजांतील इतर कार्यक्रमांत त्यांचे फारच कमी लक्ष असते. बहुतेक विद्यार्थ्यांना अध्यापकांच्या तोकड्या, मोजक्या आणि नीरस वर्गात बसण्याखेरीज दुसरे काही करावयाचे नसते. शाळा-कॉलेजात दर दिवशी हे कर्तव्य कमींत कमी वेळात उरकून हे विद्यार्थी काही वर्षांनंतर अभ्यासक्रम आटपून बाहेर सटकतात. अध्यापक-प्राध्यापक ह्यांचेही असेच किमान कर्तव्य असते. हे कर्तव्य पार पाडताना विद्यार्थी आणि शिक्षक जितका तटस्थपणा दाखविता येईल, तेवढा दाखवीत असतात. शाळा-कॉलेजमध्ये, विशेषतः कॉलेजमध्ये, कमींत कमी राहावयाचे आणि घरी जाऊन अवांतर गोष्टींत, विशेषतः आळसात, वेळ घालवावयाचा, ही दिनचर्या झाली आहे. विद्यार्थ्यांनी आणि अध्यापकांनी अभ्यासाचे जे विषय निवडलेले असतात, त्यांचे वाचन किमान करावयाचे, एकंदर शिक्षणाच्या भूमिकेविषयी विचार करावयाचा नाही, ह्या भूमिकेच्या तुलनेने आपली शिक्षणसंस्था कमी पडत आहे, त्याची चिंता करावयाची नाही आणि ती अधिक परिणामात्मक करता येईल, ह्याबद्दल उमेद बाळगावयाची नाही, अशी अवस्था आहे. ही अवस्था इतकी सरावाची झाली आहे, की वेगळे काही असू शकेल, त्याचा विचारही अनेकांच्या मनास शिवत नाही. ज्यास उपक्रम म्हटले जाते, त्याच्या चाकोऱ्या बनून त्याची आकर्षकता संपली आहे. फिजिकल ट्रेनिंग, एन्. एस्. एस्., एन्. सी. सी. ही त्याची उदाहरणे. कॉलेजातील नियोजन-मंडळासारखी मंडळे-उद्घाटनाच्या एका कार्यक्रमाने, किंवा वर्षाच्या पहिल्या सत्रात उद्घाटनाचे भाषण आणि दुसऱ्या सत्रात समारोपाचे भाषण अशा दोन कार्यक्रमांनी कारभार संपवितात. स्वातंत्र्यदिन, टिळक जयंती आणि प्रजासत्ताक दिन हे सुट्टीचे दिवस समजले जातात. ह्या दिवशी विद्यार्थ्यांची हजेरी, एन्. सी. सी. ची कवायत सोडता, कमींत कमी पाहावयास मिळते. महत्त्वाच्या घटनांवर चर्चा करणे कोणाच्या मनाला चुकून शिवत नाही जेथे प्राध्यापकांचा सोवळेपणा असतो, तेथे इतरांचे काय ? श्रमदान, दत्तक खेडे योजना ह्यांचे हसे होण्याइतका गलथानपणा आला आहे, खोटेपणा आला आहे. खेड्यांची आर्थिक पाहणी कृपा करून करू नका, असे कॉलेजांच्या विद्यार्थ्यांना-अध्यापकांना सांगण्याइतक्या त्या सामान्य आणि त्याच त्याच गोष्टींच्या निदर्शक झाल्या आहेत. एका वृद्ध खेडुताने त्याचे 'शहरबाजी' असे वर्णन केले. ह्या परिस्थितीतील अनास्था, अप्रामाणिकपणा, तोचतोपणा, कमदर्जा आणि अनाकर्षता ह्यांनी उबग येतो. समाजास, विद्यार्थ्यांस आणि चांगल्या शिक्षकास शिक्षणसंस्थांविषयी आदर आणि उत्साह वाटण्याचे फारसे कारण नाही, अशी ही परिस्थिती आहे.

ह्या परिस्थितीबद्दल दुसऱ्यांस दोष देण्याचे लगेच बंद करावे, हाच मुळी एक

कार्यक्रम असावा. दुसऱ्यास दोष देऊन स्वतः जबाबदारीतून मोकळे होण्याची पद्धत सार्वत्रिक झाली आहे. ती दिसावयास साळसूद दिसते आणि त्यावर नैतिकतेचा मुलामा असतो. आतून त्यात कामचुकारपणा दडवलेला असतो आणि जबाबदारी टाळल्याची अनैतिकता असते. 'आज समाजात टिळक-गांधींसारखा नेता उरला नाही', 'समाजापुढे आदर्श नाही', 'पूर्वी असे नव्हते, पण आज असे दिसते आहे' ही सर्व व्यर्थ बडबड वाटावी, इतकी ती अप्रामाणिक माणसांच्या तोंडी ऐकू येते आहे. शिक्षकांस काय करता येईल, एवढाच विचार करावा. इतर गोष्टी, त्यांतील काही सत्य असूनही, बाजूला टाकाव्या.

ह्यानंतर दुसरी गोष्ट टाळावयाची, तर ती सरकारी अनुदानावरील भिस्त, विद्यापीठाच्या किंवा डिपार्टमेंटच्या आदेशाची शिस्त आणि बाहेरच्या देणग्यांचे पोस्त. चांगली सद्गुणी माणसे, नाकासमोर चालणारी माणसे शिक्षकी व्यवसायात असतात, ती नेहमीच्या अर्थाने अप्रामाणिक नसतात. अप्रामाणिकपणा आणि जाहिरातबाजी ती कटाक्षाने टाळतातही. पण कोणताही उपक्रम त्यांनी सुरू करण्यासाठी त्यांना वरील तीन गोष्टींची प्रेरणा लागते. गांधीजन्मशताब्दीसाठी कार्यक्रम हाती घ्यावयाचा, तरी त्यांना सरकारी अनुदान मिळणार काय, असा प्रश्न पडतो. ग्रंथालयामध्ये उत्तम ग्रंथ आणावयाचे, तर विद्यापीठाने तशी अट घातली आहे काय, असे ते विचारतात. विद्यार्थ्यांचे गावाबाहेर शिबिर घ्यावयाचे, तर त्यासाठी देणग्या गोळा कराव्या, अशी ही मंडळी सूचना करते. ह्या देशात सद्गुणासाठी आणि सामाजिक कर्तव्यासाठी बाह्य आणि किफायतशीर प्रेरणांची जरुरी लागते. संततिनियमनाची शस्त्रक्रिया करून घ्यावयाची, तर बक्षीस, हरिजन मुलीशी लग्न करावयाचे, तर बक्षीस ... बक्षीस-सवलतींची भाषा ही राजकीय पक्षांची आणि सरकारची भाषा झाली आहे, तशीच ती शाळा-कॉलेजांचीही भाषा झाली आहे. कॉलेजामध्ये मराठी माध्यमाचे वर्ग काढावयाचे, मराठी पाठ्यपुस्तके तयार करावयाची, तर अनुदानाची वाट पाहिली जाते. चांगल्या गोष्टीसाठी पदरमोड करावी, कष्ट करावे, हे महत्त्वाचे तत्त्व म्हणून सांगण्याची पाळी आली आहे. 'हे इष्ट आहे आणि करणे आम्हांस शक्य आहे' असे पटले, तर तोच आदेश समजावयास हवा. सरकार-विद्यापीठ आणि संस्थेचे नियामक मंडळ यांच्या आदेशासाठी काम थांबून राहता नये.

परीक्षेत गुण मिळण्याचे आमिष दाखविल्यावाचून केवळ विद्यार्थी सामाजिक जाणिवेने एखादे महत्त्वाचे काम करावयास तयार नाहीत. एन्. सी. सी. ला मार्क हवेत, एन्. एस्. एस्. ला मार्क हवेत, आणि साक्षरताप्रसाराचा कार्यक्रम येईल, त्यालाही मार्क लागतील! एखादा कार्यक्रम चांगला आहे, त्यात भाग घेणे ह्यातच आनंद आहे, त्यातच आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे विद्या-

र्थ्यांस वाटणे जरुरीचे आहे. मार्क मिळतात, म्हणून असे कार्यक्रम त्यांनी हाती घेतले, तर त्यांना मार्क मिळतात, कार्यक्रम मात्र होत नाहीत. हा अप्रामाणिकपणा आहे. त्यात विद्यार्थी, शिक्षक आणि प्राचार्य सहभागी होण्यापेक्षा असे कार्यक्रम महाविद्यालयात न आणणेच बरे–निदान अप्रामाणिकपणा टळेल.

तिसरी गोष्ट अशी, की कार्यक्रम खूप असावे, विविध असावे. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांच्या रुचिभिन्नतेप्रमाणे कार्यक्रम आढळला पाहिजे. सर्व कार्यक्रमांनी संस्था गजबजली, तर विद्यार्थी–शिक्षक तेथे रमतील. त्यांची कल्पकता, कार्यप्रवणता यांना तेथे वाव मिळेल. नाही तर चाकोरीतून जाणारा विद्यार्थी— आणि विशेषतः शिक्षक– या गुणांना पारखा होतो. शिक्षकाच्या बाबतीत ही गोष्ट इतरांच्या चटकन् लक्षात येते. कल्पकतेचा अभाव, कार्यप्रवणतेचा अभाव हा जसा काही त्याचा स्वभाव बनलेला असतो. इतर क्षेत्रांतील समवयस्क आणि समशिक्षण झालेली माणसे आणि शिक्षकवर्ग यांच्या तुलनेमध्ये हा फरक जरूर जाणवतो. ह्या विधानास अपवाद खूप असले, तरी नियम वाटण्याइतके हे विधान खरे आहे.

ज्या त्या संस्थेने स्वतःचे व्यक्तिमत्त्व तयार करण्यासाठी स्वतंत्र कार्यक्रम तयार करावे. ह्या कार्यक्रमांनी (१) विद्यार्थी–शिक्षकांत कल्पकता, उत्साह, कार्यप्रवणता आणि विधायक वृत्ती यांची वाढ झाली पाहिजे. (२) शिक्षणाचा कस वाढला पाहिजे आणि सामान्य विद्यार्थ्यासही मान उंच करून अधिक पाहता आले पाहिजे. (३) समाजात पुढे उपयोगी पडेल, असे कौशल्य मिळावे, आणि समाजाच्या विकासासाठी व्यक्तींचा उपयोग व्हावा. (४) ह्या कार्यक्रमामुळे लगेच समाजाच्या हितात भर पडावी. ही उद्दिष्टे माझ्या दृष्टीने त्यांचा जो अग्रक्रम आहे, त्याच क्रमाने मी ती येथे मांडली आहेत.

नियोजन म्हणजे काही फार मोठा कार्यक्रम आखावा, असेच नाही. वरील उद्दिष्टांना धरून लहान-मोठे विविध कार्यक्रम आखता येतील आणि त्यासाठी साधने मिळविता येतील. साधनांच्या बाबतीत वर स्पष्ट केलेच आहे, की बाहेरच्या अनुदानांवर विसंबून राहावयाचे नाही किंवा अनुदाने मिळविण्यासाठी कार्यक्रम हाती घ्यावयाचे नाहीत. पैसा संस्थेतून उभा करता येतो, असा मला विश्वास वाटतो, आणि पैशाची उणीव कष्टांनी भरून काढावयाची, असेही मी मानतो. विद्यार्थीही पैसे जमवू शकतात, असेही मी पाहिलेले आहे. विद्यार्थी–शिक्षकांच्या कल्पकता–उपक्रमशीलतेप्रमाणे संस्थांमधील कार्यक्रमांची विविधता दिसेल, त्यामुळे निश्चित कामे न सांगणे बरे. काहींचा उल्लेख करता येईल.

(१) शाळा–कॉलेज समूह. फैजपूर हे लहानसे गाव. तेथल्या कॉलेजने काही कामांची आखणी करून कामास सुरुवात केली आहे.

(२) श्रमदान. मुंबई येथील पोदार कॉलेजने बरीच वर्षे विद्यार्थ्यांची श्रमदाने चालविली आहेत. त्यांचा गाजावाजा केला जात नाही. श्रमदानाची उपकरणे कॉलेजने विकत घेतली आहेत. गरिबांबरोबर श्रीमंत मुले आणि महाराष्ट्रीयांबरोबर बिगरमहाराष्ट्रीय मुलेही मोठ्या संख्येने भाग घेतात.

(३) नियतकालिक. दर सहामाहीस किंवा वर्षास निघणारे नियतकालिक रिपोर्टासारखे, फोटोंनी भरलेले आणि विचारात्मकतेच्या दृष्टीने सुमार असते. लहानसे (१६–२० पानांचे) मासिक, द्वैमासिक किंवा अनियतकालिकाचे काही अंक काढता येतील. अंबेजोगाईच्या कॉलेजमध्ये आणि कोल्हापूरच्या कॉमर्स कॉलेजमध्ये असे अंक काढले जातात. कोल्हापूरच्या कॉलेजच्या अनियतकालिकाचे नाव 'सेतू' असून त्यात इंग्रजीतील उत्तम लेखांचा आणि ग्रंथांचा मराठीमध्ये गोषवारा दिलेला असतो. अलीकडे म. गांधींवर एक अंक निघाला. ह्या अंकाचा खर्च जिमखान्यामधून चालतो.

(४) टी. एफ्. एल्. मुंबईच्या विल्सन कॉलेजचे (माजी) प्राचार्य आयरन् यांनी 'ट्रेनिंग फॉर लीडरशिप' नावाची चळवळ सुरू केली होती. काही कॉलेजे त्यात स्वेच्छेने सामील झाली होती. टी. एफ्. एल. मध्ये येणारी मुले विविध विषयांवर चर्चा करतात, निबंध लिहितात.

(५) कॉलेजमधील भित्तिपत्रकाबरोबर 'विविध ज्ञान विस्तार' योजना असावी. मुख्यतः प्राध्यापकांनी ही योजना चालवावी. (उत्तम लेख, उत्तम चित्रे, विविध शास्त्रीय माहिती गोळा करून ह्या सदरात विद्यार्थ्यांसाठी देता येते.)

(६) कॉलेजच्या प्राध्यापकांची आणि बाहेरून बोलाविलेल्या पाहुण्यांची समाजापुढील तातडीच्या प्रश्नांवर अनेक व्याख्याने योजावी. उदा., भारतातील रुपयाचे अवमूल्यन, सोवियत देशाचा आर्थिक विकास, धर्म आणि समाज, गांधीजींचे कार्य. ही व्याख्याने वरकरणी, शोभेची आणि वक्तृत्वासाठी योजलेली नसून, सखोल विचारासाठी आणि विवेकशील विवेचनासाठी असली पाहिजेत.

(७) मागासलेल्या विद्यार्थ्यांचे काही खास प्रश्न आहेत. त्या प्रश्नांमुळे त्यांचे विचार आणि वागणेही इतरांहून भिन्न वाटते. त्यात कधी न्यूनगंड असतो, तर कधी वैरही असते! त्या समाजास हे बरे नाही आणि संबंध समाजासही हे बरे नाही. म्हणून हे प्रश्न कळून घेण्याची आणि थोडेफार सोडविण्याची यंत्रणा चालू करावी. त्यांची संमेलने भरविणे आणि वरिष्ठ प्राध्यापकांनी त्यांची गाऱ्हाणी ऐकणे, त्यांच्याशी सतत संपर्क ठेवणे आवश्यक आहे.

(८) हुशार मुले, पास–नापास ह्या सीमेवरील मुले, यांना वेगळे वेगळे भेटून त्यांच्या अभ्यासाच्या सुधारणा करणे शक्य आहे. कधीमधी चहाचा कार्यक्रम, वनभोजन वगैरे असणे इष्ट असते.

(९) दांडगाई करणाऱ्या मुलांना क्रीडादी कार्यक्रमांमध्ये सतत गाठता येते. त्यांच्याशी संपर्क ठेवून खूप चांगले काम होते. येथे चहाचा–वनभोजनाचा कार्यक्रम फलदायी होतो.

(१०) ग्रंथालयाची – वाचनालयाची सवय लावण्यासाठी अनेक योजना करता येतील. कॉलेजमध्ये ग्रंथालय आज ओस पडलेले दिसते. तेथे विद्यार्थ्यांना गोळा करणे शक्य आहे. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा, हेच मुळी आरंभी सांगितले पाहिजे. ग्रंथालयात 'शिवाजी', 'टिळक', 'गांधी', 'नेहरू', 'भारताचे राजकारण', 'महाराष्ट्र' असे वेगवेगळे विभाग करून ते विद्यार्थ्यांच्या चटकन् लक्षात येतील, असे ठेवावे. वेळोवेळी जे प्रश्न उपस्थित होतात त्यांवरील पुस्तके आणि नियतकालिके गोळा करून ती विद्यार्थ्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणता येतील. त्या त्या वर्गासाठी, त्या त्या पेपरवरील पुस्तके एकत्रित मांडून, त्यांचे 'प्रदर्शन' करता येते. सुट्टीमध्ये वाचनासाठी कोणते ग्रंथ न्यावे, त्याच्या याद्या विद्यार्थ्यांना वर्गवार देता येतील ही पुस्तके वेगळी काढून ती वाचणाऱ्यांची स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करता येईल.

(११) सुट्टीसाठी अनेक कार्यक्रम आखता येतील. सुट्टी म्हणजे आळसात वेळ घालविणे, हे समीकरण मोडलेच पाहिजे. सुट्टीसाठी मुले घरी जाण्यापूर्वी त्यांना अनेक कामे नेमून देता येतील.

(१२) विद्यार्थ्यास वर्षारंभी प्रवेश देताना आणि वर्षअखेर निरोप देताना काही मुद्रित साहित्य आकर्षक स्वरूपात हाती द्यावे. संस्थेची प्रतिमा त्याच्या मनात उमटण्यासाठी आणि त्याच्या कामाची रूपरेषा त्याला कळण्यासाठी ह्या साहित्याचा उपयोग होतो. ह्या साहित्यासाठी किंमत आकारू नये.

[आचार्यकुलाच्या पुण्यातील एका बैठकीसाठी तयार केलेला निबंध, ऑगस्ट १९६९]

६

शिक्षण : प्रसार, दर्जा आणि उपयुक्तता

शिक्षणाचा आजचा हा प्रसार पाहून सर्वांस समाधान वाटावे. समाजाच्या ज्या थरात शेकडो वर्षांचे अज्ञान होते, त्याच समाजात शिक्षणाची बिजली प्रकाशू लागली. जे थर दारिद्र्यात खितपत होते, त्यांना नवी उमेद प्राप्त झाली. सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी होऊ लागली. जी मागासलेल्या समाजातील मुले शाळा–कॉलेजात येऊ लागली, त्यांना 'आयन्तु ब्रह्मचारिणः' असे म्हटले पाहिजे आणि मायेने कवटाळले पाहिजे कारण ह्या मुलांच्या शिक्षणाने माणुसकी प्रत्यक्षात उतरते, न्याय वास्तव होतो आणि लोकशाही सार्थ होते.

स्वेदगंगा आणि वेदगंगा ह्यांचा हा मोठा संगम झाला असता मध्ये बांध घालणे करंटेपणाचे होईल. शाळा–कॉलेजांत प्रवेश देताना मागासलेल्या मुलांना मार्कांची अट घालणे अन्यायाचे होईल. ज्यांच्या पायी वहाणा नाहीत, ज्यांच्या कपड्यांना इस्त्री नाही, ज्यांचे चेहरे घामटलेले आहेत, ज्यांच्या मायबोलीत नागरीपणा नाही, ज्यांचे वागणे अवघडल्यासारखे असते, अशा विद्यार्थ्यांचा हा नवा वर्ग पाहून शिक्षकांना आनंद वाटावा. आता शिक्षण कृपणासारखे द्यायचे नाही, दामाजीच्या दिलाने द्यायचे आहे. सामाजिक क्रांती डोळ्यांपुढे घडत असताना विरोध करावयाचा ? असा विरोध इतिहास क्षम्य मानणार नाही. पण :

जे शिक्षण दिले जाते, त्याचा दर्जा आणि त्याची उपयुक्तता ही पाहिली नाहीत, तर ती मोठी वंचना ठरणार आहे. शिक्षणाचा कस ठेविला नाही आणि ते निरुपयोगी असले, तर ज्या समाजाला न्याय द्यावयाचा, त्याचा केवढा घात होईल ? हे दूध नसून पाणी आहे किंवा हा जिवंत घोडा नसून शोभेचा लाकडी घोडा आहे, हे त्या समाजास कळेल, तेव्हा त्याचा केवढा क्षोभ होईल ? औषधाच्या निर्मात्याने किंवा विक्रेत्याने रिकाम्या बाटल्या गोळा करून त्यांतून खडूची भुकटी

विकली, तर ते केवढे मोठे पाप ! ह्या दृष्टिकोणातून शिक्षणप्रसाराचा विचार केला पाहिजे. प्रसाराबरोबर दर्जा आणि उपयोगिता पाहिली पाहिजेत. शिक्षण ही अशी त्रिमिती चीज आहे.

शिक्षणप्रसाराचा जे प्रयत्न करतात, त्यांनी शिक्षणाच्या दर्ज्याचा आणि उपयोगितेचा विचार केला, तर त्यांना चालू पद्धतीत अनेक दोष आढळल्यावाचून राहणार नाहीत.

जे व्हायचे, ते चांगले, अस्सल असले पाहिजे, असे ठरल्यावर पुढील गोष्टींचा विचार मनात येतो :

(अ) बऱ्याचशी कॉलेजे सकाळी चालतात. सकाळच्या तीन तासांत पुरेसे अध्यापन करणे आणि विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या सभा–चर्चा–बैठका–खेळ यांना वाव मिळणे दूरापास्त झाले आहे. विद्यार्थी कॉलेजला उशिरा येणे आणि लवकर घरी परतणे हे नित्याचे होत आहे. ही सकाळची कॉलेजे कोणाकरिता ? दुपारची वामकुक्षी करता यावी, म्हणून शिक्षकांकरिता तर नव्हेत ! विद्यार्थ्यांकरिता आहेत, असे म्हणावे, तर विद्यार्थी दुपारचा वेळ फुकट घालवितो आणि संध्याकाळी कॉलेजच्या ग्रंथालयाकडे पुन्हा वळत नाही, असे दृश्य दिसते. ती दुपारी नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी असली, तर अशा विद्यार्थ्यांचे मुंबई–पुण्याबाहेर कितीसे प्रमाण आहे ? केवळ ह्या विद्यार्थ्यांसाठी बहुसंख्य विद्यार्थ्यांचा तोटा करणे योग्य नव्हे. तसेच नोकरी करणारे विद्यार्थी आणि विवाहित स्त्रिया यांच्यासाठी कॉलेजमध्ये न जाता बाहेरून परीक्षेस बसण्याची मुभा दिल्यावर सकाळच्या कॉलेजांना काहीच कारण उरत नाही.

गेल्या काही वर्षांत सकाळच्या कॉलेजांची सवय झाल्यामुळे आणि त्याच्या अनुषंगाने इतर सवयी जडल्यामुळे दुपारची कॉलेजे गैरसोयीची वाटतात. तसेच सकाळची कॉलेजे म्हणजे गरीब विद्यार्थ्यांचे कल्याण, असाही समज रूढ झाला आहे. पण सर्व संबंधितांनी आता उलटपक्षी फेरविचार करण्याची पाळी आली आहे. कॉलेजे दुपारच्या वेळी भरू लागली, तर अध्यापकांस भरपूर वेळ मिळेल, ट्युटोरियलचे वर्ग चुकवून निघून जाण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती कमी होईल, वादविवाद रंगतील, खेळांना जोम येईल व त्यांना ग्रंथालयात वाचत बसण्याची इच्छा होईल.

(आ) कॉलेजे दुपारी भरू लागली, म्हणजे विद्यापीठाने 'एक्स्टर्नल' पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी आणि संध्याकाळी काही कॉलेजांमध्ये व्याख्याने ठेवण्याची व्यवस्था करावी. ही व्याख्याने कॉलेजातील अनुभवी शिक्षकांची असावी आणि त्यांबद्दल विद्यार्थ्यांना मर्यादित फी आकारावी. एक्स्टर्नल पदवी सुरू झाल्यापासून काही अनधिकृत कॉलेजे निघाली आहेत आणि तेथे मिळणारे

शिक्षण कमअस्सल असते, हे लक्षात घेऊन दुपारच्या कॉलेजमध्ये सकाळी, संध्याकाळी विद्यापीठानेच एक्स्टर्नल विद्यार्थ्यांसाठी वर्ग भरविणे बरे. ज्या ठिकाणी अधिकृत कॉलेजे नाहीत, त्याच ठिकाणी एक्स्टर्नल पदवीच्या विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या साहाय्यावाचून अभ्यास करावा लागेल, त्याला इलाज नाही. मात्र जेथे जेथे कॉलेजांची सोय आहे, तेथे तेथे विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये अधिकांत अधिक वेळ राहावयास लाविले पाहिजे.

अधिकृत शिक्षणसंस्थेत बराच वेळ राहणे हा एक शिक्षणाचा मार्ग आहे. तेथील बैठकींतून, संघटनांतून अनेक गोष्टी विद्यार्थी शिकत असतो. अधिकृत आणि अनधिकृत संस्थांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे जे निकाल लागतात, त्यांची किंवा कॉलेजात नित्य जाऊन आणि कॉलेजात न जाऊन परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल यांची तुलना करण्यात अर्थ नाही. सर्वच शिक्षण आजच्या परीक्षा–पद्धतीत, निकालात प्रतिबिंबित होत नाही. अनधिकृत संस्थांतील शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सान्निध्यात बराच वेळ राहून जे शिक्षण होते, ते परीक्षांच्या निकालात व्यक्त होईलच, असे नाही; पण त्याला स्वतःसिद्ध असे महत्त्व आहे.

(इ) शिक्षणाच्या दर्ज्याचा विचार करताना शिक्षणाच्या बोधभाषेचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. ज्ञानाचा बोध व्हावयाचा, तर मातृभाषेवाचून दुसरे अध्यापनाचे माध्यम असू शकत नाही, हे शिक्षणशास्त्रदृष्ट्या निर्विवाद आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांत मराठी माध्यमाचा वापर करताना अनेक अडचणी आहेत आणि त्या प्रयत्नाने दूर केल्या नाहीत, तर ज्ञानसाधनेत बाधा येते, यात शंका नाही, परंतु त्यामुळे मराठी माध्यमावरील विश्वास ढळू देणे आणि इंग्रजीचा स्वीकार करणे हे अनैसर्गिक ठरेल.

इंग्रजीमध्ये ज्ञानभांडार खूप मोठे आहे; पण ते इंग्रजी माध्यमातून विद्यार्थ्यांकडे सुलभतेने येत नाही. नाटकापेक्षा नमनात जास्त वेळ जावा, तसे इंग्रजी कमाविण्यात विद्यार्थ्यांची बरीच शक्ती खर्च होते. इंग्रजीतून ज्ञान मिळाल्यावर ते विद्यार्थ्यांत सहज मुरत नाही. ज्ञान हे केवळ शोभेसाठी आणि नोकरीच्या परवान्यासाठी असे, तेव्हा इंग्रजी माध्यम चालले. पण ज्ञान अंगी मुरविण्यासाठी असेल, तर मराठी माध्यमावाचून मार्ग नाही. विशेषतः शिक्षण बहुजनसमाजापर्यंत नेण्यामागे जी प्रेरणा आहे, त्या प्रेरणेशी इंग्रजी माध्यम ही प्रतारणा ठरेल. विद्या ही एखाद्या वर्गाची मिरासदारी राहू नये, विद्येमुळे समाजाशी एकजीव न होणारा उपरा वर्ग तयार होऊ नये, ही जर आजच्या शिक्षणप्रसारामागील प्रेरणा आहे, तर ज्यांना या प्रेरणेमुळे शिक्षण मिळावयाचे, त्यांनी इंग्रजी माध्यमाची मागणी केली, तर त्यांच्या सद्हेतूची शंका येईल. त्यांच्यामागील प्रेरणा

ज्ञानाची नसून आपणही प्रगत वर्गासारखे मिरासदार व्हावे, मिरवावे आणि उपरे बनावे, अशी बहुजनसमाजाची आकांक्षा आहे, असा आरोप ते ओढवून घेतील.

मराठी माध्यमाविषयी आज मोठी प्रतिक्रिया झाली आहे. तिचा दोष संपूर्णतया विद्यापीठांकडे आणि सरकारकडे टाकावा लागतो, त्या माध्यमाकडे नाही. एक कारण असे, की मराठी माध्यमाचे यश इंग्रजी भाषा चांगली शिकविण्यावर असते. ही भूमिका असताना सरकारने शाळांतून इंग्रजीचे शिक्षण सात वर्षांतून चार वर्षांवर आणले होते आणि विद्यापीठांनी इंग्रजीकडे पूर्वीपेक्षा कमी लक्ष दिले ! बोधभाषा कोणतीही असली, तरी एक समृद्ध परकी भाषा ज्ञानसाधनेसाठी सहायक म्हणून घ्यावी लागते, अशी भूमिका पश्चिमी देशांत आहेच आणि भारतासारख्या मागास देशात असल्यास नवल नाही. ह्या सहायक भाषेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मराठी माध्यमास दौर्बल्य आले. दुसरे असे, की मराठी बोधभाषेची योजनापूर्वक आणि परिश्रमपूर्वक कोणतीच तयारी विद्यापीठांनी केली नाही. प्रत्येक विषयावरील निदान काही प्रमाणभूत पाठ्यपुस्तके, काही आधारग्रंथ आणि परिभाषा इंग्रजीतून भाषांतरित करण्याचे काम विद्यापीठांनी केले नाही. परिभाषेच्या समित्या नेमल्या आणि त्यांची कामे अनेक वर्षांत झाली नाहीत. पुस्तकांच्या बाबतीत विद्यापीठे बाजारपेठेच्या नियमांवर अवलंबून राहिली आहेत. मागणी आहे, त्यामुळे पुस्तके तयार होतील, असे विद्यापीठांनी मानले आणि स्वतःची जबाबदारी चुकविली. काही विषयांवर बाजारपेठेत पुस्तके आली नाहीत, तर काही विषयांवर हाताच्या बोटांवर मोजता येतील, इतकी पुस्तके तयार झाली. त्यांतली बरीचशी ज्ञानाच्या आणि भाषेच्या दृष्टीने अगदी सुमार आहेत. शिक्षकास परिभाषेच्या अडचणीमुळे शिकविणे जमेना. परिणामी मराठी बोधभाषेवर अवलंबून राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदरी काही पडेना. इंग्रजीची झोळी तर फाटकी होती. शिक्षणाचा दर्जा खालावला आणि विद्यार्थी व त्यांचे पालक खरा दोषी कोण, हे लक्षात न घेता मराठी माध्यमाच्या नावाने बोटे मोडू लागले आहेत.

बहुजनसमाजामध्ये अशीही एक भावना झाली आहे, की पुढारलेल्या वर्गांनी इंग्रजी शिकून घेतले, त्या बळावर मोठ्या जागा अडवून ठेविल्या आणि आता बहुजनसमाज कॉलेजपर्यंत पोचतो, तोच इंग्रजी कमी केले. मराठी माध्यमाच्या नावाखाली इंग्रजी कमी करून बहुजनसमाजाची फसवणूक चालू आहे, असा ग्रह झालेला दिसतो. इतके स्पष्ट कोणी लिहिलेले नाही, पण बहुजनसमाजातील काही वरचे किंवा बोलके लोक इंग्रजी माध्यमाचा कैवार घेतात, तेव्हा त्यांच्या मनात अशा प्रकारची भावना असावी, असे वाटते. ती भावना साहजिकच आहे. परंतु इंग्रजीकडे दुर्लक्ष झाले नसते, तर अशी भावना उद्भवली नसती, आणि ज्या

बहुजनसमाजाच्या हितासाठी मराठी बोधभाषेचा स्वीकार केला, तोच समाज ह्या भाषेविरुद्ध जाता ना.

काही विद्याशाखांसाठी मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही बोधभाषा आणि काही शाखांसाठी इंग्रजी बोधभाषा अशी व्यवस्था असावी आणि मराठी बोधभाषा जशी अधिक प्रभावी होईल, त्याप्रमाणे तिचे क्षेत्र वाढवावे आणि इंग्रजी बोधभाषेचे क्षेत्र कमी करावे. मात्र इंग्रजी ह्या भाषेचा अभ्यास माध्यमिक शाळा आणि कॉलेजांमध्ये शेवटच्या परीक्षेपर्यंत निदान दोन पिढ्या ठेवावा लागेल. मराठी माध्यमाचे यश कशावर अवलंबून आहे, ते लक्षात घेऊन विद्यापीठांनी त्याप्रमाणे योजनापूर्वक आणि निर्धाराने पावले टाकली पाहिजेत.

(ई) शिक्षणाची उच्च पातळी सांभाळण्याचे कार्य समाजाने, संस्थांच्या संचालकांनी आणि शिक्षकांनीही केले पाहिजे. सर्वच देशांत–केवळ कम्युनिस्ट राजवटीत नव्हे – राजकीय सत्ताधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते शिक्षण हे मूल्य स्वायत्त मानीत नाहीसे झाले आहेत. त्यांना सत्तेखेरीज सर्वच गोष्टी कःपदार्थ वाटतात किंवा सत्तेसाठी सर्व गोष्टी ते राबवू पाहतात. शिक्षणाच्या पावित्र्याबद्दल बोलावयाचे आणि विद्यापीठ आणि तदंतर्गत संस्था ह्यांवर लहानमोठी, दृश्य—अदृश्य दडपणे आणावयाची, ही सामाजिक रीत आणि राजकीय नीती झाली आहे. भारतातील एका राज्यात विद्यापीठाचे कुलगुरू सरकारने नेमावयाचे असता, एका वर्षात पाच कुलगुरू बदलण्यात आले!

सरकारला दोष लावताना विद्यापीठ काबीज करण्यासाठी काही शिक्षणसंस्था आणि शिक्षणतज्ज्ञ कशी धडपड करीत असतात, त्याचेही ओंगळ चित्र दिसते. संस्था चांगली चालविणाऱ्यांपेक्षा अनेक संस्था चालविणाऱ्यांची संख्या आणि सत्ता वाढते आहे. शिक्षणावर आणि संस्थांवर समाजात कोण काय टीका करील, त्याचा नेम नसतो. गाणे बरे, की वाईट, ते सांगताना गाण्यातील अनभिज्ञ माणूस कचरतो, घर बांधताना त्याचे खांब बारीक असावे, की मोठे असावे, ते इंजीनिअरला सांगताना मालकही दहादा विचार करतो. पण शिक्षण किंवा शिक्षणसंस्थांचा बरेवाईटपणा सांगताना कोणी कधीच कचरत नाही! ह्या सामाजिक परिस्थितीत विद्यापीठ आणि संलग्न संस्था गुणवत्तेचा विचार करून चालविणे अवघड झाले आहे.

शिक्षणसंस्थांनी इरेस बळी पडून किंवा प्रतिष्ठेच्या मागे लागून घाईने आणि अपुऱ्या तयारीने शाळा–कॉलेजे काढणे, शिक्षकांच्या आणि ग्रंथालयांच्या गुणवत्तेकडे पुरेसे लक्ष न देणे, परीक्षेचे नियम सैल करविणे, हजेरीकडे दुर्लक्ष करणे, शिस्तीवर भर देणाऱ्या शिक्षकांवर किंवा इतर संस्थांवर टीका करणे – ह्या गोष्टींमुळे शिक्षणाचा दर्जा निश्चितपणे कमी होतो आहे.

काही शिक्षकांची अवस्था अनुकंपनीय आहे. त्यांना अध्यापनात सुख वाटत नाही. आपण 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस'मध्ये गेलो नाही, त्याचे ते दुःख करीत असतात. काही शिक्षक आपल्याला संस्थेमध्ये संचालकाचे अधिकार नाहीत, त्याचे दुःख करतात. काही शिक्षक, आजचा विद्यार्थी बरा नाही, असे पहिल्या दिवसापासूनच गाऱ्हाणे सांगतात. काही शिक्षकांना कोणताही विचार चैतन्य देत नाही. एकंदर शिक्षकांत ह्या शिक्षकांचे प्रमाण जितके वाढेल, तितका शैक्षणिक दर्जा खाली येण्यास मदत होणार आहे. अशी एक अगदी साधी गोष्ट सांगता येईल, की ज्या धंद्यात वीस-पंचवीस वर्षे काढावयाची, त्या धंद्याची प्रतिष्ठा राहावी, असा जरी प्रयत्न शिक्षकांकडून सतत झाला, तरी घरंगळत खाली येणारा दर्जा वाढू शकेल. शिक्षणाच्या दर्ज्यावर शिक्षणसंस्थांची आणि शिक्षकाची प्रतिष्ठा सर्वस्वी अवलंबून आहे. त्यांच्यापुढे समाजकार्याची केवढी संधी उभी आहे. विद्यार्थ्यांचा एक नवा वर्ग पुढे उभा आहे आणि त्या वर्गाला नवे शिक्षण द्यावयाचे आहे. हे आव्हान आहे; तशी संधी आहे. हे आव्हान स्वीकारले, तर शंभरदीडशे वर्षांपूर्वी आज पुढारलेले दिसणाऱ्या समाजांना शिक्षण देण्याचे श्रेय जसे त्या पिढीतल्या शिक्षकांना मिळाले, तसे चालू पिढीतल्या शिक्षकांना मिळविता येईल.

(उ) शिक्षणाचा दर्जा खालावण्याचे आणखी एक कारण असे असावे, की शिक्षकाने कितीही मेहनत करून शिकविले, तरी विद्यार्थ्यांपासून ते शिकविणे दूर राहते. बोधभाषेमुळे जसे अंतर तयार होते, तसेच विद्यार्थ्यांचे वर्ग सभेसारखे मोठे असण्याने प्रत्येक विद्यार्थ्यास आपण अनेकांपैकी केवळ एक, असे वाटते, त्यामुळेही ते अंतर तयार होते. शिक्षकासही विद्यार्थी म्हणजे नुसता मेळावा वाटतो, ती अमूक अमूक माणसे वाटत नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये अनेक थरांचे विद्यार्थी असल्यामुळे शिक्षकास कोणतीही, अधिकांत अधिक समाधानकारक अशी पातळी गाठता येत नाही. अनेक विद्यार्थी घरच्या अडचणींत आणि स्वतःच्या नैराश्यात इतके गुरफटून राहिलेले असतात, की वक्तशीर हजर राहणे आणि अभ्यास करणे हे त्यांना जमत नाही. इतकेच नव्हे, तर तसा त्यांना उत्साहही नसतो. काही विद्यार्थी त्यांच्या अडचणींमुळे किंवा अपयशामुळे मोठ्या मूल्यांविषयी आणि थोर माणसांविषयी मनात अढी किंवा वैर बाळगीत असावेत. वर्ग लहान करणे आणि निदान काही विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होतात, की काय, ते पाहणे हे आवश्यक झाले आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षण परके किंवा बाह्य वाटण्याचे दुसरे एक महत्त्वाचे कारण आहे. ते असे, की जे त्यांना सांगितले जाते, ते त्यांना त्यांच्या स्वभावाच्या आणि अनुभवाच्या जवळचे वाटत नाही. आज जे शिक्षण मुख्यतः दिले जात आहे, ते वरच्या वर्गाला योग्य असे आहे. आतापर्यंत शिक्षणासाठी जे वर्ग येत होते

त्यांना साजेसे आहे. ह्या शिक्षणात रस वाटावयाचा, तर विद्यार्थ्याने आधी एक विशिष्ट आर्थिक आणि सांकृतिक पातळी गाठली असली पाहिजे. त्यामुळे आजच्या बऱ्याचशा विद्यार्थींना हे शिक्षण परके वाटल्यास नवल नाही. ह्या शिक्षणाचा विपरीत परिणाम होतो. तो असा, की विद्यार्थ्यांच्या गरजा वाढतात आणि तो मनाशी खोट्या कल्पना घेऊन बसतो. ह्या गरजांचा आणि कल्पनांचा त्याला त्याच्या वास्तव परिस्थितीशी मेळ घालता येत नाही. उलट, वास्तव परिस्थिती सुधारावी, असे त्याचे उत्पादनकौशल्य शिक्षणाने वाढविले जात नाही. वास्तवाशी तोंड चुकवून हा विद्यार्थी पांढरपेशांच्या नोकऱ्यांमध्ये स्वतःला गुंतवून घेतो. ज्या खेड्यातून आणि शेतावरून तो कॉलेजकडे आला, ते खेडे आणि शेत ह्या मुलास पारखे होते. जेव्हा तो विद्यार्थी चुकून गावाकडे परततो, तेव्हा खेड्यांची सुधारणा घडवून तेथील पुढारीपणा मिळविण्याची ताकद नसल्यामुळे हा तथाकथित सुशिक्षित पुन्हा पांढरपेशांच्या मार्गाने–शोषणाने, चलाखीच्या जोरावर पुढारपण करू पाहतो.

समाजातील गरजा वाढतात. उत्पादनकौशल्य वाढले नसल्यामुळे उत्पादन वाढत नाही. मागास समाजाच्या गरजा वाढल्यामुळे समाजाच्या एकंदर उत्पादनातून हा शिकलेल्यांचा वर्ग पूर्वीपेक्षा अधिक वाटा मिळवितो, विषमता कमी होते, पण एकंदर समाजाचे दारिद्र्य कमी होत नाही. किंबहुना एकंदर समाज भाववाढीच्या चक्रात सापडतो. उत्पादनात भर न पडता, वाटेकरी मात्र वाढतात. ह्या परिस्थितीत भाववाढ अपरिहार्य आहे. आणि भाववाढीच्या चक्रात गिरक्या घेताना समाजाच्या एका भागाने दुसऱ्या भागास लुबाडावे, असा क्रम चालू राहतो. मागास समाजात केवळ सांस्कृतिक शिक्षण दिल्याचा परिणाम हा असा होतो.

त्यामुळे उत्पादनकौशल्य वाढविणारे शिक्षण देणे अतिशय आवश्यक झाले आहे. स्वभावाप्रमाणे आणि अनुभवाप्रमाणे विद्यार्थ्यांस शिक्षण द्यावे. शिक्षण नाकारू नये; पण शिक्षणात कोणत्या शाखेकडे जावयाचे, त्याचे जरूर मार्गदर्शन झाले पाहिजे. उठल्या सुटल्या आर्टस्, कॉमर्स कॉलेजे उघडली जात आहेत आणि विद्यार्थी तेथे पदवीसाठी जात आहेत, ही परिस्थिती भयावह आहे. त्याऐवजी कौशल्य वाढावे, म्हणून धंदेशिक्षणाकडे विद्यार्थ्यांस वळविणे ही निकडीची गरज आहे. इतकेच नव्हे, तर धंदेशिक्षणासाठी शाळा-कॉलेजकडे वळविण्यापेक्षा थेट धंद्याकडे वळविणे हेही अधिक फायद्याचे ठरेल. तेथेही त्यास सरकारकडून स्टायपेंड देण्याची व्यवस्था करावी.

गरीब कुटुंबातील मुलांना किमान चार-पाच वर्षे कॉलेजात गुंतवून ठेवणे, हा त्या कुटुंबावरील अतिशय मोठा ताण आहे. ही मुले कॉलेजच्या गावी हालांत दिवस काढतात. शेवटी पदरी काय पडते ? चार-पाच वर्षांच्या महागड्या अभ्यास-

क्रमाऐवजी दीड-दोन वर्षांचे अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केले पाहिजेत. आणि वर सांगितल्याप्रमाणे हे अभ्यासक्रम उत्पादनकौशल्य वाढविणारे असले पाहिजेत.

अल्प मुदतीचे अभ्यासक्रम पार पाडून माणूस कामाला लागला, म्हणजे मनाच्या समाधानी अवस्थेत सांस्कृतिक ज्ञानाकडे सहज वळू शकेल. अशा माणसाच्या किंवा त्याच्या कुटुंबातील माणसांच्या फायद्यासाठी विद्यापीठाने डेन्मार्कमधील जनता कॉलेजसारखी सहामाही अभ्यासक्रमाची केंद्रे काढावी. असे केंद्र जिल्ह्यास एक असावे. ह्या केंद्रांत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सरकार, विद्यापीठ आणि जिल्हा परिषद यांनी आर्थिक साहाय्य करावे. जिल्हा परिषदेसाठी आणि त्याच्या खालच्या थरांसाठी जी जाणकार माणसे हवी आहेत, ती जनता कॉलेजांतून निर्माण होतील.

ही निकडीची कामे आहेत. ती झाली नाहीत, तर नोकरीवाचून इतर ठिकाणी निरुपयोगी ठरणारे हजारो विद्यार्थी बाहेर पडतील, बेकारीच्या आणि सतत भाववाढीच्या आवर्तात सापडतील आणि हा आवर्त समाजाला हालविल्याखेरीज राहणार नाही. शिक्षणासंबंधी नेमके धोरण न ठेवता शिक्षणाचा प्रसार करणे म्हणजे वाऱ्याचे बी पेरणे आहे; नंतर वादळाचे पीक घ्यावे लागेल. ही परिस्थिती टाळायची असेल, तर सरकारचे आणि विद्यापीठाचे तज्ज्ञ एकत्र बसून त्यांनी थोड्या अवधीत शिक्षणाचे धोरण दूरगामी दृष्टीतून निश्चित केले पाहिजे.

['नवसंदेश' (कोल्हापूर), शिवाजी विद्यापीठ विशेषांक, १८ नोव्हेंबर १९६२]

७
प्राध्यापकाची भूमिका

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच मी एका कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून प्रवेश केला. त्यावेळची प्राध्यापक मंडळी आणि आज काही वर्षांनंतर मी पाहात असलेली प्राध्यापक मंडळी यांत बराच फरक आहे, असे मला वाटते. त्यावेळी स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवाद आम्हांला बरीच वर्षे उपयोगी पडला. आज त्यांतले काही फारसे शिल्लक नाही. हे जर एक कारण सोडले, तर त्यावेळचे प्राध्यापक आणि आजचे प्राध्यापक यांमध्ये जी मला तफावत पडलेली दिसते, तिची दुसरी कारणे काय असावीत ? प्रत्येक पिढीला पुढच्या पिढीमध्ये दर्जा खालावलेला उगीचच वाटते, असे तर नाही ना ? स्वातंत्र्यानंतर लगेच भारतीय सनदी नोकरांपैकी मॉरिस झिंकिन या गृहस्थांनी राजीनामा दिला आणि काही वर्षांनंतर त्यांनी ' ते सनदी नोकर झाले तेव्हा, आणि स्वातंत्र्यानंतर ' असा एक लेख लिहिला. त्या लेखात ते दाखवितात, की स्वातंत्र्योत्तर काळातील न्यायाधीश युद्धपूर्व काळातील वकिलापेक्षा कमी दर्ज्याचा आहे आणि स्वातंत्र्योत्तर कॉलेजातील प्राध्यापक स्वातंत्र्यपूर्व हायस्कूल शिक्षकापेक्षा कमी दर्ज्याचा आहे. हे म्हणणे थोडेफार सत्य असावे, असे वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात या देशाकडे सततचे आव्हान आहे – ते आर्थिक विकासाचे आणि दारिद्र्य निवारण्याचे असेल, ते अज्ञाननिर्मूलनाचे असेल, ते सामाजिक अन्याय दूर करण्याचे असेल, ते समाजातील विग्रह मिटविण्याचे असेल, ते अनाचार दूर करण्याचे असेल ... आव्हान असले, तरी जी कार्यप्रवणता ह्या देशात यायला हवी होती, ती आली नाही, असे मानावे लागेल. ही कार्यप्रवणता अन्य क्षेत्रांत नाही, म्हणून शिक्षणक्षेत्रातही नाही. मला याचे आश्चर्य वाटते. आश्चर्य अशासाठी, की मला वाटते, शिक्षक हा एकच वर्ग

असा आहे, की ज्याला काळाच्या प्रवाहामध्ये नुसते पतित न होता स्वतंत्रपणाने समाजाचे चिंतन करून आणि स्वतःच्या भूमिकेचे चिंतन करून निश्चित कार्य हाती घेता आले असते. समाजातील इतर वर्गांना अशा चिंतनाची सोय किंवा सवय नसते किंवा ते वर्ग बोलून चालून स्वार्थ ही एकमेव प्रेरणा मानणारे असतात. शिक्षक हा इतरांपेक्षा वेगळा असला, तर त्याने हे स्वातंत्र्योत्तर काळातील आव्हान स्वीकारावयास हवे होते. निदान ह्या मागासलेल्या समाजामध्ये शिक्षकाने ह्या अधिक व्यापक भूमिकेचा अंगीकार करावयास हवा होता.

शिक्षकाच्या काही अडचणी अगदी स्पष्ट आहेत. वेतनाची कमतरता, नोकरीची अशाश्वती आणि समाजातील गौण स्थान या महत्त्वाच्या अडचणी आहेत. तिसरी अडचण ही बरीचशी पहिल्या दोन अडचणींतून आलेली असावी. पण ही अडचण खरी आहे, यात शंका नाही. ४–५ वर्षांपूर्वी 'किर्लोस्कर' मासिकामध्ये वरासाठी आलेली एक जाहिरात मी पाहिली. त्या जाहिरातीत म्हटले होते, की 'वर शिक्षक नसावा.' ही जाहिरात म्हणजे शिक्षकी पेशावरची सर्वांत कडक टीका होती, असे वाटते.

सुदैवाने अगदी अलीकडे या पहिल्या दोन अडचणी बऱ्याच दूर झाल्या आहेत. त्यामुळे तिसरी अडचण काही अंशी कालांतराने दूर होईल, असे वाटते. पण ती सर्वस्वी दूर होईल, असे नाही. पुढारलेल्या देशांतही इतर धंद्यांच्या तुलनेने शिक्षकी पेशात आर्थिक प्राप्ती अतिशय कमी असते. इतकेच काय, पण लंडनच्या प्राणिसंग्रहालयातील हत्ती केंब्रिजच्या प्राध्यापकांपेक्षा अधिक पैसा मिळवतो, असा बार्बेरा ऊटन यांनी उल्लेख केला आहे. शिक्षकाची प्रतिष्ठा वाढावयाची असेल, तर त्याने आपली मूळ भूमिका पक्की ठेवली पाहिजे. परदेशात ती असते.

आणखी काही अडचणी या समाजातच मूळ धरून आहेत. सरकारी नोकरीचे आमिष ही मागास देशातील एक खास प्रवृत्ती आहे. डॉ. डी. सी. पावटे यांच्या आठवणींमधील काही उल्लेख लक्षात घेण्यासारखे आहेत. 'आमच्या कालातील सर्वांत मोठे गणिती' असे प्रोफेसर रावलिन्सन यांनी त्यांचे वर्णन केले होते. हे सर्वांत मोठे गणिती बनारस हिंदू विद्यापीठात प्राध्यापक होते. परंतु मुंबई इलाख्यातील एज्युकेशन इन्स्पेक्टरची नोकरी त्यांना अधिक महत्त्वाची वाटली! अलीकडे बँका इ. धंद्यातील नोकऱ्यांचे आमिषही मोठे आहे.

प्राध्यापकांचा दररोजच्या गप्पांत जो वेळ जातो, त्याचाही त्यांनी विचार केला पाहिजे. ह्या गप्पांतून वृत्तपत्रांतील नव्या बातम्या, नियतकालिकांतील किंवा पुस्तकातील नवा विचार इ. बोध होतो, हा फायदा आहे. तरीही बराच वेळ वाया जातो, असे म्हटले पाहिजे. जे. बी. एस्. हाल्डेन मोठ्या उमेदीने भारतात काही

वर्षे प्राध्यापक म्हणून राहिले आणि परत जाताना त्यांनी 'हिंदू'मध्ये आपले अनुभव लिहिताना ह्या वाया जाणाऱ्या वेळाविषयी खास उल्लेख केला आहे.

शिकवावयाचे विषय पूर्वीपेक्षा सोपे आहेत, असे मला वाटत नाही. विषयांचा आशय वाढत आहे. बदल खूप होत आहेत. म्हणून शिक्षकांचे वाचन वाढावयास हवे आहे. ते वाढत नाही, असे दिसते आणि त्यामुळे शिकवणाऱ्याच्या आणि शिकणाऱ्याच्या वाट्याला कंटाळवाणा तोचतोचपणा येतो आहे. एखादा अर्थशास्त्रासारखा विषय जर घेतला, तर त्या विषयात इतके बदल–इतके लिखाण ग्रंथांतून, नियतकालिकांतून आणि दररोजच्या वृत्तपत्रांतून येत आहे, की ते थोडयाफार आस्थेने वाचणारा प्राध्यापक (आहे; पण) कमी आहे. अगदी जवळची उदाहरणे घ्यावयाची, तर नियोजनमंडळाचे अहवाल किती लोक वाचतात ? 'रिझर्व्ह बँक बुलेटिन', 'कॉमर्स' आणि 'इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल वीकली' किती लोक वाचतात ? निदान 'टाइम्स ऑफ इंडिया' नेमाने किती लोक वाचतात ? पाठ्यपुस्तकांखेरीज ज्यांनी ग्रंथालयातून इतर काही नेले नाही, असे बरेच प्राध्यापक असतील.

काही वर्षांपूर्वी अहमदनगर कॉलेजातील प्राध्यापकांबाबत एक अभ्यास केला गेला. त्यात ८८ पैकी ५५ प्राध्यापकांनी प्रश्नपत्रिकेला उत्तरे दिली होती. त्यांवरून त्यांच्या वाचनाबद्दल–लिखाणाबद्दल जी माहिती मिळाली, ती अशी :

- ☐ शिक्षकाने आपल्या विषयावरील सरासरीने किती पुस्तके वाचली ?
  आर्टस् – ४३, सायन्स – २३ एकूण – ३५
- ☐ शिक्षकाने नियमितपणे आपल्या विषयातील किती नियतकालिके सरासरीने वाचली ?
  आर्टस् – ४, सायन्स – ०.७ एकूण – ३
- ☐ किती शिक्षकांनी पुस्तके किंवा लेख प्रकाशित केले ?
  एक किंवा अधिक पुस्तके : आर्टस् – १० टक्के
  सायन्स – ००
  एकूण – ५.४ टक्के

  एक किंवा अधिक लेख : आर्टस् – १६.७ टक्के
  सायन्स – ००
  एकूण – ९ टक्के

इतर ठिकाणांची परिस्थिती यापेक्षा आणखी वाईट आहे. अलीकडे दिल्लीच्या दर्जेदार विद्यापीठांमध्ये काय चालले आहे, त्याबद्दल अखिलेश्वर झा नावाच्या

प्रसिद्ध लेखकाने 'टाइम्स ऑफ इंडिया'त (११ जून आणि १८ डिसेंबर ७७) दोन लेख लिहिले आहेत. दिल्ली विद्यापीठ आणि नवे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ येथील प्राध्यापकांची माहिती त्यात आहे. ९५ टक्के प्राध्यापक पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे काही वाचत नाहीत. त्यांतले थोडे लोक 'न्यूजवीक' आणि 'एन्काउंटर' वाचीत असल्यामुळे सरस ठरतात. प्राध्यापकांचे म्हणणे असे आहे : "वेळ कोठे असतो आम्हांला ? बाजारहाट करावा लागतो. मुला-बाळांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे लागते. त्यांच्या नोकऱ्यांसाठी प्रयत्न करावा लागतो. आणि सध्या घर बांधीत आहोत. त्याच्या कामात वघावे लागते." स्त्री-प्राध्यापकांमध्ये हे प्रमाण ९७ टक्के आहे. त्या दररोजच्या बातम्याही वाचीत नाहीत. घरकामांमुळे त्यांना फुरसत मिळत नाही. संशोधन आणि ग्रंथलेखन ह्या बाबतीतही अशीच शोककथा आहे. काय करायचे लिहून, असा एकंदरीत समज आहे. लेखन मुख्यतः पाठ्यपुस्तकांचे असते. ह्यावरून वरील लेखकाने निष्कर्ष काढला आहे, की वेतने आणि कामाची परिस्थिती सुधारून प्राध्यापकांच्या कामात सुधारणा होणार नाही. सुधारणा व्हायची असेल, तर एकंदर बौद्धिक वातावरण सुधारले पाहिजे.

हे खरे, की विद्यापीठात कॉलेजपेक्षा परिस्थिती अधिक बरी आहे. परंतु मोठ्या आणि शहरी कॉलेजांत लहान आणि ग्रामीण कॉलेजांपेक्षा परिस्थिती बरी आहेच, असे म्हणवत नाही. इतर देशांत विद्यापीठातील प्राध्यापक सहकार्याने जे काम करतात, त्याचे वर्णन वाचले, म्हणजे आपण कुठेच नाही, याबद्दल दुःख वाटते. केंब्रिज विद्यापीठात व्हाईटहेड आणि रसेल ह्यांनी जे काम केले, केन्स यांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून जे सिद्धांत मांडले, त्या तोडीचे काम येथे झालेच नाही. नुसता अभ्यासक्रम बनवणे किंवा पाठ्यपुस्तके तयार करणे यांसाठी बर्कली, कॉर्नेल आणि हार्वर्ड ह्या ठिकाणी सहकार्याने जे काम झाले, त्याच्या जवळपासही आपण कोठे नाही. गुरुशिष्यसंबंधांमध्ये दोघेही विचार-निर्मितीत एकमेकांचे किती ऋण लागतात, ते लक्षात घेण्यासारखे असते. हार्वर्ड विद्यापीठात शुंपीटर आणि स्वीझी हे विचारसरणीने अगदी भिन्न असे गुरुशिष्य एकमेकांवर किती अवलंबून असत, ते वाचल्यानंतर आमच्यांत असे गुरूशिष्य दिसतच नाहीत, याबद्दल हळहळ वाटते.

प्राध्यापकाची आपल्या विषयातील तयारी कमी आहे, कारण तो इतर विषयां-मध्ये काही विशेष वाचन करीत असेल, असेही नाही. तसे वाचन झाले असते, तर त्याचा आणि विद्यार्थ्यांचा केवढा मोठा फायदा झाला असता. त्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वांत अनेक अंगांनी विकास झाला असता. विज्ञानाच्या किंवा अर्थशास्त्राच्या माणसाला इंग्रजी आणि मराठी वाङ्मय आवडू

लागले असते. वाङ्मयातील माणसाला व्यवहाराचे चक्र कळले असते, विज्ञानातील कोडी उलगडली असती. सी. पी. स्नो नावाच्या एका आंग्ल प्राध्यापकाने, कादंबरीकाराने आणि मंत्र्याने 'दोन संस्कृती' नावाचे एक लहानसे पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकामध्ये विज्ञान आणि वाङ्मय ह्या कशा भिन्न संस्कृती झाल्या आहेत, याचे चित्र रेखाटले आहे. अशा भिन्न संस्कृतींत राहणे त्या संस्कृतींना उचित नाही आणि माणसांनाही उचित नाही. प्राध्यापकाच्या धंद्यात इतक्या विविध विचारांवरील पुस्तके हाताला लागतात, की ती वाचून दोन संस्कृतींचा घातकीपणा त्याला दूर करता आला असता. आमच्याकडे एकाने दुसऱ्याच्या विषयात लुडबूड करणे हे बिनबुडाचे समजतात, हे अज्ञानाचे द्योतक आहे. परिणामी, जो शिक्षक येथे दिसतो आहे, तो केवळ ज्ञानात उणा असे नसून व्यक्तिमत्त्वात ठेंगणा आणि आयुष्यात अनुत्साही असा आढळतो. त्याला कसले कुतूहल नसते, त्याला कसला शोध घ्यायचा नसतो.

रॉबर्ट गोदिनो या परदेशी लेखकाने 'दि इंडियन युनिव्हर्सिटीज्' नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात तो प्राध्यापकाचे वर्णन करतो, ते असे :

> "The teacher (in India) is only very moderately his work. It is not a passion with him, nor the essential by which he identifies himself. Because his security and comfort and his pride do not depend on a rigorous professional life, he neglects its pre-requisites, is careless about his own proficiency. He lacks vitality in his discipline. It does not animate or move him. For him, there are no unanswered questions. Once he has mastered and incorporated into his notes certain propositions and facts, he lets go all curiosity. His professional competence is a body of external knowledge, accumulated and piled up rather than inquired into or assimilated. He is too settled, too complacent, too willing to dissipate his energy in the trivial adjustments of an intellectually uninspiring domesticity."

सामान्य गोष्टी शिकवीत बसलेल्या, कुतूहल आणि उत्साह गमावलेल्या

प्राध्यापकाचे हे वर्णन झाले.

दुसऱ्या एका परदेशी लेखकाने (विल्यम रॉबसन) असेच वर्णन केले आहे. आमच्या प्राध्यापकापुढे पूर्वी नव्हते एवढे आव्हान आज आहे, असे म्हणून हा प्राध्यापक नवजागृतीचे कार्य विसरला आहे, असेही हा लेखक पुढे म्हणतो. येथील सर्व सुशिक्षितांची ही शोककथा आहे आणि प्राध्यापक त्यांच्यांत आहेत. रॉबसनने लिहिले आहे :

> " The younger intellectuals, whether teachers or students, are basically unsure of their role in society, and for this reason they sometimes lack self-confidence and a sense of direction. Never in the history of India was there such an exciting and exhilarating prospect as the present offers to the educated elite, never before were there such interesting and worthwhile problems waiting to be solved. Yet many of the younger teachers and older students are not merely frustrated, but they fail to identify themselves with the Indian renaissance. To ascribe this to the fact or the fear of unemployment is an inadequate explanation, though personal anxiety about the future does play a part. A much more important cause of apathy, scepticism, and pessimism is the widespread failure to recognise the role of the intellectual in society. "

एक प्राध्यापक मला आग्रहाने सांगू लागले, की त्यांना पदव्युत्तर अध्यापनाची संधी मिळाली पाहिजे. मी त्यांना ' का ? ' म्हणून विचारले. त्यांचे उत्तर असे, की त्यांनी पदव्युत्तर अध्यापन केले नाही, तर त्यांचे ज्ञान वाया जाते. मी त्यांना म्हणालो, त्यांचे ज्ञान पहिल्या पदवीच्या विद्यार्थ्यांना का देता येऊ नये ? ते वाया का जाते ? माझा स्वतःचा, विद्यार्थी आणि शिक्षक म्हणून, अनुभव असा, की जर दोन शिक्षक समोर असतील, तर त्यांतील कोणता एक दुसऱ्यापेक्षा अधिक वाचन केलेला आहे आणि अधिक उपयोगी आहे, हे सहजच कळते. प्राध्यापकाने वाचलेले वाया जाते, हे खोटे आहे. दुसरे एक शिक्षक त्यांच्यावर अन्याय

झाल्याचे सांगत होते. पीएच्.डी. करून त्यांना तीन वर्षे पुरी झाली होती. त्यानंतर पीएच्. डी.चे गाईड होण्यासाठी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे त्यांना दोन वर्षे थांबावे लागते. ह्यात त्यांच्यावर अन्याय होतो, असे त्यांचे म्हणणे होते. मी त्यांना विचारले, "आपण थीसिस्च्या पलीकडे जाऊन गेल्या तीन वर्षांत अधिक काय लिहिले ?" काही नाही. तरी त्यांचा समज, की ते पीएच्. डी. असल्यामुळे त्यांना पीएच् डी.चा गाईड होणे हे क्रमप्राप्त आहे.

जी काही पाठ्यपुस्तके अलिकडच्या काळामध्ये लिहिण्यात आली आहेत, त्यांतील बरीचशी मराठीत असतात. बरीचशी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये मंजूरही होतात. एखाद्या पुस्तकाला बक्षीसही मिळून जाते. ही पुस्तके काळजीपूर्वक पाहिली, तर त्यांत चुका आढळतात. जी पुस्तके दोघां-तिघांनी लिहिलेली असतात. त्यांतही एकाने दुसऱ्याच्या चुका पाहून त्या सुधारलेल्या असतात, असे वाटत नाही. नियतकालिकांमध्ये अभिप्राय काटेकोर नसतात आणि 'गोडीगोडी' बोलण्याचे सर्वांनाच मान्य असल्यामुळे कोण कोणाच्या चुका आहेत, असे म्हणत नाही. वाचकांचे नुकसान होते आणि त्या त्या विषयाची हानी होते. ही पुस्तके परीक्षांवर नजर ठेवून बेतलेली असतात. परीक्षांमध्ये जो तोचतोचपणा, तोच ह्या पुस्तकांमध्ये. चांगल्या विद्यार्थ्यांना ह्या पुस्तकांचा आणि परीक्षांचा उबग यावा. मराठी परिभाषा, ज्याला जी सुचली, ती त्याने वापरलेली असते. किंवा आधीच्या एखाद्याने जी चुकीची परिभाषा उपयोगात आणलेली असते, तीच पुढे चालविली जाते. परिभाषेची ही अनास्था जशी विषयाच्या प्रसाराला तशीच विषयाच्या वाढीलाही आड येते, याचे भान ठेवले जात नाही. जे पुस्तके लिहिणारे शिक्षक पुस्तकांचा वापर किंवा खप दीर्घकाल व्हावा म्हणून प्रयत्न करतात आणि अभ्यासक्रम बदलण्याच्या आड येतात, त्यांना काय म्हणावे ? नव्या अभ्यासक्रमाला विरोध करणाऱ्या शिक्षकांचा आणखी एक वर्ग असतो, तो म्हणजे ज्यांना नवीन अनेक पुस्तके वाचावयाची नाहीत, त्यांचा थोडाफार नवा विषय आला, तर नव्याने वाचावे लागेल, म्हणून त्या विषयाला विरोध ! त्यामुळे अमरीक सिंघ यांचा जळजळीत अभिप्राय येतो. कोठारी कमिशनच्या रिपोर्टावर टीका करताना डॉ. अमरीक सिंघ यांनी लिहिले आहे :

> "Had the Commission chosen to follow the logic of its line of enquiry it would have come to the conclusion that the crucial problem, at least in the field of higher education, is the unwillingness of the academics to change and to innovate and to provide leadership."

मागासलेल्या किंवा अविकसित देशांतील सुशिक्षितांची जबाबदारी आणि प्राध्यापकांची जबाबदारी खूप मोठी आहे. राममोहन रॉय, आगरकर, गोखले–रानडे, वि. रा. शिंदे, भास्करराव जाधव, डॉ. आंबेडकर ह्यांनी घेतलेली जबाबदारी येथे अभिप्रेत आहे. सबंध समाजाला त्याच्या आयुष्याची दृष्टी द्यावयाची आहे. त्यात विज्ञाननिष्ठा येईल, बुद्धिवाद येईल, नैतिक तत्त्वज्ञान येईल, इत्यादी. भोवतालचा गोरगरीब समाज पाहून आणि विशेषतः गरीब विद्यार्थी पाहून ह्या प्राध्यापकांचे काळीज द्रवले पाहिजे.

शिक्षकी हा धंदा आहे, पण त्यापेक्षा अधिक धर्म आहे. आधुनिक काळात कोणतेही कार्य संघटनेने आणि एका मोठ्या व्यवस्थेचा भाग म्हणून करावे लागते. त्याचे काही सेवानियम असतात. सेवानियमांत निर्वाहाची तरतूद, प्रगती आणि सुरक्षितता इत्यादी गोष्टी येतात. विग्रहाची आणि अन्यायाची शक्यता लक्षात घेऊन त्याबद्दलची उपाययोजना करावी लागते. अशा रीतीने शिक्षकीला धंद्याचे स्वरूप येते. पण हे एक अंग झाले. दुसरे अधिक प्रभावी अंग धर्माचे आहे. धंदा म्हणून काम करणारा कामगारसुद्धा मन लावून काम करतो आणि कार्यक्षम राहतो. शिक्षकांनी ते केलेच पाहिजे, पण त्याही पलीकडे गेले पाहिजे. शिक्षकांची विद्येवर आणि विद्यादानावर निष्ठा असलीच पाहिजे. सबंध समाजाचा विचार, आणि समोरच्या विद्यार्थ्यांचा विचार त्यांनी केला पाहिजे. कामगारांना 'एलियनेटेड' म्हटले, तरी शिक्षकांनी 'अलायड' असले पाहिजे. हा समाज मागासलेला आहे आणि ही मुले गरीब आहेत, म्हणून त्यांच्याबद्दल शिक्षकांना अधिक कर्तव्य वाटले पाहिजे. त्यांचे प्रेम वाटले पाहिजे. ही मुले तर अधिकाधिक खालच्या वर्गांतली येत आहेत. त्यांचा मागासपणा जाणवणार. पण ह्या मागासपणामुळे दुरावा वाटता नये. गोऱ्या साहेबापुढे दीड–पावणेदोन शतकांपूर्वी जो विद्यार्थी बसला होता, तो शिक्षकाच्या तुलनेने काय होता? आजची शिक्षक-विद्यार्थी तफावत सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक दृष्ट्या त्यापेक्षा अधिक खास नाही. म. फुले यांनी स्वदेशी शिक्षकापेक्षा गोरा शिक्षक अधिक जवळचा मानला, ही स्वदेशी शिक्षकावरची गंभीर टीका आहे. ती पुन्हा अनुभवाला येता नये. विद्यार्थ्यांच्या तथाकथित मागासलेपणात विद्येला आणि संस्काराला अनुकूल असे काही खास घटक आहेत, ते शिक्षकांना दिसले पाहिजेत आणि त्यांचा फायदा करून घेता आला पाहिजे. प्रतिकूल घटकांवर मात करण्यासाठी शिक्षकांनी आपली अध्यापनपद्धती बदलावी आणि अधिक कष्टही करावे. 'हे असेच' आणि 'हे इतकेच' असे म्हणणारा शिक्षक धंदा नीट करीत नाही आणि धर्म तर जाणीतच नाही.

[पालें येथील टिळक एज्युकेशन सोसायटीने प्रसिद्ध केलेल्या 'प्रोफाइल्स् इन इंडियन एज्युकेशन' ह्या ग्रंथातील लेखाचा मुक्त मराठी अनुवाद]

८
मराठीची प्रतिष्ठा

मराठी माध्यम, मुंबई शहर सोडले, तर इतर महाराष्ट्रात शाळा-कॉलेजांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. हे शहर सोडले, तर इतरत्र महाराष्ट्रात शासकीय स्तरावरही हे माध्यम मोठ्या प्रमाणावर चालू आहे. मंत्रालयाचा बराच कारभार मराठीत चालतो आणि जिल्ह्या-तालुक्यांचा कारभार बव्हंशी मराठीत असतो. शासनाचे कलेक्टरांसारखे इतरभाषिक अधिकारीही मराठी उत्तम रीतीने जाणतात आणि त्यांतले काही बऱ्यापैकी मराठी बोलतात. जिल्हा-तालुका न्यायालयांमध्ये ५०/६० टक्के काम मराठीत चालते. माझ्यासारखे इंग्रजी शिकलेले लोकही, जे आता साठीकडे जात आहेत, ते इंग्रजी आणि मराठी वाचन यांपैकी मराठी वाचन अधिक चांगल्या रीतीने करतात. 'लोकसत्ता'-'इंडियन एक्स्प्रेस,' किंवा 'नवशक्ती'-'फ्रीप्रेस' किंवा 'महाराष्ट्र टाइम्स'-'टाईम्स' अशी दोन्ही वृत्तपत्रे ज्यांच्या हाती लागतात, ते वाचक आधी त्यांतले मराठी भावंड वाचतात. त्यातला मजकूर तोच असला, तरी. मराठी वाचन सोपे वाटते, त्यातला मजकूर वेगळा असतो, तेव्हा, मराठी समाजाविषयी अधिक उत्सुकता असल्यामुळे मराठी वृत्तपत्र बरे वाटते. ज्यांना खास अभ्यास म्हणून अधिक विश्वसनीय मजकूर वाचायचा असेल, तर तेवढ्यापुरते इंग्रजी भावंड निवडले जाते. ह्यावरून असे म्हणावेसे वाटते, की मराठी माध्यमाचा प्रसार कमी आहे, असे समजण्याचे कारण नाही. इतकेच नव्हे, तर प्रसार पुढेसुद्धा कमी होईल, अशीही भीती असण्याचे कारण नाही. मराठी माध्यम हे इतके नैसर्गिक आहे, की त्याचा काही खास प्रयत्न न करता प्रसार झाला आहे आणि तो कमी होण्याची शक्यता नाही. प्रश्न आहेत ते असे: (१) मुंबईमध्ये आणि मुंबईच्या बाहेर, मोठ्या आणि मध्यम धंद्यांत मराठी भाषा का नसावी? मुंबईत विद्यापीठामध्ये का नसावी? मुंबईत आणि बाहेर शाळांमध्ये इंग्रजी

माध्यमाचे प्रयत्न का वाढत आहेत ? (२) जेथे मराठी माध्यम चालू आहे, तेथे ते अधिक प्रभावी कसे करावे ? मराठीचा अभ्यास कसा वाढवावा ?

मराठी माध्यमाची इतर देशी भाषांशी स्पर्धा चालू नाही. इतर भाषा म्हणजे फक्त हिंदी आणि उर्दू असू शकतात. मराठी भाषिक हिंदी माध्यमातून, ती अधिक समृद्ध भाषा समजून किंवा राष्ट्रभाषा असल्यामुळे, शिकताना दिसत नाहीत. मुस्लिमसुद्धा हिंदीतून शिकताना दिसत नाहीत. मुस्लिमांनी उर्दूची मागणी चालविली आहे. त्या मागणीमागे राजकीय हेतू असल्याची शंका येते. मुस्लिम समाज आपली पृथगात्मता प्रस्थापित करण्यासाठी उर्दू स्वीकारीत आहे. ही शंका सोडली, तरी असे म्हणावयास हरकत नाही, की महाराष्ट्रात ज्यांना उभे आयुष्य जगायचे आहे, त्या मुस्लिमांनी उर्दूमध्ये शिकणे त्यांच्या आणि महाराष्ट्राच्या हिताचे नाही. हा मुस्लिम विभाग शाळा-कॉलेजांत इतर समाजापासून दूर राहिला, तर राहिलेल्या आयुष्यातही थोडाफार दुरावा ठेवून राहील. नोकरी मिळविण्यातही त्याला अपपरभाव आहे, असे दिसेल किंवा वाटेल. त्यात ह्या विभागाला सुख लाभणार नाही. सबंध समाजासही ही आतली बेदिली योग्य नाही. ह्या भाषेतील साहित्यास आणि विचारास स्वतंत्रपणे अवश्यमेव मदत करावी. परंतु माध्यम म्हणून अवसर देणे अयोग्य आहे. त्या बाबतीतला नकाराचा निर्णय, दिसावयास लोकशाहीविसंगत असला, तरी वर दिलेल्या कारणांमुळे खरा लोकशाहीचा आहे. आज बाराव्या इयत्तेपर्यंत काही शाळांमध्ये उर्दू माध्यम आहे. ते यापुढे वाढवू नये. औरंगाबाद येथे एका शिक्षणशास्त्र कॉलेजात उर्दू माध्यम आहे. त्यातून शिक्षक तयार होतील आणि उर्दू माध्यम शाळांची संख्या वाढेल हा धोका आहे. सोलापूर येथे उर्दू माध्यम कॉलेज आर्ट्स-कॉमर्स पदवीसाठी काढण्याचा प्रयत्न झाला. तो वेळीच अपयशी झाला, हे बरे झाले.

मराठीच्या प्रसारास मोठा धोका आहे, तो इंग्रजीचा. खरे म्हणता, इंग्रजीला पोषक अशा नव्या प्रवृत्तींचा. इंग्रजी माध्यम हा जसा स्वतंत्र प्रश्न आहे, त्यापेक्षा अधिक प्रमाणात ह्या नव्या प्रवृत्तींचे अस्तित्व असाही प्रश्न आहे. ह्या प्रवृत्तींची दाद न घेता इंग्रजी माध्यमाचा धोका टाळता येणार नाही, हे पक्के समजावे. ह्या प्रवृत्ती अशा : अलीकडे सबंध समाज आणि ज्ञानार्जन ह्या संकल्पना कमीकमी होऊ लागल्या आहेत. मोठ्या समाजाच्या पोटात एक लहान व प्रभावी समाज जन्मास आला आहे.

मातृभाषेचे माध्यम का असावे ? ते नैसर्गिक असते आणि त्यातून सबंध समाजाशी संबंध राहतो. त्यातून सबंध समाज कळतो. प्रादेशिक विषमता, आर्थिक विषमता आणि जात न जुमानता मराठी भाषा सबंध समाजात एकसूत्रता

आणते. ज्ञानेश्वरांपासून काणेकरांपर्यंत आणि मर्ढेकरांपासून महानोर-मनोहरांपर्यंत कवींचे साहित्य वाचताना ह्या समाजाचा परिचय होतो. पण हा समाज जाणून घ्यायची ज्यांना जरुरी वाटत नाही, त्याच्याशी संबंध ठेवण्याची ज्यांना जरुरी वाटत नाही, त्यांना मराठीचे काय होय ? अशांची संख्या अलीकडे वाढते आहे. हे लोक व्यापार–धंदा शेतीमध्ये श्रीमंत झाले असतील किंवा बुद्धिबळावर डॉक्टर इंजीनिअर, ऑडिटर, प्राध्यापक, एक्झिक्युटिव्ह बनले असतील. त्यांना श्रीमंतीची ऐट आहे किंवा आपल्या कर्तृत्वाची शेखी आहे. हा कसला मराठी समाज, असे हे लोक तोंडाने म्हणत नाहीत, पण मनात मानतात. दोन भाषांची तुलना त्यांच्या मनात नाही, दोन समाजांची तुलना त्यांच्या मनात आहे— मोठा मराठी समाज आणि त्याच्या आतला लहान मराठी समाज. हा लहान मराठी समाज तथाकथित इंग्रजी मॉडेलवर किंवा खऱ्या इंग्रजी मॉडेलच्या भ्रष्ट पंजाबी मॉडेलवर तयार होत आहे. त्याची केशभूषा-वेषभूषा, त्यातील स्त्रियांचे ललित विभ्रम, मोटार–स्कूटर–रेफ्रिजिरेटर–टेपरेकॉर्डर–टेलिफोन–टेलिव्हिजन–चॉकलेट–च्युइंग गम ह्यांवर आधारित राहणी, वीकएंड आणि पार्ट्या यांचे प्रस्थ, रोटरी–लायनपासून जेसी–जायंटपर्यन्त पपा–मम्मी–बेबी यांचा संचार, परदेशी जाण्याची स्वप्ने आणि प्रयत्न, ही ह्या लहान समाजाची चिन्हे होत. आणखी एक चिन्ह म्हणजे बोली इंग्रजीचा वापर. इतरांना ग्रांथिक इंग्रजी येते, पण बोली इंग्रजीची झिंग काही वेगळीच. भलेभले मराठी लोक आणि त्यांतले थोरथोर विचारवंत, इंग्रजी माडेलला महत्त्व देतात. इंग्रजी माध्यम हे एका नव्या समाजाचे नुसते लक्षण आहे आणि ह्या माध्यमाशी भांडणार, म्हणजे ह्या नव्या समाजाशी, नव्या संस्कृतीशी भांडण होय.

गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रात जी आर्थिक व्यवस्था निर्माण झाली, तीतून हा लहान समाज तयार झाला. ह्या व्यवस्थेत मूठभर लोक फार श्रीमंत झाले. द्राक्षवाल्यांनी, शेतीतल्या हरितक्रांतीने आणि सहकारी कारखान्यांनी त्यात भर घातली. जी कुटुंबे लहान गावे सोडून मोठ्या शहरांत स्थायिक झाली, ती मुळातून तुटल्यासारखी वागू लागली. मॅनेजमेंट नावाचा पाचवा 'फॅक्टर ऑफ प्रॉडक्शन' सापडला आणि त्यातून एक्झिक्युटिव्ह नावाची जात वाढली. बँका आणि एल्‌आयूसीचे पगार उपयोगी पडले. मधला–खालचा वर्ग विलग पडला. त्या खालचा विसरलाच गेला. त्याला सरकारच्या खर्चात शाळा–कॉलेजात ठेवून किंवा खेड्यात 'डोल'वर ठेवून बाजूला काढता येते. ह्याच काळात स्वार्थपरायणतेला तीव्रता प्राप्त झाली. पूर्वीही समाज स्वार्थपरायण होता, पण अलीकडे स्वार्थाची तीव्रता वाढली आहे. श्रीमंतांची, तशी गरिबांची. ज्याला जे हाती मिळेल, त्याने ते लुटायचे आहे. शिक्षणक्षेत्रात परिणाम असा झाला, की एखादा

विषय चांगला करावा, असे फारसे वाटत नाही. थोडेसे वाचून परीक्षा उत्तीर्ण व्हावे आणि लूटमारीत सामील व्हावे, ही प्रवृत्ती पूर्वीच्या मानाने बळावली. थोडेसे वाचायचे, ते इंग्रजीत असेल किंवा मराठीत असेल. दोन्ही भाषांची तयारी फारशी लागत नाही. इंग्रजीची तयारी चांगली नसूनही इंग्रजी माध्यम वापरता येते. मग प्रतिष्ठेसाठी किंवा तथाकथित कौशल्यासाठी इंग्रजीत शिकायला हरकत राहात नाही. ज्ञानार्जनाची नैसर्गिक भाषा इत्यादी गोष्टी ह्या विद्यार्थ्यांस, आणि विशेषतः त्यांच्या पालकांस सांगण्यात अर्थ राहिला नाही.

कॉलेजच्या स्तरावरचे मराठीचे शिक्षणही, वाङ्मय वाढले असले आणि सुधारले असले, तरी सुमार झाले आहे. अनेक कॉलेजे निघाली आणि तेथे एम्. ए. सेकंड क्लास या पात्रतेवर प्राध्यापकांची मोठ्या संख्येने नियुक्ती झाली. त्यांपैकी पुष्कळांचे वाङ्मयाचे ज्ञान यथातथा, पुढचे वाचन यथातथा आणि रसिकताही सामान्य. मराठीच्या अध्ययनात–अध्यापनात इंग्रजी वाङ्मयाचे ज्ञान आजमितीस अत्यंत आवश्यक आहे. सौंदर्यशास्त्र, भाषाशास्त्र, टीकाशास्त्र हे विषय चांगल्यापैकी अवगत व्हायचे किंवा जागतिक वाङ्मयातील प्रवाह–प्रयोग माहीत व्हावयाचे, तर मराठीच्या चांगल्या अभ्यासकाला इंग्रजीचे परिशीलन आवश्यकच आहे. ते नसल्यामुळे मराठीचे अध्ययन-अध्यापन उथळ वाटते. मराठी शिकविताना केवळ लेखनबद्ध साहित्य शिकविले जाते. त्यात लोकवाङ्मय, फिल्म इ. नव्या माध्यमांतून येणारे साहित्य यांची भर घालता आली असती. साहित्याच्या अभ्यासाला इतिहास, राजकारण आणि समाजकारण यांचे सखोल संदर्भ देता आले असते. ते होत नाही, आणि अनाकर्षकता आणि अर्थहीनता येते.

मराठी माध्यमासाठी कोणी खास प्रयत्न केले, असेही विशेष घडले नाही. त्यामुळे माध्यम म्हणून मराठीची वाढ व्हावयाची, ती झाली नाही, असे खेदाने का होईना, मान्य करावे लागते.[☆] मराठी ललित साहित्य विपुल आणि चांगल्या दर्ज्याचे असले, तरी मराठीतील वैचारिक आणि वैज्ञानिक साहित्य फार कमी आहे आणि जे आहे, तेही त्या त्या ज्ञानशाखेच्या जागतिक तुलनेत सामान्य आहे– आकर्षक वाटण्यासारखे नाही. मराठी माध्यमाचा पुरस्कार मराठी साहित्यिक करतात, पण राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान इत्यादी विषयांमधले जाणते लोक (काही उत्तम अपवाद सोडता) करीत नाहीत, त्याचे कारण हे आहे. ज्यांना हे विषय चांगले कळतात (असेही थोडेच), त्यांनी मराठीत लिहिले नाही. मराठीत प्रगत पुस्तके झाल्यावाचून केवळ पाठ्यपुस्तकांवर माध्यम संपन्न

☆ 'भाषा : अंतःसूत्र आणि व्यवहार' (संपादक : मु. ग. पानसे) ह्या ग्रंथातील डॉ. भणगे ह्यांचा लेख.

होत नाही. मराठी माध्यमाचे थोरथोर पुरस्कत हे प्रगत पुस्तकांचे अनस्तित्व लक्षात घेत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. जितकी पाठ्यपुस्तके, त्याच्या अनेक पटींनी असे प्रगत ग्रंथ असावे लागतात, त्याची त्यांना दाद नाही. पाठ्यपुस्तकेही बाजारासाठी लिहिलेली, म्हणून सामान्य आहेत. (अपवाद असणे वेगळे). तीन तीन–चार चार लेखक २०० पानांचे पुस्तक घाईघाईने लिहितात. त्यात सूत्र नसते. चुका असतात. सवंग आणि सैल विधाने असतात. परिभाषा, ज्यास जशी हवी, तशी त्याने तयार केलेली असते. एखादे पुस्तक वाचून झाल्यावर दुसरे पुस्तक वाचण्याची सोय नसते – कारण परिभाषेची एकता नाही आणि विषय-स्वरूपाचीही एकता नाही. अशी पुस्तके वाचावयास सांगणे धोक्याचे. सरकारी अनुदानामुळे विद्यापीठांची पाठ्यपुस्तके तयार केली, ती तुलनेने बऱ्यापैकी आहेत. 'बऱ्यापैकी' एवढेच म्हणता येते. आहे त्या भोवतालच्या परिस्थितीत त्यांत आणखी सुधारणा करता आली असती काय, याबद्दल मला शंका वाटते. पाठ्य-पुस्तकेही इतकी व्हावयास हवीत, की त्यांच्यामध्ये स्पर्धा झाली पाहिजे आणि जी चांगली, ती टिकली पाहिजेत. आज असे होत नाही. ह्याची जबाबदारी मराठी साहित्यिकेतर विचारवंतांवर आहे. मराठीचे प्राध्यापक आणि इतर विषयांचे प्राध्यापक ह्यांनी हा दोष आपसांत वाटून घ्यावा.

केवळ पुस्तकलेखकांची ही जबाबदारी नाही. फुटकळ लेख आणि चर्चा साहित्यिक, वैचारिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांत कितीशा होतात? त्यांतल्या त्यात साहित्यविषयक लेख आणि चर्चा अधिक होतात. म्हणजे विशेष होतात, असे नाही. 'सत्यकथे' सारखे दर्जेदार मासिक ध्येयवादाने चालविलेले आहे. त्यातसुद्धा चर्चा तुटपुंजीच असते. वैचारिक चर्चेत 'समाज प्रबोधन पत्रिके' सारखी दोनचारच नियतकालिके आहेत. वैज्ञानिक विचारासाठी 'विज्ञानपरिषदे' पलीकडे बघण्याची सोय नाही. दैनिक वृत्तपत्रांनीच आणि त्यांच्या साप्ताहिक आवृत्त्यांनीच विशेष कार्य केले आहे. दररोजच्या घडामोडींच्या संदर्भात त्यांना लेखन करावेच लागते. पण याही पलीकडे चिरकालीन महत्त्वाचे लेखन देऊन त्यांनी मराठी माध्यमाची सर्वाधिक सेवा केली आहे. त्यात एकच दोष आहे. तोही अपरिहार्य-पणे आलेला आहे. वृत्तपत्रीय लेखन घाईने केलेले आणि छापलेले असते. त्यामुळे परिभाषेचे आणि निर्भेळ भाषेचे अवधान ठेवता येतेच, असे नाही. इंग्रजीतून मराठीत जी सामान्यनामे आली आहेत, उदा., प्रोफेसर, बस–त्यांची इंग्रजी पद्धतीची अनेकवचने सारखी खटकतात. सोपेपणाकडे लक्ष द्यावे लागत असल्यामुळे थोडासा गोलमालपणाही येतो.

माध्यमाच्या ह्या चर्चेवरून लक्षात यावे, की मराठी माध्यमाचा अधिक प्रसार करावयाचा आणि ते अधिक प्रभावी करायचे, तर ते काम एकदम होणारे नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
निबंध
२३०७०

समाजातील काही प्रवृत्ती आवरणे माध्यमाचा आग्रह धरणाऱ्यांच्या हाती नाही. समाजातले काही बदल घडवून आणणे हेही त्यांच्या हाती नाही. फक्त काही बाबतींतच आपण प्रयत्नशील राहू शकतो. आणि यश मंदगतीने मिळणार, हेही स्पष्ट असावे.

उच्च शिक्षणातील मराठीकरणाचे दोन अर्थ दिसतात. एक मराठी माध्यम, आणि दुसरा अर्थ म्हणजे मराठी हा विषय अधिक शिकविणे. पहिल्या अर्थाने मराठीकरणाला तत्त्वतः काही विरोध नसावा. मुंबईच्या बाहेर असे मराठीकरण बरेच झाले आहे. मुंबई बहुभाषिक आहे आणि ज्यालात्याला मातृभाषेत शिक्षण घेता यावे, एवढाच आक्षेप घेता येईल. ह्या आक्षेपात मातृभाषेची न्याय्य भूमिका मानण्यात आली आहे. मराठी भाषिकांसाठी मराठी माध्यम आणि इतरांसाठी हिंदी आणि इंग्रजी माध्यमे ठेवून एक व्यवस्था करता येईल.

इतर माध्यमे उपलब्ध असल्यावर मराठी भाषिक मराठी माध्यम मुंबईत घेतील काय? ह्या प्रश्नाचे उत्तर आजच्या परिस्थितीत होकारार्थी देणे अशक्य आहे. इतर भाषांतील पदवीधरांस महाराष्ट्र शासनाच्या बाहेर नोकरीसाठी अधिक प्राधान्य मिळणे, मराठी माध्यम नव्याने आल्यामुळे पाठ्यपुस्तके, विविध विषयांच्या शिक्षकांची मराठीची तयारी इ. प्रश्न, अनेक विद्यार्थी आकृष्ट करण्यासाठी होणारी विविध माध्यमांची शिक्षणविघातक स्पर्धा अशा अडचणीही असतील.

मराठी ह्या विषयाचे पेपर अधिक ठेवावे काय, हा प्रश्न जवळ जवळ सर्व विद्यापीठांत असेल. विज्ञानशाखेत आणि व्यापारशास्त्र शाखेत मराठीचा एक पेपर वाढविता येईल, असे म्हणतात. आर्ट्स् शाखेत मराठीला पर्यायी भाषा नसाव्या किंवा त्या कमी कराव्या, असे म्हणतात. येथे असे विचारता येईल : शिक्षणात आणि समाजात मराठी माध्यम यशस्वी व्हावे, ह्यासाठी हा आग्रह आहे काय? मराठी समाज अधिक कळावा, ह्यासाठी हा आग्रह आहे काय? शाळेपासून आज मराठीचे जेवढे पेपर आहेत, त्यांचे आशय बदलले, तर ही दोन्ही उद्दिष्टे साधता येतील. त्या दृष्टीने मराठीचे प्राध्यापक आणि इतर तज्ज्ञ ह्यांनी विचार करावा.

इतर विषय कमी करून मराठीचे पेपर वाढवावे, असे म्हणण्यातले दोन धोके मराठी अभिमान्यांच्या फारसे लक्षात आलेले दिसत नाहीत. एक धोका असा, की इतर विषय शिकविणारे प्राध्यापक आणि इतर अभिमानी मराठी शिक्षकांच्या विरोधी जातात. मराठीकरणाचे विरोधक वाढतात. असा विरोध आज बराच तयार झाला आहे. शासनाच्या आणि विद्यापीठ अधिनियमांच्या साह्याने ह्या विरोधास तोंड द्यावयास जाणे बरे नाही. दुसरा धोका असा, की मराठी शिकविण्यासाठी दुसऱ्या विषयांचा अव्हेर करणे चुकीचे ठरेल. मराठी समाजाच्या विकासासाठी, संपन्नतेसाठी आणि आधुनिकीकरणासाठी अनेक विषयांची जरुरी

आहे. हे विषय टाळणार काय ? नागरिकशास्त्र, इतिहास ह्यांसारखे जुने विषय आणि परिदूषण, वनस्पती–संरक्षण इ. विषय चुकविणार काय ? त्यात मराठी समाजाचा घात आहे. मराठी समाज मागे राहिला, तर मराठी भाषा पुढे जाते, असे मानता येत नाही. 'घातास योजितसे' असे मराठीकरण नसावे.

जेथे मराठी माध्यम रूढ झाले आहे, तेथले प्रश्न कोणी लक्षात घेत नाहीत, असे वाटते. जेथे हे माध्यम रूढ झाले, तेथे ते प्रभावी कसे व्हायचे, त्याचा विचार करावा. मराठीतून जे पुस्तके लिहितात आणि जे अध्यापन करतात, त्यांच्या भाषाशिक्षणाची काही व्यवस्था झाली नाही. त्यांची भाषा अत्यंत सुमार राहिली आहे. ते ते विषय विद्यार्थ्यांस रुचावयाचे, त्यांच्यामध्ये प्रभावी व्हावयाचे आणि त्या त्या विषयांवरील लेखन–अध्यापनाची खोली वाढवायची, तर भाषा खूप सुधारली पाहिजे. परिभाषेचा प्रश्न स्वतंत्र नसून त्यात समाविष्ट आहे.

परिभाषा तयार करण्याचे अल्प प्रयत्न पुणे विद्यापीठाने खूप वर्षांपूर्वी केले. अलीकडे परिभाषा शासकीय मंडळांकडून तयार होते. ती परिभाषा तयार करणाऱ्यांना काही तत्त्वे दिलेली असतात. पण त्यांच्यापैकी कितीजणांना भाषेचे ज्ञान आहे ? त्यांच्यापैकी कितीजणांनी मराठी आणि इतर भाषांत किती लिखाण केले आहे, त्याची माहिती मराठीच्या अभिमान्यांना मिळाली, तर ती आश्चर्यजनक वाटेल. ज्यांना भाषेचे ज्ञान आहे आणि लेखनाचा सराव आहे, अशा मंडळींनी लक्ष घालावे, तर ही परिभाषा चर्चेसाठी फारशी प्रसृत केली जात नाही. काही विषयांची परिभाषा गेल्या पंधरावीस वर्षांत पुरी झाली नाही, हे शासकीय कामात अपरिचित नसले, तरी मराठीच्या अभिमान्यांस रुचणारे नाही. ही परिभाषा तयार होऊन आली, तरी ती उपयोगी ठरेल, असे नाही. कारण आधीच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतून आणि 'विश्वकोशा'च्या खंडांतून जी परिभाषा रूढ झाली असेल, ती ढकलून काढणे शक्य होणार नाही. (इष्ट असेल की काय, ते वेगळे). 'रूढिर्बलीयसी' हे एक कारण. पुस्तके समाजात पसरतात; पण परिभाषाकोश शासकीय भांडारात बंदिस्त राहतात, हे दुसरे कारण.

मराठी माध्यमातील 'पाठ्यपुस्तक मंडळा'ची पुस्तके खाजगी क्षेत्रात निघालेल्या पुस्तकांपेक्षा अधिक चांगली आहेत असे समजलो, तर त्यांचीही अशीच परिस्थिती ओढवलेली आहे. खाजगी क्षेत्रातली पुस्तके रूढ झाली आहेत किंवा विद्यापीठातील अभ्यासमंडळांकडून सदस्यांच्या प्रयत्नांनी मंजूर होऊन येत आहेत. पाठ्यपुस्तक मंडळाची पुस्तके मंडळाच्या भांडारात वाढत आहेत. केवळ सार्वजनिक क्षेत्राची विक्रीबद्दल अनास्था, हे एवढे एकच कारण नसून 'वरातीमागून घोडे' अशी अवस्था जशी परिभाषेची, तशी ह्या ग्रंथांची. आणखी एक अडचण आहे. पाठ्यपुस्तक मंडळाची पुस्तके तयार होऊन आली, तोपर्यंत विद्यापीठांतील अभ्यास-

क्रम बदलले. म्हणून काही पुस्तके निरुपयोगी झाली. विद्यापीठांच्या कुलगुरूंनी ह्या प्रकरणी लक्ष घालून पाठ्यपुस्तक मंडळाची पुस्तके त्यांच्या त्यांच्या विद्यापीठात अधिकाधिक कशी वापरली जातील, ते पाहिले पाहिजे.

मराठीकरणाच्या मोहिमेत, विशेषतः भाषेच्या प्रतिष्ठेसाठी 'प्रमाण मराठी' अशीही कल्पना मांडली जाते आहे. अमूक शब्दयोजना–तमूक वाक्यप्रयोग प्रमाण नाहीत, असे म्हटले जाते. ह्या बाबतीत धोक्याची सूचना द्यावयास हवी. ती अशी, की प्रमाण मराठी आजच ठरविता येणार नाही आणि ती ठरविण्याचा प्रयत्न झाल्यास मराठीच्या प्रेमाला आणि प्रसाराला अडथळे येतील. गेल्या थोड्या वर्षांत मराठी समाजातील (तथाकथित) खालच्या थरांतील लेखक पुढे येत आहेत आणि त्यांच्याबरोबर मराठी साहित्यात आणि भाषेत नवे शब्द, नवी शब्दरूपे आणि नवे वाक्यप्रयोग येत आहेत. पुणेरी भाषेबरोबर इतर जिल्हाभाषा येऊ लागल्या. नागरी भाषा ग्रामीण होऊ लागली. शाकाहारी भाषा मांसाहारी होऊ लागली. ललित भाषा दलितांची वेदना सांगू लागली. हा प्रक्रम पुढे चालू राहिला पाहिजे. प्रमाण भाषेच्या मागे लागून हा प्रक्रम रोखता नये. दोन–चार पिढ्यांनंतर स्थिरावणारी भाषा प्रमाण म्हणता येईल.

शासनात आणि विद्यापीठात मराठीचा वापर निश्चितपणे वाढविता येईल. प्रशासनात अडचण दिसत नाही. शासनाने मराठी ह्या विषयाच्या परीक्षेचे गुण, उमेदवार नेमताना लक्षात घ्यावे. ते मराठी भाषिकांस निदान ४५ टक्के असावे आणि इतरांस निदान ३५ टक्के. त्यामुळे ह्या भाषेचा नीट अभ्यास होईल आणि मराठी माध्यमासही महत्त्व येईल. विद्यापीठात अडचणी आहेत. मुंबई विद्यापीठात आणि टाकरसी विद्यापीठात मराठी माध्यम ऐच्छिक ठेनवूही त्याची भागणी नसली, तर काय करणार? सरकारने वरीलप्रमाणे परीक्षा ठेवल्यास थोडी मदत होईल. मराठी ह्या विषयाचे अध्ययन कॉलेजच्या स्तरावर मराठी भाषिकांस सक्तीचे करणे मला मान्य नाही. त्या भाषेची उपयुक्तता पटली आणि आकर्षकता वाटली, तरच ती भाषा शिकावी, असे मी मानतो. धंद्यात तर मराठी लादणे अशक्य आहे. भाषा लादली, तर राग येतो आणि वैर वाढते. भाषा-शिक्षणात ह्याच गोष्टी टाळावयाच्या असतात.

परिभाषेची निर्मिती, पुस्तक-लेखनाला आणि भाषांतराला उतेजन, शिक्षकांची भाषेची तयारी, भाषेची अभिवृद्धी, विविध शाखांतील ज्ञानाचा आणि एकंदर भाषा यशस्वी करण्याबद्दलचा सल्ला यांसाठी एखादे नवे मंडळ काढणे आवश्यक झाले आहे. जी वेगवेगळी मंडळे कामे करीत आहेत, त्यांच्या कामांत सुसूत्रता आणली पाहिजे. त्यांच्या कामांची गती वाढविली पाहिजे. ते काम ह्या नव्या मंडळाचे. नव्या मंडळाने इतर संबंधितांकडे प्रश्न मांडावे, त्यांना सल्ला द्यावा. नव्या

मंडळाने प्रयोगशील असावे. नव्या मंडळात सरकारचे, विद्यापीठांचे, साहित्य-संस्थांचे आणि काही प्रातिनिधिक संस्थांचे अत्युच्च अधिकारी असावे. ह्या मंडळाचे प्रत्यक्ष कार्य करणारे अधिकारी मराठी भाषा आणि इतर क्षेत्रांतले विशेष तळमळ असणारे असे पाहिजेत. लोकांच्या विश्वासाला पात्र असे असले पाहिजेत. तरच ह्या मंडळाचे कार्य प्रभावी होईल.

हे काम अनेक वर्षांचे आहे. कदाचित एका पिढीचे आहे. हे काम चालू असताना ह्या सबंध पिढीनेच कार्यशील राहिले पाहिजे. शासनाने आणि विद्यापीठांनी निर्णय घेतले आणि कार्य करण्यास काही मंडळे उभी राहिली, तरी आवश्यक ती वाढ होणार नाही. आम्ही सर्वच अभिमान्यांनी कामाला लागले पाहिजे. विशेषतः आमच्या पिढीने. आमच्या पिढीचा मी दोन कारणांसाठी आवर्जून उल्लेख करीत आहे. एक असे, की स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजनिष्ठेचा आमचा वारसा मोठा आहे. दुसरे असे, की आम्ही मराठी भाषेवर प्रेम करताना आमचे इंग्रजी भाषेचे आणि त्या भाषेतील विविध साहित्याचे ज्ञान चांगल्यापैकी आहे.

आमच्या जबाबदाऱ्या थोडक्यात सांगतो :

(१) विविध विषयांवर मराठीत खूप लिहिले पाहिजे. खूप–खूप. राजवाड्यांनी पहिल्या महायुद्धापूर्वी महाराष्ट्रातील शंभर वर्षांतील बुद्धिमान आणि कर्त्या माणसांची यादी तयार केली होती. ती दीडदोनशेच्या पलीकडे गेली नाही. त्यांनी ह्या माणसांचे प्रमाण काढले, ते १० लाखांत एक असे होते. उलटपक्षी, त्याच कालखंडात इंग्लंडात ते १ लाखात ४ असे होते. म्हणजे महाराष्ट्रात आणि इंग्लंडात एकास चाळीस असे प्रमाण. पु. मं. लाडानी दुसऱ्या महायुद्धापूर्वी पुण्यात शारदोपासक संमेलनात म्हटले होते, की मुळामुठेच्या काठी ऋषिमुनी झाले नाहीत, गंगेच्या काठी झाले नाहीत, ते कॅम नदीच्या काठी झाले. आजही महाराष्ट्राला अनुकूल असा फार फरक झाला असेल, असे वाटत नाही. महाराष्ट्री-यांनी खूप कष्ट केले पाहिजेत, ह्यात शका नसावी. विविध आणि विपुल लेखनाचे मराठी माध्यमासाठी असलेले महत्त्व मी वर सांगितलेच आहे.

(२) ह्या लेखनात भाषांतरही खूप यावे. राजवाड्यांनी १८९४ मध्ये 'भाषांतर' नावाचे मासिकच सुरू केले होते. आज अशा मासिकाची आणि इतर भाषांतरांची नितांत गरज आहे. भाषांतरे स्थानिक लेखनाच्या आड येतात, असे समजण्याचे कारण नाही. किंबहुना, भाषांतरांमुळे विचाराला चालना मिळून स्थानिक लेखनाला उत्तेजन मिळेल.

(३) इंग्रजीचा व्यासंग चालू राहिला पाहिजे. इंग्रजी माध्यम आणि इंग्रजीवर पोसलेले (परभृत) मराठी वाङ्मय ह्या गोष्टी कटाक्षाने टाळावयाच्या असल्या, तरी इंग्रजीचा व्यासंग हवाच. मराठी भाषेचा, माध्यमाचा, साहित्याचा आणि

समाजाचा एखाद्या परकी भाषेला (म्हणजे इंग्रजीला) विरोध नसावा. जर्मनीत किंवा रशियात स्वभाषेचा अभिमान–आग्रह असूनही इंग्रजीचा उत्तम अभ्यास होतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

(४) सबंध समाजाच्या संकल्पनेवर विश्वास असला पाहिजे. आज वरिष्ठ आणि कनिष्ठ जाती ह्यांमध्ये अविश्वास आहे. कनिष्ठांकडे भाषा आणि विद्वत्ता असू शकतात, ह्याबद्दल वरिष्ठांत साशंकता असते. न्यायमूर्ती रानड्यांसारख्या लोकहितैषी सज्जनात ती होती, पण आजही चालू आहे. असे असले, तर कनिष्ठांकडून लेखन आणि विचार व्हावा कसा ? उलटपक्षी, लेखन आणि विचार वरिष्ठांचा वरिष्ठांसाठी आहे, अशी अढी कनिष्ठांमध्ये असते. त्यांचा वरिष्ठांचे लेखन आणि विचार टाळण्याकडे कल असतो. ही परिस्थिती दोघांसही वाईट आहे. भाषेच्या बाबतीतही वरिष्ठांची आणि कनिष्ठांची अशी जातवारी आहे. भाषेमध्ये जास्तींत जास्त समाज मावला पाहिजे. भाषा हे समाजाच्या बांधणीचे सूत्र असायचे, समाजातील वाढत्या अभिसरणाचे तत्त्व असायचे, तर भाषा सर्वमान्य आणि सुलभ असली पाहिजे.

(५) मोठ्या समाजाच्या पोटात जो नवा लहान समाज वाढत आहे, त्याला प्रतिष्ठा देऊ नये. त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली, तर बाहेरच्या मोठ्या समाजातील तरुण मुले नाउमेदीत जगतात. अशी नाउमेद असली, तर कसला आमचा मराठी समाज आणि कसली मराठी भाषेची यातायात करायची ?

[मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे झालेल्या शारदोत्सव व्याख्यानमालेतील उद्घाटनाचे भाषण, ६ ऑक्टोबर १९७८]

९

विद्यापीठाचे कार्य

आपल्या देशातील विद्यापीठीय क्षेत्रात अशा काही घटना घडतात, की ज्यांमुळे त्या त्या वेळी तिकडे आपले लक्ष जाते. विद्यार्थ्यांचा मोर्चा, परीक्षांचे निकाल, विद्यार्थ्यांची कार्यक्षमता, प्राध्यापकांचा गौरव, प्रशासनातील भले-बुरेपणा, कुलगुरूंच्या नेमणुका इ. घटना आपले लक्ष वेधून घेतात. त्या त्या वेळी आपण त्यावर विचार करतो. मित्रांशी बोलतो, वाद घालतो आणि शेवटी कोणी तरी 'खमक्या नेता' मिळाल्याशिवाय विद्यापीठातील अनेक गोष्टींची तड लागणार नाही, असे आपण बोलून जातो. 'सुजाण, कणखर व ध्येयवादी नेतृत्व' हा सर्व रोगांवर उपाय आहे, ही आपली भावना बोलून दाखवितो. मग नेत्यांविषयी विचार सुरू होतात. महाराष्ट्रातील विद्यापीठीय नेतृत्व बदलण्याचा म्हणजेच कुलगुरू नेमण्याचा प्रसंग २–३ महिन्यांपूर्वीच हाताळला गेला. त्यानुसार शिवाजी विद्यापीठासाठी प्रा. डॉ. भा. शं. भणगे ह्यांची नियुक्ती कुलगुरुपदी झाली. त्यांच्या नियुक्तीचे वृत्त ऐकताच सर्वत्र समाधान पसरले. डॉ. भणगे कुशल प्रशासक, क्रियाशील विद्वान, समतोल वृत्तीचे, पुरोगामी विचारांचे, अनुभवी, संपन्न व समर्थ व्यक्तिमत्त्व असलेले व्यासंगी व व निःस्पृह आहेत, हे सर्व महाराष्ट्र जाणतो. त्यांच्या प्रयत्नांमुळे काही तणाव कमी होतील, काही प्रश्नांची तड लागेल, काही नवीन व उपयुक्त पायंडे पडतील, अशी कल्पना सर्वत्र बोलली गेलेली मी ऐकली व त्याच वेळी डॉक्टरसाहेबांच्याकडे जाऊन त्यांना हे सांगावे व त्यांचेही मनोगत समजावून घ्यावे, असे वाटल्यावरून त्यांना भेटलो. त्यांनीही मोकळ्या मनाने आपले विचार सांगितले.☆

☆ डॉ. भणगे यांची प्रा. के. ना. देशपांडे (बार्शी) ह्यांनी घेतलेली मुलाखत.

डॉ. भणगे यांच्या शिक्षकी पेशाचा अनुभव फार मोठा आहे. लेक्चरर, प्राध्यापक, प्रिन्सिपॉल म्हणून सर्व एकत्रित अनुभव ३१ वर्षांचा आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणाच्या, शिक्षकांच्या, संस्थाचालकांच्या, विद्यार्थ्यांच्या सुखदुःखांची व स्वप्नांची यथार्थ कल्पना आहे. पदव्युत्तर शिक्षकाचा म्हणून २५ वर्षांचा व प्रिन्सिपॉल म्हणून २१ वर्षांचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. कोल्हापूर, पुणे, मुंबई अशा महत्त्वाच्या व जागरूक शहरांत त्यांनी कॉलेजांची सर्व प्रकारची व सर्व पातळींवरील जबाबदारी यशस्वी रीत्या पार पाडली आहे.

कॉलेजची उभारणी करण्यापासून तो ते नावारूपाला आल्यानंतर सुयोग्य व्यक्तीच्या हाती सुपूर्त करण्याच्या निष्काम कर्मयोग्याची वृत्ती त्यांनी जाणीवपूर्वक जपली आहे. अधिकारांचा त्यांना मोह नाही. ध्येयवादी व व्यासंगी शिक्षक म्हणून सर्वत्र आपली प्रतिमा तयार करण्यात त्यांनी यश मिळविले आहे.

कुलगुरू डॉ. भणगे ह्यांनी आपल्या शक्ति-बुद्धीचा फायदा फक्त कॉलेजच्या क्षेत्रात बंदिस्त करून ठेवला नाही, तर तो बाहेरच्या जगाला मिळावा, म्हणूनही विविध प्रकारच्या वाटा चोखाळल्या आहेत. समाज-प्रबोधन हा त्यांच्या आवडीचा भाग आहे. त्यासाठी विविध विषयांवर लेख लिहिणे, व्याख्याने देणे, पुस्तके लिहिणे हे सारखे चालू असते. अर्थशास्त्र, राजकारण, वाङ्मय, शिक्षण ह्या क्षेत्रांत त्यांनी खूप लिहिले आहे. 'भारतीय प्रबोधन' 'साहित्यविचार आणि समाजचिंतन' आदी पुस्तकांचे संपादन करताना त्यांनी खूप श्रम घेतले आहेत. गेली ६ वर्षे ते 'समाज प्रबोधन पत्रिका' चालवीत आहेत. आज ही 'पत्रिका' वैचारिक व्यासपीठ बनली आहे. बुद्धिवादी विचारसरणी, लोकशाही जीवननिष्ठा हा 'पत्रिके'चा आत्मा आहे. अनेक सामाजिक चळवळींशी डॉक्टरसाहेबांचे संबंध आहेत. आतापर्यंत ते शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत अग्रेसर राहिले आहेत.

प्रचंड वेगाने बदलणाऱ्या जगाकडे मोकळ्या व पूर्वग्रहरहित दृष्टीने पाहण्याची क्षमता त्यांचेकडे आहे. जो भाग भारतीयांत रुजावा, असे त्यांना वाटते, तो रुजविण्यासाठी अनेक परिश्रम करण्याची व विविध साधनांची मदत घ्यायची त्यांची तयारी आहे. आणि म्हणून मी जेव्हा त्यांना प्रश्न विचारला, "डॉक्टरसाहेब, आपण कुलगुरुपद का स्वीकारले?" त्यावेळी जे उत्तर दिले, ते त्यांची भूमिका स्पष्ट करणारे आहे. ते म्हणाले,

"प्रा. नरहर कुरुंदकरांनीही मला हाच प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांना जे सांगितले, तेच तुम्हांला सांगतो. कुलगुरुपद हे माझ्या हाती आलेलं समाजप्रबोधनाचं नवं साधन आहे, असं मला वाटतं. आतापर्यंत कॉलेज, 'समाज प्रबोधन पत्रिका', आणि व्यासपीठ ह्या साधनांचा उपयोग केला. आता विद्यापीठ

ह्या माध्यमाचा उपयोग करून पाहावा व कितपत यश मिळते, ते पाहावे, असे मी ठरविले. यश मिळेल, की नाही, याविषयी आधीच काही निराशावादी भूमिका मी घेतली नाही. त्याची कारणे दोन आहेत. (१) कुठलेही साधन आधी वापरून पाहावे व नंतर त्याच्या उपयुक्ततेविषयी मत ठरवावे, अशा विचाराचा मी आहे. शासन या संस्थेविषयी अनेक साशंक असतात, तरीही आम्ही काही मंडळी शासनावर भरवसा ठेवून काही मोठे कार्य करू पाहतो. शासन या साधनाविषयी आम्ही अश्रद्ध नाही. त्याच न्यायाने विद्यापीठ ह्या साधनाविषयी मी अश्रद्ध नाही. (२) दुसरे असे, की शिवाजी विद्यापीठ अशा रीतीने वापरण्याची खूप शक्यता आहे. या ठिकाणी विद्यापीठात आणि विद्यापीठाबाहेरील लोकांत खूप उत्साह दिसतो. त्यामुळे आतून-बाहेरून सर्वच सहकार्य मिळण्याची खूप शक्यता आहे. इथला विद्यार्थी व शिक्षक हा बराचसा अडचणींतून वर येऊ पाहणारा असा आहे. त्यामुळे ह्या दोन्ही वर्गांपुढे जर नवे कार्यक्रम ठेवले आणि त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढणार आहे, असे दिसून आले, तर त्यांचा पाठिंबा मिळू शकेल.

" कुलगुरूंना या स्थानाकडे दुसऱ्या एका दृष्टीने पाहता येईल. ती अशी, की हे पद मिळणे म्हणजे आपल्या झाल्या कामाचा गौरव आहे, असे वाटेल. मला तसे वाटत नाही. मला मागे बघण्यापेक्षा पुढे बघावेसे वाटते. मी मुंबई सोडताना माझा एक साहित्यिक मित्र मला म्हणाला, ' आता तरी सुखाने राहायला शीक. ' उलट माझी अशी इच्छा आहे, की असे शिक्षण मला न मिळो. उलटपक्षी, समाजप्रबोधनाच्या कार्यासाठी अधिकाधिक वेळ देण्याची शक्यता निर्माण होईल, असे वाटल्यावरून मी हे पद स्वीकारले. "

कुलगुरुपदाकडे पाहण्याची दृष्टी समजून घेतल्यानंतर मी त्यांना विचारले,

" कुलगुरूंचे नेमके काम कोणते ? "

त्यावर ते म्हणाले,

" कुलगुरूंच्या कामाची जबाबदारी विद्यापीठ कायद्यात सांगितली आहे. कुलगुरू विद्यापीठात, प्रशासकीय व शैक्षणिक क्षेत्राचा (Principal Executive and Academic Officer) प्रमुख आहे. कुलगुरूंचा शासकीय कामांत बराच वेळ जातो. Academic Officer होण्याची कुलगुरूंनी कोशीस करावी. शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख म्हणून विद्यापीठाच्या क्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये जे काम चालते, त्या कामांत मदत करणे; त्याला दिशा देणे ही महत्त्वाची जबाबदारी आहे. खरं पाहता, ही एकच जबाबदारी खूप मोठी आहे. उदा०, जे अभ्यासक्रम चालू आहेत, त्यांचा सार्वत्रिक दर्जा वाढविणे, समाजाच्या गरजांप्रमाणे नवे अभ्यासक्रम सुरू करणे आणि त्याही पलीकडे जाऊन विद्यापीठांतून बाहेर

पडणाऱ्यांवर काही संस्कार करणे, तसेच मोठ्या समाजाला त्याच्या अपेक्षेच्या मर्यादेत बौद्धिक सल्ला देणे, इतके ते मोठे काम आहे. "

"हे नवीन अभ्यासक्रम कसे असतील ?"

"आरंभी ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, की नवीन अभ्यासक्रम काढणे हे विद्यापीठाच्या अंतर्गत अशा मंडळाकडे असते. अभ्यासमंडळे, अभ्यासशाखा (फॅकल्टी), विद्वत्सभा, विधिसभा, कार्यकारिणी इ. चे ते काम आहे. माझे एकट्याचे काम नाही. मी जाहीर केले आहे, की 'आय विल गिव्ह यू लीड, आय विल नॉट टेक युवर डिसिजन्स्.' दुसरी गोष्ट स्पष्ट करायला हवी, की नव्या अभ्यासक्रमासाठी पैसा लागतो. पैसा नसेल, तर बऱ्याच गोष्टी कागदावरच राहतात. स्थूल गोष्टी मांडतो. त्याला तुम्ही मनातले मांडे म्हटले, तरी माझी हरकत नाही. येथे आज एक 'फाईन आर्ट्स् फॅकल्टी' (Fine Arts Faculty) तयार होईल. त्यात डिप्लोमा व सर्टिफिकेटचे अभ्यासक्रम केले जावेत. असे अभ्यासक्रम काढायला भोवती अतिशय योग्य अशी परिस्थिती आहे. आर्किटेक्चरचे अभ्यासक्रम काढण्याची जरुरी आहे. सिनेमा–धंदा, अभिनयकला ह्या संबंधित अभ्यासक्रम काढता येतील. शाहू केंद्र ह्या नावाने 'स्कूल ऑफ सोशल सायन्सेस्' अशी संस्था उभी करता येईल. येथील लोकांत त्याबद्दल खूप उत्साह आहे. तेथे सामाजिक विकासाचा आणि त्यात राजर्षी शाहूंच्या कार्याचा सखोल अभ्यास करता येईल. मराठी विभाग आणि शिक्षणविभागही नव्याने सुरू करावयाचे आहेत. तेथेही सांप्रदायिक पद्धतीने कार्य न करता काही नवे प्रश्न अभ्यासासाठी घेता येतील. उदा., मराठी विभागात मराठी फिल्मचा अभ्यास करता येईल. शिक्षण विभागात 'नॉनफॉर्मल' शिक्षणाचे प्रयत्न करता येतील.

"दुसरेही लहान लहान अभ्यासक्रम काढता येतील. त्यांना विद्यापीठाचा दर्जा द्यावा, की नाही, हा एक वादाचा प्रश्न आहे. मला ह्या वादात तथ्य वाटत नाही. तो वाद 'शिक्षण' (education) आणि कौशल्य (craft) यांमधील भेद असा आहे. विद्यापीठात 'शिक्षण' होते. कारागिरी-कौशल्य शिकविले जात नाही, असे काही म्हणतील, पण कारागिरीही शिकविण्याची वेळ आली आहे. एवढीच काळजी घ्यावी लागेल, की कारागिरी शिकविताना पॉलि-टेक्निक, औद्योगिक शाळा इ. ठिकाणी आधीच असणाऱ्या सोयींची आपण पुनरावृत्ती करीत नाही. काही वर्ष-सहा महिन्यांच्या मुदतीचे अभ्यासक्रम तयार करता येतील. उदा., लहान धंद्याशी संबंधित असा व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम, ट्रेड युनियनचा अभ्यासक्रम, नवे गणित, इंग्रजी, हिशेब इ. विषयांतील अभ्यासक्रम. काही अभ्यासक्रम नव्या शास्त्र-शाखेशी संबंधित असतील. उदा., ऑपरेशन–रिसर्च, इकॉनॉमेट्रिक्स. काही अभ्यासक्रम असे असतील, की त्यांच्याबद्दल परीक्षा न

ठेवता आणि सर्टिफिकेट न देता नुसते ते अभ्यासक्रम कानांवरून गेलेत, एवढेच पुरे आहे, असे समजावे लागेल. "

मी प्रश्न विचारला,

" आपण अभ्यासक्रमाविषयी बोलता बोलता मुक्त विद्यापीठांच्या विषयाकडे आलाच आहात, तेव्हा मुक्त विद्यापीठाच्या वास्तव स्वरूपाविषयी काही सांगाल काय ? "

" मुक्त विद्यापीठ ही एक स्वतंत्र कल्पना आहे. ती खूप प्रयत्न करून राबविली पाहिजे. इंग्लंडमध्ये काही वर्षांपूर्वी असे मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. त्यावर अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यावरून असे दिसते, की आर्थिक दृष्ट्या अडचणीत असलेल्या वर्गाला, घरामध्ये अडकून राहणाऱ्या स्त्रियांना आणि नोकरीमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना मुक्त विद्यापीठाचा फायदा मिळतो आणि मुक्त विद्यापीठात होणारी तयारी ही इतर विद्यापीठाच्या तयारीच्या मानाने कमी नसते.

" मी ज्यावेळी मुक्त विद्यापीठाचा उल्लेख करतो, त्यावेळी आजच्या संदर्भात मला केवळ एवढीच वैशिष्ट्ये अभिप्रेत आहेत. आपण प्रत्यक्ष असे विद्यापीठ निर्माण करायला गेलो, तर सबंध महाराष्ट्रासाठी एक स्वतंत्र मुक्त विद्यापीठ काढावे लागेल. त्यासाठी खूप माणसे, पैसा आणि साधने लागतील. परंतु आहे त्याच विद्यापीठाच्या चौकटीत मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन प्रयत्न करता येईल. उदा., अलिकडच्या काळात सर्वच विद्यापीठांमध्ये बहिःस्थ विद्यार्थी परीक्षांना बसतात. त्यांच्यासाठी आपण काय करतो ? वर्षाच्या आरंभी आपण नावे नोंदवतो. वर्षाच्या शेवटी परीक्षा घेतो. मध्यंतरात विद्यापीठ काहीच जबाबदारी घेत नाही. तशी जबाबदारी उचलायला हवी. एक म्हणजे ह्या विद्यार्थ्यांसाठी टिपणे तयार करून पाठविता येतील. ही टिपणे विद्यापीठातील व विद्यापीठाबाहेरील उत्तमोत्तम शिक्षकांनी व तज्ज्ञांनी तयार केलेली असतील. विद्यार्थी त्यांचा अभ्यास करून स्वतः काही लिखाण करतील. ते लिखाण आधी ठरवून दिलेल्या प्राध्यापकाकडे पोस्टाने पाठवून त्यावर मार्गदर्शन घेतील. दुसरे म्हणजे काही कॉलेजे केंद्रे म्हणून निवडावीत व त्या ठिकाणी बहिःस्थ विद्यार्थ्यांना एका वेळेला एक आठवडा याप्रमाणे वर्षातून दोनदा ठेवून घ्यायचे आणि त्यांच्यासाठी प्रत्येक विषयावर व्याख्याने देऊन चर्चा घडवून आणायची. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था त्या त्या केंद्राने करावी. प्रत्येक केंद्र हे एक विद्यार्थि-प्राध्यापकांचे शिबिर बनेल. या शिबिरामुळे आणखी काही स्वतंत्र फायदे होतील.

" जे प्राध्यापक शिबिरातून भाग घेतील, ते आपल्या एकंदर विद्वत्तेचे, बागबद्दलच्या दृष्टिकोणामुळे, स्वतःच्या वागणुकीमुळे, विद्यार्थ्यांच्या मनावर कायमची छाप

पाडू शकतील, असे असावेत. त्यांच्या वागण्यात काही अंशी अनौपचारिकपणाही हवा. ते विद्यार्थ्यांशी संबंधित असावेत. त्याचप्रमाणे ते शिक्षकेतरही असावेत.

"मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रमही थोडाफार बदलता येईल. विद्यापीठाच्या अनुभवाचे किंवा विद्यार्थ्यांना लगेच ज्यांची जरुरी पडेल, असे विषय आणता येतील. कदाचित प्रत्येक केंद्रामध्येही विषयाबाबत वेगळेपणाचा प्रयोग करता येईल. उदा., इचलकरंजी भागामध्ये इंडस्ट्रियल मॅनेजमेंट (industrial management) ट्रेड युनियन, देशाचे उद्योगीकरण असे विषय देता येतील. उलटपक्षी, गारगोटीसारख्या केंद्रासाठी शेती-विकास, शेती-व्यवस्थापन असे काही विषय देता येतील. थोडक्यात म्हणजे मुक्त विद्यापीठात अभ्यासक्रमाची प्रयोगशीलता किंवा लवचिकपणा असावा.

"या सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अर्थाने मुक्त विद्यापीट चालविणारे संघटक हे स्वतः नव्या दृष्टीचे आणि अत्यंत उत्साही असले पाहिजेत. केवळ नोकरी म्हणून आपल्या कामाकडे पाहणारे लोक मुक्त विद्यापीठ यशस्वी करू शकणार नाहीत."

पुढचा प्रश्न :

"भोवतालच्या परिसरातील मानवी व निसर्गशक्तींचा विकास त्या त्या परिसरातच होऊन समाजजीवनात समृद्धी यावी, शहराकडे असणारी ओढ थांबवावी व त्यासाठी विद्यापीठ-साधनाचा वापर करावा, असा आपला प्रयत्न राहील, असे समजायचे काय ?"

"तुम्ही तसे समजू शकता, पण त्याबद्दल निश्चित काही आजच सांगता येणार नाही. सगळ्या समाजजीवनाचा ओघ शहराकडे जाण्याचा आहे. शहर हे समग्र जीवनाचा आदर्श बनतो. तिथले नाटक, सिनेमा, वृत्तपत्र, राहण्याच्या पद्धती, तिथला विचार इत्यादी बाबतींत शहराचे आकर्षण फार मोठे असते. शहराचा विकासही अधिक वेगाने होतो. त्यामुळे खेड्यातला विद्यार्थी शहराकडे जाणार, ही प्रवृत्ती आपणांला मान्य करायला हवी. परंतु काही विद्यार्थी खेड्यामध्येच राहून त्यांना स्वतःचा व खेड्याचा अभ्युदय करता आला पाहिजे. ज्यांची लहान-मोठी शेती आहे, त्यांना शेतीकडे लक्ष देता आले पाहिजे. ज्यांचे आईबाप वृद्ध आहेत, त्यांना खेड्यात राहून त्यांच्याकडे लक्ष देता आले पाहिजे. ज्यांना शहरी जीवनाचे आकर्षण नाही, त्यांना खेड्यात राहून उद्योगीकरण, शिक्षण, सामाजिक सुधारणा यांकडे बघायचे आहे, त्यांना खेड्यात राहता आले पाहिजे.

"हे सर्व म्हणत असतानाच स्वतंत्र ग्रामीण विद्यापीठे निष्प्रभ ठरली, हे लक्षात घ्यायला हवे. त्यावरून मी एवढाच बोध घेतो, की आमच्या शहरी विद्यापीठामध्येच ग्रामीण विभागास पोषक असे काही अभ्यासक्रम देता आले पाहिजेत.

आणि विद्यापीठ संघटनेमध्ये ग्रामीण जीवनाशी सुसंगती साधली पाहिजे. विद्यापीठ संघटनेशी सुसंगती म्हणजे असे, की पहिल्या पदवी परीक्षेपर्यंत विद्यार्थी शिकण्यासाठी गावापासून फार दूर जाऊ नये. कॉलेजच्या वसतिगृहात जरी राहिला, तरी खेड्यातल्या घराशी त्याचा संबंध राहिला पाहिजे. घरच्या प्रश्नांना त्याने पाठमोरे होता कामा नये.

"परंतु शिक्षण हे नोकरीसाठीच–म्हणजे शेती सोडण्यासाठी, खेडे सोडण्यासाठी, घरदार सोडण्यासाठी ही कल्पना प्रभावी आहे. ह्यात काही अंशी अपरिहार्यता आहे. आधीच मी म्हटल्याप्रमाणे शहरांचे आकर्षण प्रभावी आहे. रोजगारासाठी शहराकडे जावे लागते, हेही आहेच. पण विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जर खेड्यात राहून पोटापाण्याचा प्रश्न सोडवता येईल, असे लहान आणि मध्यम मुदतीचे अभ्यासक्रम दिले, तर त्यांचा इष्ट परिणाम होईल. असे अभ्यासक्रम विद्यापीठ ह्या संकल्पनेशी विसंगत आहेत, असे अविकसित देशांमध्ये समजून चालणार नाही."

"कॉलेजमध्ये खेड्यापाड्यांतून गरीब वर्गातून येणारी बरीच मुले असतात. त्यांचे काही खास प्रश्न असतात. त्यांबद्दल काही सुचवायचे आहे काय?" असे मी विचारले.

"होय, त्यांचे प्रश्न निदान दोन आहेत. एक, या मुलांना पदवी मिळाल्यानंतर ती लगेच नोकरीस लागतील आणि घरचे दारिद्र्य दूर करतील, असं वाटणं अगदी साहजिक आहे. परिणामी असं घडतं, की शिकण्यापेक्षा पदवीवर अधिक जोर येतो. पदवीवर अधिक जोर आल्यामुळे अभ्यासक्रम उथळ करणे, परीक्षा सोप्या करणे यांवर जोर येतो. निकालाची टक्केवारी ही फार महत्त्वाची बाब वाटते. या सर्व बाबतींत समाजाचाही आग्रह असणे स्वाभाविक आहे. यातून मार्ग काढणे अवघड आहे. पण तो मार्ग काढावा लागेल. तो काढायचा म्हटल्यास शिक्षणसंस्था, अध्यापक, विद्यार्थी आणि संबंध समाज ह्यांना बरोबर घ्यावे लागेल. हे अवघड आहे, तरी आवश्यक आहे. दुसरा प्रश्न असा आहे, की खेड्यातल्या किंवा सामाजिक दृष्ट्या आज मागास असणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक विद्या पेलत नाही, असा जो सरसहा समज आहे, त्यामुळे वरील समजाला बळकटी येते. शिक्षणाचा कस सांभाळण्याचा प्रयत्न करताना शिक्षणाच्या प्रसाराला अडथळा निर्माण होतो, असाही सार्वत्रिक समज दृढ झाला आहे. मला वाटते, की या समजामागे ज्या वर्गामध्ये शिक्षण–प्रसार करीत आहोत, त्या वर्गाविषयीचे अज्ञान आणि अपमानाची भावना आहे. हा वर्ग मुळातच इतर वर्गाच्या तुलनेने ग्रहणशक्ती आणि कष्ट करणे यांमध्ये कमी समजण्याला काही आधार नाही. आजचा मागासलेला समाज मागासलेला आहे, ह्याला कारण दुसरे काही

असून ग्रहणशक्तीतील व कष्टतत्परतेतील कमतरता ही कारणे नाहीत. किंबहुना, हा समाज किंवा ह्या समाजाचे कार्य करणाऱ्या संस्था, शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास परीक्षापद्धती कठीण करण्यास विरोध करतील, तर त्यात त्यांचाच अपमान आहे, हे त्यांच्या लक्षात यायला हवे. त्यांच्या स्वाभिमानाशी, पुरुषार्थाशी हा समज संपूर्णपणे विसंगत आहे. हा समज सबंध समाजाने आणि विशेषतः आज मागास असणाऱ्या समाजविभागाने लवकरांत लवकर सोडला पाहिजे. मी याहीपुढे जाऊन असे म्हणेन, की खालावणाऱ्या शैक्षणिक दर्ज्याची जबाबदारी आज मागास असणाऱ्या वर्गावर पडत असेल, तर त्या समाजाने ह्याचा आवर्जून प्रतिकार केला पाहिजे आणि प्रत्यक्षात शिक्षणप्रसाराबरोबर शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. काल तुम्ही प्रयत्न केले, आज आम्ही करीत आहोत, असे बाकीच्या समाजाला बजावून पुढे आले पाहिजे. याबद्दलचा सर्व कार्यक्रम माझ्या डोळ्यांसमोर स्पष्टपणे आहे, असे नाही. परंतु एक-दोन ढोबळ गोष्टी जरूर आहेत. त्या मी येथेच सांगत नाही. त्यासाठी जर सार्वत्रिक उत्साह निर्माण झाला, तरच त्यांना यश मिळेल, असे मी समजतो. हे माझे एकट्याचे काम नाही."

"तुम्ही कार्यक्रम जरी सांगत नसलात, तरी त्या बाबतीत अपेक्षित सहकार्याची तुमची कोणती कल्पना आहे?" मी विचारले.

"सहकार्य खूप मिळणार आहे, ही अपेक्षा माझ्या आशावादाचा किंवा ध्येयवादाचा गाभा आहे. कोणत्याही चांगल्या कामात असे सहकार्य अंतःस्थ असते.

"हे कार्य चांगले आहे, आवश्यक आहे, याविषयी समाजाचा विश्वास बसावा लागतो. त्याला योग्य परिस्थिती आज आहे. समाज शेवटी स्पर्धेवर अवलंबून असतो. राखीव जागा मागून, समाज फार काळ कार्यक्षम राहू शकणार नाही. शेवटी सर्वांनाच स्पर्धेत पडायचे आहे. हे लक्षात घेऊन त्याच्या पूर्वतयारीला लागले पाहिजे. आधुनिक जगाच्या संदर्भात या स्पर्धेचे नियम अगदी स्पष्ट आहेत. निदान एक गोष्ट स्पष्ट आहे. ती अशी, की तथाकथित मागास समाजाने तथाकथित पुढारलेल्या समाजाची कार्यक्षमता मिळविलीच पाहिजे. त्यासाठी त्या तथाकथित मागास समाजाला अधिक कष्ट करावे लागतील. परंतु कष्टांची सवय असल्यामुळे अधिक कष्ट जड वाटू नयेत. जर या बाबतीत सर्व स्तरांवर नेतृत्व मिळाले, तर ही गोष्ट अवघड नाही."

"म्हणजे जी काही शैक्षणिक क्रांती व्हावी, असे सर्वत्र वाटते, त्यात तथाकथित मागास समजल्या जाणाऱ्या समाजाने अग्रदूत व्हावे, असे सांगायचे आहे काय?"

"होय."

"क्रांती ह्या शब्दावरून नवा प्रश्न आठवला. जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात विद्यापीठाचे कार्य कोणते आहे, याविषयी काही विचार सांगता का?"

"जयप्रकाशांबद्दल ज्यांना अतीव आदर आहे, अशांपैकी मी एक आहे. या देशात ज्या थोड्यांमध्ये नीतिधैर्य आहे, त्यांचे अग्रणी जयप्रकाश. त्यांना मानणारा खूप मोठा समाज आहे. त्यांच्या 'संपूर्ण क्रांती'मध्ये न्यायाची रचना आहे, असे मी समजतो. ही रचना विद्यापीठामध्ये करता येईल. परंतु ही विद्यापीठे ज्या समाजरचनेत कार्य करतात, त्या समाजरचनेच्या मर्यादा विद्यापीठांवर आहेत. समाजच बदलण्याची क्षमता या विद्यापीठांमध्ये आहे काय? एकाएकी आणि क्रांतिकारी बदल करण्याची शक्यता विद्यापीठांत नाही. परंतु दीर्घकालामध्ये आणि काहीसा बदल करण्याची क्षमता विद्यापीठांकडे आहे. परंतु आजच्या ध्येयधोरणांत आणि कार्यक्रमात विद्यापीठाला बदल करावे लागतील. तसे बदल करण्यास सर्व समाजानेही तयार असले पाहिजे. निदान जयप्रकाशांच्या शिक्वणुकीच्या संदर्भात विद्यार्थी जबाबदार वृत्तीचा, कष्ट करणारा, समाजाभिमुख, काही मूल्यांची बांधिलकी असणारा असा निर्माण करण्याकडे लक्ष असायला पाहिजे. जयप्रकाशांची क्रांती विद्यापीठविरोधी नसून तेथे होणाऱ्या कुचकामी शिक्षणाविरुद्ध आणि स्वार्थी लोकांच्या कारवायांविरुद्ध आहे. विद्यापीठ त्या टीकेपासून स्वतःला मुक्त करून घेऊ शकेल आणि संपूर्ण क्रांतीतील आपली जबाबदारी पार पाडू शकेल."

"पण हे सर्व करण्यासाठी म्हणजेच संपूर्ण क्रांतीमध्ये विद्यापीठाने अपेक्षित कार्य करण्यासाठी विद्यापीठे स्वायत्त कुठे आहेत?"

"विद्यापीठ स्वायत्त असते आणि नसते. विद्यापीठाचा खर्च अवाढव्य असून त्याचा भार विद्यार्थ्यांवर पडतो. मोठ्या प्रमाणात तो शासनावर पडतो. शासनाला अनेक जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. त्यासाठी खर्च करताना त्या अनेक जबाबदाऱ्यांपैकी एक जबाबदारी म्हणजे शिक्षण. म्हणून विद्यापीठाच्या कार्यात जेथे खर्चाचा संबंध येतो, तेथे शासनाचे नियम पाळणे आवश्यक होऊन बसते.

"शासन समाजाचे प्रतिनिधित्व करते आणि म्हणून शासनाला विद्यापीठाबद्दल काही नियमावली तयार करावी लागते. हे नियम स्थूल आणि सर्वांना स्पष्ट असे असतात. हे नियम मुख्यतः धोरणविषयक असले पाहिजेत. या पलीकडे विद्यापीठाचे ध्येय-धोरण आणि संचालन हे त्यांचे त्यांच्याकडेच असते. त्यात त्यांची स्वायत्तता. एका मोठ्या चौकटीतील स्वायत्तता. स्वायत्तता आणि चौकट यांमध्ये सकृद्दर्शनी विसंगती वाटली, तरी लोकशाही आणि नियोजन यांवर आधारित

समाजामध्ये ती अपरिहार्य आहे.

"यासाठी मी एक उदाहरण देतो. स्वायत्ततेच्या नावाखाली विद्यापीठाने शिक्षणप्रसार थांबविणे हे शासनाला जमणारे नाही. स्वायत्ततेच्या नावाखाली पगार वाढवीत नेणे शासनाला परवडणारे नाही. उलटपक्षी, विद्यापीठाला न जुमानता विद्यापीठाने अमूक एक कॉलेज निघावे, तमूक एक निघू नये, असे शासनाने सांगू नये. खरे म्हणजे शासन आणि विद्यापीठ यांमधील संबंध 'असे असावे आणि तसे नसावे' म्हणून पक्के सांगता येत नाहीत. ज्या त्या प्रश्नावर विवेकशीलता ठेवणे, इतकेच करता येईल. कुणी कुणास दोष देण्याऐवजी, एकाने दुसऱ्याची भूमिका कळून घेणे इतकेच शक्य आहे."

"मग येत्या २–४ वर्षांत कुलगुरूंचा कार्यक्रम कोणता असेल?"

"स्पष्टच सांगायचे, तर विद्यापीठाचे ध्येय-धोरण आणि कार्यक्रम एकट्या कुलगुरूंनी ठरवायचा नसतो. तो ठरविण्यामध्ये अनेक मंडळे असतात, असे मी आधीच सांगितले. प्रत्यक्ष कार्यवाहीमध्ये त्याहीपेक्षा अधिक सहकार्य लागते. आणि कार्यवाहीच्या दृष्टिकोनातूनही कार्यक्रमांमध्ये बदल करावे लागतात. म्हणून कुलगुरूंचा कार्यक्रम ही कल्पना काही अंशी अस्थानी आहे. परंतु त्यांच्या स्वतःच्या अशा काही धारणा किंवा प्रेरणा असू शकतात आणि त्या स्थूलमानाने मी सांगितल्या आहेत. यापेक्षा अधिक काही सांगणे योग्य वाटत नाही. किंबहुना, जे सांगितले ते खूप आहे, असेही काही सांप्रदायिक टीकाकारांना वाटण्याची शक्यता आहे."

"विद्यार्थ्यांना कुलगुरू काय सांगतील?"

"मराठी समाजात विद्यार्थ्याला शिक्षणाखेरीज पर्याय नाही. म्हणून त्याने शिक्षणासाठी पराकाष्ठेचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षण न घेता शेती करीन म्हटले, तर शेतीला पाणी नाही, उद्योगधंदा करीन, असे कुणी म्हटले, तर त्यासाठी भांडवल नाही, व्यापारउदीम करीन म्हटले, तर त्यासाठी लागणारा गोडवा व धाडस नाही, शिपाईगिरी करीन, असे कोणी म्हणाला, तर त्यातही इतर समाजाची नव्याने स्पर्धा आहे. म्हणून शिक्षण घेऊन प्रत्येक क्षेत्रामधील उणीव दूर करता येते किंवा ती क्षेत्रे टाळून नोकरीमध्ये शिरता येते. शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षणसंस्था भक्कम आणि शिस्तीला आणि चारित्र्याला पोषक अशा ठेवल्या पाहिजेत."

'शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही', हा त्यांचा मुख्य विचार मिळाल्यावर मी थांबलो. ह्या प्रदीर्घ मुलाखतीसाठी डॉ. भणगे यांनी खूप वेळ दिला. ही मुलाखत दोन बैठकींत झाली. वातावरण प्रसन्न होते. कुलगुरूंनी अत्यंत सावकाशपणे, सावधपणे, कुठे अतिशयोक्ती होणार नाही ना, कुणा दुसऱ्याच्या

क्षेत्रात आपण घुसत नाही ना, अशी काळजी घेत घेत सर्व विचार सांगितले. त्यांचे सौजन्य, साधेपणा व सावधगिरी, विद्वत्ता ह्या साऱ्या गोष्टींचा माझ्या मनावर एक आगळा संस्कार होऊन गेला.

[ह्या मुलाखतीचा काही भाग 'किर्लोस्कर' मासिकात (ऑक्टोबर १९७८) प्रसिद्ध झाला.]

१०
वैयक्तिक आणि वैचारिक

मित्रांनो,

मी तुम्हां सर्वांचा या स्वागताबद्दल अत्यंत आभारी आहे.[☆] आताचा हा स्वागत–समारंभ माझे ह्या चार जिल्ह्यांतले सर्वांत जुने मित्र– बॅ. पी. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व्हायचा होता. जसा माझा त्या बाबतीत काही उत्साह होता, तसा त्यांचाही होता; परंतु दोनदा हा समारंभ आपण पुढं लोटला, त्यामुळं त्यांना येणं अशक्य झालं. किंबहुना, दुसऱ्यांदा ज्या वेळी हा समारंभ पुढे लोटला, तेव्हा त्यांचं माझं बोलणं झालं, अन् मी त्यांना म्हणालो, "हा समारंभ अतिशय लहान करावा. तुम्ही सुद्धा लांबून येण्याची यातायात करू नका." त्यांच्यातर्फे नि माझ्यातर्फे मी तुम्हांला सांगतो, की आज तुम्ही ज्या भावना माझ्याविषयी व्यक्त केल्या, त्या त्यांनीही व्यक्त केल्या असत्या.

मला आनंद वाटतो, की प्रा. कणबरकर हे आज इथं अध्यक्षस्थानी आहेत. पाटील काय किंवा कणबरकर काय, दोघेही माझे जुने मित्र. पी. जी. हे ४२ सालापासूनचे मित्र आणि ५७ साली मी जेव्हा इथं आलो, त्यावेळी इथल्या ज्येष्ठ प्राध्यापकांपैकी माझे पहिले मित्र कणबरकर. तेव्हा ते गोखले कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. आज, विशेषतः त्यांच्या बोलण्यानं त्यांनी जसा काही माझ्या काळजाला हात घातला. त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, जे सौहार्द दिले, त्यांनी जे प्रश्न मांडले, त्यामुळे मी अतिशय भारावून गेलो. त्यांनी मोठ्या जबाबदाऱ्यांची जाणीवही करून दिली. मला इथं मित्र खूप आहेत, सहकारी खूप आहेत, अन् मी जो काही थोडा फार ध्येयवादानं नि निश्चयानं वागू पाहतोय्, त्यामध्ये माझ्या या

[☆] शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून केलेले पहिले भाषण.

सर्व मित्रांचा नि सहकाऱ्यांचा मला पाठिंबा मिळणार आहे.

प्रा. कणबरकर हे 'आदर्श शिक्षक' म्हणून गौरविले गेले आहेत. आदर्श शिक्षकांच्या अध्यक्षतेखाली माझा सत्कार होतो, यात माझा खरा गौरव वाटतो. मला अभिनंदनाची अनेक पत्रे आली. तारा आल्या. उत्तरादाखल पाठविलेलं पत्र मी छापून घेतलं आहे. त्यातला शेवटचा परिच्छेद असा आहे : 'शिक्षक म्हणून आयुष्याच्या शेवटच्या स्थित्यंतरात पोचलो आहे. हे शिक्षकाचे आयुष्य सत्कारणी लागेल, की नाही, ते बरेचसे आताच्या कामावर अवलंबून राहील, याची मला जाणीव आहे.' सुरुवातीपासून शेवटपर्यंत मी शिक्षक आहे व शिक्षकच राहणार. ४४ साली बी. ए. झाल्यानंतर शिक्षकी आयुष्याला सुरुवात केली. त्या वेळी युद्ध चालू असताना नोकऱ्याही बऱ्यापैकी मिळत. त्यांत पैसेही बऱ्यापैकी मिळत. त्यावेळी आईनं म्हटलं : 'तू शिक्षक होणार, म्हणजे आपली गरिबी राहणार.' तिला मी समजावून सांगितलं. तिलाही ते पटलं. मी म्हटलं, 'मला हे एवढंच करता येईल.' अन् तेच करीत असताना या शेवटच्या स्थित्यंरापर्यंत आलोय.

इथली अधिकारसूत्रं धारण करून पंधरा दिवस झाले. काही गोष्टी कानांवरही आल्या. आताही काही ऐकलं. ते सर्व लक्षात घेऊन बोलतो. पहिल्या दिवशी गावात आल्यानंतर संध्याकाळच्या एका जाहीर सभेमध्ये मी जे एक-दोन उल्लेख केले, तेही मला आजच्या बोलण्यात करावे लागतील.

त्यांतला एक उल्लेख मी असा केला होता, की ह्या विद्यापीठामध्ये कुलगुरू म्हणून येताना मला आनंद झाला आहे. कुलगुरू झालो, याचा आनंद आहे, कारण माझं शिक्षक म्हणून आयुष्यातलं हे शेवटचं स्थित्यंतर. ह्या पलिकडे म्हणजे शिवाजी विद्यापीठात कुलगुरू झालो, याबद्दलचा माझा आनंद मोठा आहे. त्याचं एक कारण असं, की हे विद्यापीठ निर्माण होण्याच्या आधी या विद्यापीठाविषयी चर्चा चालली होती, अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या, काही योजना सुचविल्या जात होत्या, त्यांमध्ये मी अग्रहक्कानं होतो. काही लिहिलेलं आहे, बोललेलो आहे. नंतर विद्यापीठाची समिती तयार झाली. तिच्यापुढं माझी साक्ष झाली. ती साक्ष देत असताना मी आधी काही विचार करून माझी मांडणी केली होती. जवळ जवळ त्याच काळामध्ये इंग्लंडमध्ये सात नवीन विद्यापीठं झाली होती. त्यांचाही काही विचार करून मी मांडणी केली. आणि त्या समितीचे बॅ. खर्डेकर मला म्हणाले, "ब्राइटन युनिव्हर्सिटीचा तुमचा दाखला मला आवडला. पण माझ्या हयातीत ब्राइटन इथं होईल, असं दिसत नाही." मी म्हणालो, "माझ्या हयातीत होण्याची शक्यता आहे." त्यांना हे उत्तर आवडलं. शिक्षक म्हणून माझ्या मनातील ज्या काही कल्पना आहेत, त्या त्याच्यात आल्या, असं मी समजतो. पुढं विद्यापीठ झालं. विद्यापीठाचे अधिनियम ठरत होते. विद्यापीठ कायद्यातही थोडी

दुरुस्ती झाली. ॲमेंडमेंट अमूक अमूक करावी, असं सुचविणाऱ्यांमधे मी होतो. किंबहुना माझी एक महत्त्वाची ॲमेंडमेंट आरंभकाळात मंजूर झालेली आहे. या विद्यापीठाचे ध्येय-धोरण ठरविण्यामध्ये, कार्यक्रम ठरविण्यामध्ये मी सहभागी होतो.

डीन म्हणून सहा वर्षं होतो. कार्यकारिणीचा सदस्य म्हणून तीन वर्षं होतो. इथं अनेक मंडळांमध्ये पदसिद्ध सदस्य होतो. विद्यापीठाच्या कामामध्ये चुकूनही कसूर केली नाही. किंबहुना काही गोष्टी आग्रहानं मांडल्या. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता' असेही प्रसंग येऊन केले. त्यातून काही वेळा अप्रियता येते, तीही मी स्वीकारली. माझ्या मनात हे विद्यापीठ काही आकार घेऊन तयार होतं आणि मुक्तिबोधांच्या शब्दांत सांगायचं, म्हणजे ते एक 'स्वप्नस्थ वास्तव' होतं. त्याच्याशी तुलना करून ते सगळं इथं दिसलं पाहिजे, अशा कल्पनेनं वागत होतो. आणि म्हणून पुन्हा इथं मी येत असताना 'नॉट मिअरली होमकमिंग', असं वाटतं. आज ते माझ्या मनातलं वास्तव आणि प्रत्यक्ष हे एकत्र आणण्याची संधी मला मिळते आहे, याचा मला आनंद आहे. कायद्याच्या कक्षेत, परंपरेच्याही चाकोरीत राहावं लागेल; त्यामुळं फार बदल करीन, असं नाही. तरीही ही कार्याची संधी मिळते आहे, म्हणून मी इथं आलो.

मला नरहर कुरुंदकर भेटले. त्यांनी विचारलं : "तुम्ही हे आसन का घेतलंत!" अर्थात नेहमीचीच टीका त्यांच्या मनात असणार. विद्यापीठाचं काम याचा अर्थ डोक्यावर खूप ताण. वाचन नाही दुर्बल प्रकृतीच्या माणसाला तो ताण सहन होईल का? इत्यादी, इत्यादी. त्यांना मी म्हणालो, "कुरुंदकर, माझं 'समाज प्रबोधन पत्रिके'चं काम तुम्हांला आवडलं आहे. आता हे एक नवं माध्यम आहे." कुठल्याही माध्यमावर माझा मूलतः अविश्वास नसतो. इतकी वर्षे माझी विद्यापीठात गेली. हेही माध्यम वापरून पाहावं. काही चांगलं साधता येतं का, ते साधकानं ठरवावं. त्यानं आपलं सामर्थ्य जोखावं, आणि त्या माध्यमाचा उपयोग करून पाहावा. जमणारच नाही, होणारच नाही, असं मी कधीच समजत नाही. मुंबईत साहित्य संघानं माझा सत्कार केला. तिथं न्यायमूर्ती गोखले अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "नवीन काय होऊ शकतं?" ते जवळ जवळ सत्तरीच्या वयाचे आहेत. मी त्यांच्यापेक्षा पंधरा वर्षांनी तरुण होतो. मी म्हणालो; "प्रयत्न करून पाहीन."

माझी नऊ वर्षे बाहेर गेली. तिथं शिक्षक-विद्यार्थी पाहिले. त्यांच्यापेक्षा इथला विद्यार्थी आणि शिक्षक निदान एका बाबतीमध्ये तरी माझ्या कामाला योग्य असा आहे. इथला विद्यार्थी आणि शिक्षक अत्यंत कष्टाळू आहे व सश्रद्ध आहे.

घड्याळाकडे बघून चार तास बसतो, त्यानंतर नाही, असं नाही. अन्य ठिकाणी तो केवळ कॉलेजचे वेळापत्रक न पाहता परतीच्या गाडीचेही वेळापत्रक पाहतो. इथला कर्मचारी हासुद्धा कुलगुरू, कुलसचिव, अन्य अधिकारी यांना मानतो. पुष्कळदा मला असं वाटतं, की ही कर्मचारी माणसं अशी दूर का राहतात? इतका आदर का? हा एक तऱ्हेचा 'फ्युडॅलिझम' आहे, की काय? मात्र एवढं खरं, की त्यांच्या आदराचा मला उपयोग होऊ शकेल. बाहेर जनतेतही मला सर्वांचा खूप पाठिंबा आहे; पूर्वी बारा वर्षं इथल्या कॉमर्स कॉलेजचा प्राचार्य असताना तिथं आणि बाहेर जे काम केलं, जे विचार मांडले, त्यामुळं.

यश मिळवायला निघालो असताना माझ्या आधीच्या दोन्ही कुलगुरूंबद्दल मी माझी कृतज्ञता व्यक्त करतो. आज इथं दोन-तीनदा जो 'इन्फ्रास्ट्रक्चर' असा शब्द वापरला गेला, तो मीच माझ्या कोल्हापूरच्या पहिल्या भाषणात वापरला होता–डॉ. पवार यांच्या संदर्भामधे. पहिले कुलगुरू म्हणून ह्या माणसानं जे कष्ट केले, त्या कष्टाचं फलित म्हणजे हे इन्फ्रास्ट्रक्चर. इतर ठिकाणचं एखादं उदाहरण मला माहीत आहे आणि ते म्हणजे मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू सर लक्ष्मणस्वामी मुदलियार यांचं. ते जवळ जवळ एकवीस किंवा चोवीस वर्षं त्या पदावर होते. आप्पासाहेब हे बारा वर्षं म्हणजे त्यांच्या निम्माकाळ कुलगुरू होते, पण इतर कोणत्याही कुलगुरूपेक्षा त्यांनी केलेले कष्ट अधिक आहेत. एखाद्या गोष्टीचा ध्यास घ्यावा, तसं ह्या माणसानं सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम केलं अगदी सकाळी फिरायला गेल्यापासून (त्यामुळं आता मीही सकाळी फिरायला जाऊ लागलो!) संध्याकाळी ६।७ वाजेपर्यंत ते कष्टले. त्यांनी उभं केलेलं हे इन्फ्रास्ट्रक्चर निदान चार बाबतींत तुम्हांला दिसतंय्. एक, इथला परिसर–जो अतिशय सुंदर आहे. दोन, इथलं संघटन–जे अत्यंत कार्यक्षम आहे. परिसर सुंदर आहे, त्याचं वर्णन मी करीत नाही, पण कार्यक्षमतेचं अधिक स्पष्टीकरण करतो. मी तीन–चार विद्यापीठांशी संबंधित होतो. त्या अनुभवावरून मी सांगतो, की इथल्या विद्यापीठाची सबंध 'ऑर्गनायझेशन' 'फ्रॉम टॉप टु बॉटम' अत्यंत कार्यक्षम आहे. मी ज्यावेळी फायली बघतो, तेव्हा मलाच आश्चर्य वाटतं, की इतक्या थोड्या वर्षांत ह्या लोकांनी हे सगळं इतकं पक्कं करून ठेवलंय्, की त्याचा बोध करून घ्यायलासुद्धा मला खूप वेळ लागतो आहे. आणि हे आपोआप झालेलं नाही. कुणी तरी ते तयार करावं लागतं, त्यासाठी झटावं लागतं.

तीन, विविध शाखांचा हा पसारा आप्पासाहेबांनी उभा केला आहे. त्याच्या मागे कल्पनेचा जो काही एक विस्तार लागतो, तो त्यांचा आहे. आणि चौथी गोष्ट अशी, की ग्रंथालयापासून कँटीनपर्यंतच्या अनेकविध सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. श्रमदानावर उभी केलेली इमारत – जेथे आता गरीब मुलं राहताहेत–

ती त्यांची थोर कामगिरी आहे. हे सबंध इन्फ्रास्ट्रक्चर आप्पासाहेबांचं आहे. त्यांच्याबद्दलची माझी कृतज्ञता अतिशय मोठी आहे.

डॉ. पवारांनंतर बॅ. पाटील आले. आप्पासाहेबांमध्ये गरिबाचं प्रेम जरूर होतं. किंबहुना त्यामुळेच अनेक सोयी त्यांनी उपलब्ध करून दिल्या. त्याला अधिक तीव्रता बॅ. पाटलांनी दिली. त्याला अधिक सघनता दिली. त्यांच्या वागण्यात एक प्रकारचा अनौपचारिकपणा होता. त्यामुळे त्यांच्याशी बोलताना मोकळेपणा वाटे. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या प्रेरणा त्यांनी विद्यापीठाच्या स्तरावर आणल्या.

मित्रांनो, मला असं वाटतं, की या दोघांविषयी कृतज्ञता व्यक्त केल्यानंतर अन् त्यांच्याकडून ह्या गोष्टी घेतल्यानंतर, मीही त्यांच्या प्रेरणेनं काम करू शकेन. ती माझी प्रतिज्ञा राहील. इन्फ्रास्ट्रक्चर मीही थोडं फार उभं करू शकेन. मला थोडंसं ते अंग आहे. इमारती थोड्या फार कळतात. बाग थोडी फार कळते. पाण्याचा साठा थोडा फार कळतो. फिनान्स कळतो. ह्या ठिकाणी लक्ष घाला, त्या विभागात लक्ष घाला – हे मलाही जमेल. ते मला करावं लागेल. गरिबांची जी कणव, ती माझ्या नेहमीच्या शब्दांत नसली, तरी ती पोटात असते. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपण घेऊ शकाल.

मित्रांनो, आता थोडी ह्या व्यक्तीची माहिती. मी कोण ? माझ्याविषयी मी जे येथे आल्यावर ऐकलं, त्याच्या संदर्भात मीच एक-दोन गोष्टी सांगतो. मी एक खेड्यातला माणूस. जन्म झाला शिरोड्याला. पण माझं मूळ गाव ते नव्हे. सरकारी नोकरी-निमित्त वडील गावोगावी फिरायचे. माझा जन्म झाला, तेव्हा शिरोड्याला आम्ही होतो. माझं मूळ गाव भेडसी. ते अत्यंत लहान असून गोवा आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेवर आहे. ते माझ्या बालपणी अत्यंत अडचणीचं होतं. तिथं माझा प्रचंड वाडा आहे. परंतु वाड्यात वैभव नव्हतं. त्या वाड्यात अलीकडं हायस्कूल चाललं आहे. आमची शेती अत्यंत निकृष्ट होती. तीही नंतर गेली. माझं शिक्षण चार यत्तानंतर एक वर्षभर तुटलं ! हे का सांगतोय ? ग्रामीण भाग म्हणजे काय, अडचणी म्हणजे काय, गरिबी म्हणजे काय, ते ह्या शहरी माणसाला माहीत नाही, असं कोणाला वाटू नये, म्हणून. मी उत्तम कपडे करतो, कारण मला कपड्यांची आवड आहे. मी शहरी बोलतो, त्याचं कारण पुस्तकावरून मी मराठी शिकलो. या अर्थानं मी जरूर शहरी आहे. त्याच्यात मला कमीपणा मुळीच वाटत नाही. किंबहुना, शहरीकरण हे समाजाच्या वाढीमधलं एक स्थित्यंतर – एक प्रगत अवस्था – आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे, की मला अडचणी इ. माहिती नाहीत.

सावंतवाडीला हायस्कूलमध्ये गेल्यापासून दोस्त आणि शिक्षक चांगले लाभले. त्यांच्यापासून खूप शिकता आलं. तिथं शिवरामराजे– त्या वेळचा राजकुमार–भेटले.

तो राजाला शोभेल, असा उदार होता. सावंतवाडीहून जेव्हा मी रत्नागिरीला गेलो, तेव्हा अत्यंत चांगल्या हायस्कूलमध्ये मी शिकलो. त्याचं नाव पटवर्धन हायस्कूल. तिथं माझं उत्तम शिक्षण झालं. माझ्या घरी संस्कृत वगैरे काही नाही. तरी सुद्धा संस्कृत भाषा माझ्या गुरुजींनी मला उत्तम शिकविली. कॉलेजमध्ये गेलो. पहिल्यांदा वाडिया कॉलेजमध्ये गेलो; कारण तिथले माजी प्रिन्सिपल माझ्या नात्यातले होते. के. एम्. खाड्ये त्यांचं नाव. केंब्रिजचे एम्. ए. वगैरे झालेले. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासकाच्या दृष्टीनं फार मोठे गृहस्थ. तिथं खूप प्रकारची मुलं भेटत. त्या मुलांमध्ये जातवाद कधी नव्हता; कारण त्या काळामध्ये तिथं सगळ्या भारतातून मुलं येत. शिवाय सिलोनमधून येत, ब्रह्मदेशातून येत. ४२ साली मला पुणं सोडावं लागलं आणि तिथून सांगलीला – विलिंग्डनला आलो. तिथं भेटले प्रा. टी. एम्. जोशी. यांचं जन्माचं ऋण मी लागतो. कोगेकर नावाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कर्वे मधून मधून येऊन जात. प्रि. गोकाक आम्हांला त्या वेळी शेक्स्पीअर शिकवीत. मी जरी अर्थशास्त्राचा विद्यार्थी असलो, तरी त्या काळात आम्हां सर्वांना शेक्स्पीअर शिकावा लागत होता. पी. जी. आणि मी गोकाकांच्या वर्गामध्ये शेक्स्पीअरची व्याख्यानं मन लावून ऐकणारे विद्यार्थी. ते इंग्रजीचे हुशार विद्यार्थी आणि मी– उद्धटपणा समजू नका–अर्थशास्त्राचा चांगला विद्यार्थी. दोघेही ४२ च्या चळवळीमध्ये आकृष्ट झालो. मी लवकर बाहेर पडलो, ते राहिले. ४४ साली मी ग्रॅज्युएट होऊन बाहेर पडलो. पी. जीं. नी कारावास भोगला, मोठा त्याग केला. त्यामुळे ते एक वर्ष उशिरा म्हणजे ४५ साली पदवीधर झाले. मी एम्. ए. साठी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटला गेलो. तिथं पुन्हा असंच. एखाद्याचं भाग्य असतं, त्याप्रमाणं उत्तम शिक्षक भेटले. कोण असावं ? धनंजयराव गाडगीळ. त्यांच्यापेक्षा मोठा माणूस माझ्या दृष्टीनं अलिकडच्या काळात झाला नाही. अतिशयोक्तीनं मी हे बोलत नाही. त्यांची विद्वत्ता, त्यांचं चारित्र्य, वागण्यातला रेखीवपणा, निर्णयातला कणखरपणा आणि समाजहितैषा याला माझ्या दृष्टीनं तोड नाही. मी नंतरच्या आयुष्यात अनेक थोर थोर लोकांना भेटलो; पण मला वाटतं, माझ्या या गुरूला तोड नाही. त्यांच्या मृत्यूनंतर मी एक लेख लिहिलाय्— 'माझ्या गुरूची प्रतिमा' हे त्या लेखाचं शीर्षक. मी त्यात लिहिलंय, की या क्षणापर्यंत मला मधून मधून भीती वाटत आलीय्, की एखादी गोष्ट चुकून केली, चुकीचं बोललो, समाजाचं– किंचित का होईना, माझ्याकडून अहित झालं– तर माझे गुरू काय म्हणतील ? आई–बापाच्या धाकापेक्षा सुद्धा जास्त धाक – मित्र काय म्हणतील; यापेक्षा जास्त धाक गुरू काय म्हणतील, हा असायचा.

एम्. ए. झाल्यानंतर रत्नागिरीस लेक्चररची नोकरी धरली. तिथं पुन्हा

आमचं भाग्य, की उत्तम माणसं सहाध्यापक म्हणून भेटली. विंदा करंदीकर कवी भेटला. त्यावेळी त्याची कविता प्रकाशित झाली नव्हती; फक्त लिहायचा आणि गायचाही. आणि पहिल्या श्रोत्यांत मी होतो. इंग्रजी मीटरच्या पद्धतीनं तो काही प्रयोग करीत होता. प्रयोग ऐकून मी म्हटलं, हे जे काही म्हणतोस, ते वेगळं आहे. अन् ह्याच्यात काव्य आहे. एक वर्षानंतर मुंबईच्या पोदार कॉलेजला गेलो. तेथेही उत्तम सहाध्यापक भेटले. नलिनी पंडित नावाच्या प्राध्यापिका तेथे होत्या. आज महाराष्ट्रात त्यांचा सामाजिक विचारावरचा अधिकार सर्वमान्य आहे. दुसऱ्या मिस् रणदिवे म्हणून होत्या. त्या पुढं केंब्रिजला गेल्या. त्यांच्यासारखी अर्थशास्त्रज्ञ स्त्री तरुण पिढीमध्ये दुसरी नाही. राम जोशी, सदानंद वर्दे, सदानंद वर्टी, स. ह. देशपांडे हे प्राध्यापक मित्र तिथंच मिळाले.

५७ साली मी कोल्हापूरला आलो. तेव्हा माझ्या मुंबईच्या मित्रांनी सांगितलं, की 'तू अंधारात उडी घेत आहेस.' त्यावेळी माझं कोल्हापूरचं कॉमर्स कॉलेज म्हणजे गोठा होता. नुसती एक लांबच्या लांब भिंत पाठीशी, डोक्यावर छप्पर. पुढं काहीच नव्हतं. फक्त खांब तेवढे. त्याच्यातून हे कॉलेज उभं राहू शकलं. कुणा धनिकाचा पैसा नसून माझ्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या फीमधला आणि सरकारनं दिलेल्या थोड्याशा अनुदानातला हा पैसा. आणि बरेचसे माझे अन् माझ्या सहकाऱ्यांचे कष्ट. माझे सहकारी म्हणजे नुसते प्राध्यापकच नव्हेत, तर अगदी शिपायापर्यंत. आय् ॲम प्राउड दॅट् आय् कुड मोबिलाइझ् ऑल !

मुलांसंबंधी सांगायचं, म्हणजे आम्ही प्रयत्नपूर्वक शिकवून विद्यार्थी तयार केले. खास शिकवीत असू त्यांना. कॉलेज वर यायला हवं, कॉलेजला नाव मिळायला हवं, पैसा तर कमी आहे. ही भावना. तेव्हा परीक्षेला पाठविलेले दोन विद्यार्थी पुणे विद्यापीठात बी. कॉम्च्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिले आले. (दोघांचीही नावं मुद्दाम टाळतो. ही दोन्ही मुलं आता मोठ्या अधिकारावर आहेत.) त्यांतला पहिला होता गाबित समाजामधला. कोकणात मासे पकडणारे आणि कापणारे जे लोक असतात, त्यांना गाबित म्हणतात. तो मुलगा प्रि. सी. रा. तावडे यांनी पाठविलेला. अनवाणी. तावडे यांनी एक चिठ्ठी देऊन सांगितलं, "बाळा, याचं काय करतोस, ते बघ." बाबांनी (तावड्यांना आम्ही बाबा म्हणतो) विश्वासानं पाठविलेला मुलगा. मी म्हटलं, "बाबा, हा मुलगा घेतला." होस्टेलमध्ये ठेवला. वर्गात मन लावून ऐकायचा, हॉस्टेलात शांतपणे बसून वाचायचा. वृत्तीनं अत्यंत सालस.

दुसरा धनगर समाजातला मुलगा. (संस्कृतीनं सवाई ब्राह्मण निघाला.) एक दिवस आला, म्हणाला; "सर, काही नाहीय् माझ्याकडं." नुसती पिशवी हातात. अन् नंतर ही परंपराच सुरू झाली. प्रतिकूल आर्थिक व सामाजिक

परिस्थितीतील मुलगे येथे स्कॉलर बनू लागले.

कॉलेजात मी काय करी – सकाळी वर्ग सुरू झाले, की दारात उभाच राही. वर्ग सुरू झाल्यानंतर येणाऱ्या मुलाला विचारी, "आज का उशीर झाला?" पण हे मी विचारू नये, म्हणून मुले वेळेवर हजर राहात.

जूनच्या ७ तारखेला एस्. एस्. सी. चा रिझल्ट लागे. ८–९ तारखेला प्रवेश बंद. १५ किंवा २० तारखेला आधी ठरल्याप्रमाणं कॉलेज सुरू होत असे. त्यानंतर कुणाला प्रवेश नाही. मुलं कमी पडली, तरी चालतील. ऑगस्ट महिन्यामध्ये एक मुलगा आला. अंगावरचे कपडे खूपच भिजलेले. "का आला?" "ॲडमिशन पाहिजे." "संपली. दोन महिन्यांपूर्वी वर्ग सुरू झाले." "पण, सर, जरा ऐकता का?" "काय?" "पंढरपूरला गेलो होतो बैल आणायला." "बैल?" "होय." "मग काय झालं?" "नदीला पूर आला आणि मला बैल घेऊन पलीकडे जाता येईना." "अरे, पण इतके दिवस?" "होय." हा गरीब मुलगा माझा चांगला विद्यार्थी ठरला. तुम्हांला जर मी सगळे प्रसंग सांगेन– मुलांची गरिबी काय असते–तर दिवस जाईल, रात्र जाईल, दुसरा दिवस उजाडेल. तोही दिवस जाईल...

पुण्याला गेलो. तिथं श्रीमंतांचं कॉलेज–वाडिया कॉलेज हे अत्यंत श्रीमंतांचं कॉलेज. पण तिथं पुन्हा हे आहेच. मी जिथं जातो, तिथं गरीब माणसं माझ्या सांगाती. जशी काही मला ती शोधत येतात किंवा मला ती सापडतात. "The poor are always with you", असं काही तरी मी अनुभवतो. जणू काही टेलिकम्युनिकेशनच म्हणा. आमचं कॉलेज जोसात सुरू होतं. त्या कॉलेजातली मुलं देखणी असत. त्यांमध्ये पारशी असत, ॲंग्लोइंडियन असत, वरच्या वर्गातली मुलं असत. तेव्हा पी. टी. कम्पलसरी असे. ती देखणी मुलं कवायत अत्यंत उत्तम करीत. ह्या देखण्या मुलांचा पोशाख उत्तम. पांढरे गंजीफ्रॉक, पॅन्ट, पांढरे मोजे, बूट इत्यादी. इस्त्री पाहिजे; नि असं, नि तसं. इतकं उत्तम, की वर्षातनं दोनदा आम्ही त्याचं डेमॉन्स्ट्रेशन करीत असू. माझा अहंकार काय, तर मुलं उत्तम कवायत करताहेत. हाऊ स्मार्ट! इ. इ. वर्षाच्या शेवटी जेव्हा फॉर्म देण्याची पाळी आली, तेव्हा अनेक मुलांनी पी. टी. केलीच नव्हती, असं आढळून आलं. ती सगळी मुलं हाती लागली. तेव्हा कुणी तरी प्राध्यापक म्हणाले, "सर, पाच रुपये दंड करून सोडून देऊ या." मी म्हटलं, "दंडबिंड करून पी. टी. ची भरपाई होत नाही. दंड आपल्याला अमान्य." ह्या सगळ्या विद्यार्थ्यांना बोलावलं. सगळे आईबापांना घेऊन आले. नंतर माझ्या लक्षात आलं, की ही सगळी मुलं, रेल्वे स्टेशन– (कॉलेजपासून जवळ होतं)– तिथल्या पोर्टरांची किंवा तत्सम लोकांची. मुख्यतः हरिजन. येरवड्याच्या पलीकडेही अशी मोठी

वसाहत होती. तिथं कॅम्प एरियात अनेक श्रीमंतांकडं दाया असतात. त्या दायांची मुलं. श्रीमंतांचे मोटर ड्रायव्हर असतात. त्या ड्रायव्हरांची मुलं. श्रीमंतांचं कॉलेज असलं, तरी गरीब मुलांचा समावेश होता. त्या मुलांनी सांगितलं : "सर, आलो नाही, म्हणजे येण्याची इच्छा नव्हती, असं नव्हे. नियम मोडावा, असं वाटत होतं, असं नव्हे. पण पॅन्ट, बूट यांना एकंदरीत ५० रुपये पडतात." म्हणजे माझंच चुकलं. पण ह्या मुलांचं करायचं काय? माझा असा एक प्रघात आहे, की खोटं काही मी लिहीत नाही. तेव्हा हजेरीचं खोटं सर्टिफिकेट कसं देणार? बरं, या मुलांना परीक्षेला तर पाठवायला हवं. मी कुलगुरूंना स्पष्ट लिहिलं, की ही सगळी मुलं पी. टी. न करणारी आहेत. त्यांचे फॉर्म मी पाठवीत आहे, या या कारणानं; ते स्वीकारावेत. त्या वेळी पाटसकर कुलगुरू होते. त्यांनी ते मानलं.

अडचणींची मला जाणीव आहे, तरीही मला वाटतं, की आयुष्यात ज्यानं त्यानं कष्ट केले पाहिजेत. गरिबांविषयी दया-माया, सगळं आहे. संधी मुद्धा त्यालाच देणार - वाटलं, तर दत्तक घेतो – पण त्यानं कष्ट केले पाहिजेत. त्यात हयगय मात्र नाही. त्याचं कारण आहे. हा नवा विचार मी सांगतो – जगामध्ये विद्या नावाचं जे काय आहे, त्यात आपण मागं राहता नये. विद्येचे स्वतंत्र निकष आहेत. केंब्रिजला अर्थशास्त्र वेगळं, दिल्लीला वेगळं, मुंबईला तिसरं नि माझ्या विद्यापीठात चौथं, असं नाही. त्या विद्येत आपण कोठे आहोत, त्याचा विचार केला आहे का? माझी अशी खात्री आहे, की त्या विद्येसाठी कष्ट करायचे आहेत. आणि विशेषतः हे विद्यापीठ जर गरिबांसाठी आहे – जशी आप्पासाहेबांची प्रेरणा – पी. जी. पाटलांची प्रेरणा – तशी माझीही प्रेरणा आहे – तर हे कष्ट करणं जास्तच आवश्यक आहे. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी-सर्वांनी!

माझी प्रेरणा कशी? मी एका उदारमतवादी अशा परंपरेतून आलोय्. १९४५ साली गोखले इन्स्टिट्यूटमध्ये असताना ध. रा. गाडगीळांनी हृदयनाथ कुंझरूंची ओळख करून दिली आणि भाऊराव पाटलांचीही ओळख करून दिली. कुंझरूंचा उदारमतवाद आणि भाऊरावांचा सामाजिक न्याय माझ्या धारणेचे भाग बनले आहेत; माझ्या अस्तित्वाचाच भाग समजून मी वागत आलोय्. उदार मतवादात सर्व व्यक्ती सारख्या समजल्या जातात, त्यांची स्पर्धा मानली जाते, आणि त्या स्पर्धेतून व्यक्तींची आणि समाजाची कार्यक्षमता वाढते, असे समजतात. त्या स्पर्धेतच न्याय होतो, असेही समजतात. परंतु भारतात या उदारमतवादातील उणीव लक्षात येते ती. म. फुले, राजर्षि शाहू, भाऊराव पाटील आणि आंबेडकर यांच्या लक्षात आली. ती अशी, की जिथं विषमता असते, जिथं जन्मानं जात ठरते, तिथं व्यक्ती सारख्या नाहीत; त्यांच्यांतील स्पर्धेतून न्याय निपजत नाही आणि पुरेशी संधी नसल्यामुळे कार्यक्षमता प्रस्थापित होत नाही. म्हणून खालच्या

समाजाला आणि गोरगरिबांना मदतीचा विशेष हात दिला पाहिजे. ही विचार-सरणी आता उदारमतवादाचा विस्तार बनून राहिली आहे. ध. रा. गाडगीळ यांच्या उदारमतवादात ही मांडणी सापडेल. मला गाडगीळांचा अभिमान वाटतो, तो यासाठी. मी भाऊरावांकडं आलो–गाडगीळांकडून; मी सामाजिक न्यायाकडं आलो–उदारमतवादातून. पण हे लक्षात घ्या, की कष्ट आणि स्पर्धा टाळता नयेत. व्यक्तीच्या आणि समाजाच्या कार्यक्षमतेसाठी, खऱ्या विद्येसाठी कष्ट आणि स्पर्धा आवश्यक आहेत.

गरीब मुलांसाठी उत्तम शिक्षण दिलं पाहिजे. विद्येच्या नावाखाली मी किंमपि काही कमी दिलं, तर ती अविद्या होईल. मुलांची मी फसवणूक केली, असं त्यांना लगेच वाटणार नाही— कालांतरानं वाटेल. त्यांना त्यांच्या घरी कुणी सांगणारा नाही, की तुझे गुरुजी तुला शिकवितात, ते कमी पडतंय्; ते चुकीचं आहे. त्यांचे आईबाप आहेत, पण ते 'केवलं जन्महेतवः' अशा प्रकारचे. प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू ह्यांपैकी प्रत्येक 'स एव पितरस्तासाम्' असे आहेत, म्हणून आम्ही त्यांची काळजी घ्यायची. श्रीमंतांची मुलं असती, तर चांगल्या विद्येच्या शोधात अन्यत्र गेली असती—कदाचित परदेशीही गेली असती. पण या गरीब मुलांना आमच्याकडं येण्यावाचून पर्याय नाही. म्हणून आम्ही जे काही शिकवू ती खरी विद्या असली पाहिजे.

मित्रांनो, पुढच्या पाच–दहा वर्षांमध्ये मुले जर तक्रार करतील : "सर, तुम्ही फसवलंत. तुम्ही स्वतः चांगल्या गुरूकडं शिकलात, गाडगीळांकडं शिकलात. त्यांचं तुम्हांला आयुष्यात काही महत्त्व वाटलं. पण आम्हांला तुम्ही गाडगीळ झाला नाहीत." ही जी गरीब मुलं, त्यांनी आम्हां शिक्षकांवर इतका भार टाकलाय, की रामरक्षेत म्हटल्याप्रमाणं 'नान्यं जाने न जाने न जाने' असे ती आम्हांला म्हणत असतील. "आम्हांला तुम्ही गाडगीळ, तुम्ही रसेल, तुम्ही केन्स, तुम्ही कोण नाही? तुम्ही, सगळे तुम्हीच." असा भरवसा जो माझ्यावर टाकतोय्– माझ्यावर म्हणजे आपल्यापैकी प्रत्येकावर– त्याचा घात माझ्या हातून होऊ नये.

विद्यापीठ– युनिव्हर्सिटी– हा शब्द 'युनिव्हर्स' या शब्दातून निघालेला नाही. मराठीत जे विश्वविद्यालय आहे, त्याचा विश्वाशी काही संबंध नाही. विश्वातलं सगळं ज्ञान इथं मिळतं, असं नाही. ब्रूस ट्रूस्कॉट ह्याचं एक लहानसं पुस्तक आहे— 'फर्स्ट इयर इन् द युनिव्हर्सिटी'. त्यात बरोबर अर्थ सांगितला आहे. मूळ शब्द आहे लॅटिन–'युनिव्हर्सिटास' आणि युनिव्हर्सिटी म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांचं कुटुंब. जर तुम्ही केंब्रिज वगैरेचा इतिहास वाचला असेल, तर प्राध्यापक तशा पद्धतीनं राहात, असं दिसेल. मी कॉमर्स कॉलेजमध्ये प्रवेशदारी

वचन लिहिलं : 'हे कुटुंब आहे, हा लहान समाज आहे.' आता शिवाजी विद्यापीठ या कुलाचा मी गुरू आहे– प्रमुख आहे. ह्या कुलामध्ये आणखी खूप आहेत. जर वर्गवार सांगायचं असेल, तर विद्यार्थी आहेत, प्राध्यापक आहेत, कॉलेजं आहेत. प्रशासन आहे, कर्मचारी आहेत, शिक्षणात रस घेणारी जनतासुद्धा आहे– ज्यांना काही आस्था आहे. हे जर कुटुंब असेल, तर त्याच्यामध्ये न्याय, तौलनिक न्याय, परस्परसंबंध, त्यांच्या श्रेणी या बांधून दिल्या पाहिजेत, असं मी मानतो. कुटुंबातील सर्व घटकांचा तोल ठेवावा लागतो. आणि या गोष्टी पुन्हा कायद्याच्या कक्षेत कराव्या लागतात. कुलगुरू हा काही 'ॲबसोल्यूट मोनार्क' नव्हे. विद्यापीठ कायद्याच्या कलम दहाचं ते अपत्य होय. कुलगुरू सुद्धा बांधलेला असतो. सहानुभूती, दयामाया वगैरे या सगळ्या गोष्टी माझ्यात आहेत, पण त्यामुळंच सगळं कार्य कुणी करू शकणार नाही. तसे करण्याचे अधिकार नसतात. ही गोष्ट मी सांगितली, त्यात कुणाला कठोरपणा वाटला, तर मी असं म्हणेन, की कठोरपणा म्हणजे काय, ते त्यांनी स्वतःशी ताडून पहावं. मी येण्याच्या आधीच माझ्या कडकपणाचा लौकिक इथं पोचलेला दिसतो. म्हणून मी स्पष्टीकरण करतो.

तुम्ही ज्याला कडकपणा म्हणता, त्याबद्दल मी इंग्रजी शब्द वापरतो 'रिगर'. एव्हरी थिंग आय् डू हॅज अ रिगर. आय् हॅव अ रिगर ऑफ माय ओन. फिरायला जातो, त्या अर्ध्या तासामध्ये ही ही कामं झाली पाहिजेत. अमूक भाषणाचे विचार डोक्यात आले पाहिजेत. कुठं पाणी वाहताना दिसलं, तर घरी परतल्यावर मला ऑफिसकडे कळवता आलं पाहिजे. वर्गामध्ये शिकवायचं, तर नोट्स् मनात तयार करता आल्या पाहिजेत. एखादी फाईल आली, तर मी पुन्हा विचारतो, 'हे असं का?' कागद टाईप होऊन टेबलावर आले, तर अक्षरन् अक्षर पुन्हा वाचण्याचा प्रयत्न करतो. हा सर्व 'रिगर' आहे. 'कठोरता', 'कडकपणा' हे मराठी भाषांतर चुकीचं आहे. आय एक्स्पेक्ट सिमिलर रिगर फ्रॉम अदर्स. मी हे काम अंगावर घेतलंय ना? मी आज कुलगुरू आहे. काल प्राचार्य होतो. परवाच्या दिवशी प्राध्यापक होतो. त्याच्या आधी शाळामास्तर होतो. माझे काही मित्र कारकून होते, शिपाई होते. आणखी कोण होते. आम्ही सर्वांनी हे किंवा ते काम अंगावर घेतलंय ना, मग जोपर्यंत ते सोडत नाही, तोपर्यंत त्या कामामध्ये 'रिगर' आली पाहिजे. कुठं ढिलाई आली, की पुढं फालतूपणा येतो. माझी मतं सर्वांना आवडतील, असं नाही. काही वेळा माझी मतं आवडणारही नाहीत. पण प्रत्येकानं माझ्याकडं आपली वेगळी मतं, आपल्या अडचणी सांगाव्यात. कालिदास आठवला. तो राजाचं वर्णन करतो 'अधृष्टश्च अभिगम्यश्च' धारण करायला अवघड वाटतो; पण तो अभिगम्य आहे. मी आश्वासन देतो, मी

अभिगम्य आहे. पण अभिगम्य आहे, याचा अर्थ एकाचं दुसऱ्याबद्दल ऐकेन, असा नाही. त्याचं त्याचं ऐकून घेईन. काय घ्यायला हवं, तेवढंच घेईन.

बरं, मी काही आधीच ठरवलंय् का ? ध्येय-धोरण काही आहे का ? मित्रांनो, ते ध्येयधोरण मी सांगू शकणार नाही. फक्त प्रेरणा सांगितल्या. दृष्टी सांगितली. पुढे ध्येय-धोरण. ते मी एकटा कोण ठरवणार ? कारण विद्यापीठाच्या कायद्यात विविध संस्था आहेत, बॉडीज् आहेत, त्यांनी ते ठरवायचं. फार तर मी त्या बॉडीज्ना म्हणेन, " मी तुम्हांला हे हे सुचवतो. माझं हे माना. " मानायचं, हे एक ठीक आहे. पण तुम्ही मानलं नाही— एखाद्या बॉडीतला ठराव वेगळा झाला— ठीक आहे. धिस इज डिमॉक्रसी. म्हणून् ध्येय-धोरण मी काही आताच ठरवलं नाही. प्रेरणा मात्र पक्क्या आहेत. आणि त्या प्रेरणांमधून काही ध्येय-धोरण आकार घेत असेल, तर त्या अर्थानं ध्येय-धोरण ठरलं, असं समजा. उदाहरणार्थ, शाहू संशोधन मंदिर उभं राहिलं पाहिजे. बहिःस्थ विद्यार्थ्यांशी संबंध जमला पाहिजे, नवे अभ्यासक्रम झाले पाहिजेत, परीक्षा-पद्धती अधिक विश्वासार्ह झाली पाहिजे, आणि शिक्षणाचा दर्जा वाढवीत नेला पाहिजे.

आता कष्ट वगैरेंसंबंधी काही बोलतो. मी शरीरकष्ट वगैरे केले नाहीत. पण कष्टाचं माहात्म्य मला माहीत आहे. मी १९५७ च्या पूर्वी मुंबईस असताना पोदार कॉलेजनं सुट्टीमध्ये श्रमदानाची मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली होती. त्या श्रमदानात मीही सहभागी होतो. कोल्हापूरला आल्यावर ५७ साली इथं भारत सेवक समाजाचा ट्रेझरर म्हणून पंधरा दिवसांचं श्रम शिबिर चिंचणी इथं मी घेतलं होतं. त्यात जवळजवळ ७५ विद्यार्थी होते. त्यांत प्रा. श्रीनिवास दीक्षितही आले होते. मागासलेल्या देशामध्ये श्रमदानावाचून गत्यंतर नाही, विकास होणं शक्य नाही, हे अर्थशास्त्र महाराष्ट्रात मी मांडीत आलो आहे. 'मागास' हा शब्दही मुख्यतः मीच रूढ केला ! माझे चांगले चांगले मित्र, मराठीतले थोर टीकाकार माझ्या त्या शब्दाला हसत. एकानं विचारलं, " तुम्ही 'लेल्यां'ना का टाळता ? " १९५५ च्या मानानं पां. वा. गाडगीळांनी 'लोकमान्य' ह्या दैनिकात माझ्या ह्या विषयावरील कल्पनांचा एका अग्रलेखात विस्तारानं उल्लेख केला होता.

माझी काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांतलं एक असं, की एखादं काम मी हाती घेतलं, की ते करत बसतो. मग त्याला तुम्ही चिकाटी म्हणा, डिटर्मिनेशन म्हणा, रिगर म्हणा किंवा कडकपणाही म्हणा. तुम्ही जे जे चांगलं कराल, त्यात मी बरोबर आहे किंवा पुढंच असेन, असं समजा. प्रौढ शिक्षण प्रसार करणार-मी बरोबर आहे. शिक्षण सुधारणार - मी बरोबर आहे. श्रमदान करणार असलात, तर मी आहे. सेमिनार करणार असाल, तर मी आहे. फिनान्स संभाळायचा, तर

मी लक्ष घालणार. बाग सुधारायची असली, तर मी लक्ष घालणार. गरीब मुलांसाठी पैसे जमा करायचे असतील, तर मी असेन. सहल काढायची असली, तरी मी आहे. सगळीकडं असेन. विशेष म्हणजे विद्येची विद्या म्हणून प्रतिष्ठा ठेवण्यात आणि कुलगुरुपदाची प्रतिष्ठा ठेवण्यात मी पुढं असेन. कुलगुरुपदाची प्रतिष्ठा ही एक स्वतंत्र गोष्ट असून ती तुम्ही महत्त्वाची मानावी. विद्येची प्रतिष्ठा व या स्थानाची प्रतिष्ठा–दोन्हीही ठेवण्याची विलक्षण कोशीस केली पाहिजे.

मला वाटतं, मी खूप वेळ बोललो. आणखी काही बोलता येईल. माझ्यापुढचं काम मोठं आहे. पण ह्या कामानं मी मुळीसुद्धा भांबावलेला नाही. माझ्या कल्पना अत्यंत स्पष्ट आहेत. आणि काम जर मोठं असलं, तर मोठ्या कामामध्ये सहकार्य हे आपोआपच तयार होतं. यू फॉल् इन् लव्ह विथ दीज आयडियल्स्, अँड् दॅट इज् व्हाय् यू एक्स्टेंड युवर सपोर्ट. मोठ्या 'आयडियल' मध्ये सहकार्य असं अंतःस्थच असते. बऱ्याचशा अंशी. म्हणूनच, मी सहकार्य गृहीत धरलेलंच आहे. काम मोठं आहे, या कल्पनेनं विनम्रता मात्र येते.

११
शेषप्रश्न

शिक्षणात क्रांतिकारक बदल करण्याच्या सूचना वारंवार होत असतात. काही बदल झालेही; पण ते यशस्वी झाले, असे म्हणवत नाही. बदल यशस्वी होत नाहीत, त्याचे एक महत्त्वाचे कारण असे, की जी शिक्षणव्यवस्था किंवा शिक्षणयंत्रणा अस्तित्वात आहे, तिच्याकडून हे बदल राबविणे अवघड किंवा अशक्य आहे, आणि ह्या शिक्षणव्यवस्थेस पर्याय तर नसतो. १०+२+३ चा आकृतिबंध हा बदल आणल्यावर कॉलेजांकडेच उच्च माध्यमिक वर्ग द्यावे लागले आणि त्यांना ह्या वर्गांमध्ये अपेक्षित असणारे व्यवसायांचे शिक्षण देता आले नाही. प्रौढ शिक्षणाच्चेही असेच होण्याची शक्यता दिसत आहे. म्हणून असे म्हणता येईल, की शिक्षणात बदल करायचे असले, तर पर्यायी यंत्रणा उभी केली पाहिजे आणि जेथे सध्याचीच यंत्रणा राबवायची असेल, तेथे तिला पेलणारे असेच बदल आणावे. पर्यायी यंत्रणा खर्चाची असते. पर्यायी यंत्रणा बाकीच्या सामाजिक व्यवस्थेशी विसंवादी असण्याची शक्यता असते. पर्यायी यंत्रणा बाकीच्या विद्यार्थ्यांना आकृष्ट करण्याची शक्यता मर्यादित मानावी लागते. पर्यायी यंत्रणा चालविणारी सुयोग्य माणसे पुरेशी मिळतील, असेही नाही. पर्यायी यंत्रणेबाबत ह्या अडचणी किंवा धोके संभवतात. उलटपक्षी, चालू यंत्रणा बदलांसाठी वापरावयाची, तर ते बदल ह्या यंत्रणेला फार मानवतील, असे नाही, हा धोका आहे. ह्या पार्श्वभूमीवर काही प्रश्नांची मांडणी करता येईल.

१

स्वायत्त कॉलेजे ही नवी कल्पना विद्यापीठ शिक्षण आयोगाने (कोठारी कमिशन) सुचविली होती. ह्या कल्पनेप्रमाणे फारशी कॉलेजे स्वायत्त झालेली नाहीत. महाराष्ट्रात अजून हा प्रयोग व्हायचाच आहे. महाराष्ट्रातील दोन विद्या-

पीठे ह्या प्रयोगासाठी उत्सुक आहेत, असे दिसते. जी कॉलेजे अस्तित्वात आहेत, त्यांपैकी काही चांगली कॉलेजे वेचावयाची आणि त्यांना स्वायत्तता द्यावयाची, अशी ही कल्पना आहे. स्वायत्तता मिळाल्यावर ह्या कॉलेजांना शैक्षणिक कार्यक्रमात स्वातंत्र्य मिळेल. सबंध विद्यापीठाचा जो साचा असतो, त्या साच्यातून स्वायत्त कॉलेजे बाहेर पडतील. त्यांना काही नवे-चांगले करता येईल.

भीती अशी, की त्यांतल्या त्यात चांगली कॉलेजे विद्यापीठ-व्यवस्थेतून बाहेर पडल्यावर जी व्यवस्था शिल्लक राहील, ती दुय्यम समजली जाईल. ह्या व्यवस्थेविषयी आज फार आदर नाही आणि जो आहे तोही कमी होईल. त्यात सुधारणा करणे अशक्य होईल. ह्या व्यवस्थेतील कॉलेज कायमचीच निष्प्रभ राहतील.

हा धोका पत्करताना स्वायत्त कॉलेजे मोठ्या प्रमाणावर नवे-चांगले करू शकतील, अशी निश्चिती वाटली पाहिजे. तशी निश्चिती नाही. त्याचे एक कारण असे, की त्यांचा साचा आधीच ठरलेला आहे, त्यांची माणसे तेथे आहेतच आणि त्यांचे आतबाहेर हितसंबंध तयार झाले आहेत. म्हणून त्यांच्याकडून नव्याची निर्मिती होईलच, असे नाही. स्वायत्त कॉलेजे सर्वस्वी नव्याने निघावयाची असली, तर ती निघावी. तेथे सर्व दिशांनी नवीन माणसे जमतील, त्यांचा कार्यक्रम नवा असेल आणि त्यांच्याकडून अपेक्षाही नव्या असतील. 'ज्येष्ठ विद्यापीठां'चीही कल्पना शिक्षण आयोगाने मांडली होती. तीही विद्यापीठे अशी नव्याने निघाली तरच हवी आहेत.

२

पदव्युत्तर शिक्षण केंद्रे प्रभावी असली पाहिजेत. ती विद्यापीठात असोत किंवा कॉलेजात असोत. आज असे दिसते, की विद्यापीठाची केंद्रे अपेक्षेइतकी प्रभावी आहेत असे नाही आणि कॉलेजातील केंद्रे त्यांपेक्षाही क्षीण आहेत. पदव्युत्तर केंद्रांच्या दर्ज्याची काळजी घ्यावी, अशा सूचना विद्यापीठ अनुदान मंडळाकडून वारंवार येतात आणि तरीही फारशी सुधारणा होत नाही. नवी केंद्रे काढणे अणि जुनी सुधारणे ह्याविषयी गांभीर्याने विचार करायला हवा. नवी केंद्रे काढण्याआधी जुन्यांचा अधिक विचार करणे जरुरीचे आहे.

कॉलेजमधील पदव्युत्तर केंद्र ही जशी काही कॉलेजची वाढ समजली जाते. ही कॉलेजच्या प्रतिष्ठेची बाब समजली जाते. हे योग्य नाही. पदवीपर्यंतचे कॉलेज हे शिक्षण-प्रसाराचे साधन आहे. काही उणिवा असताही कॉलेज सुरू असते. शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष नसते, असे नाही; तरीही शिक्षणप्रसाराकडे-शिक्षणाच्या संधीकडे लक्ष असते. पदव्युत्तर शिक्षणाची दृष्टी वेगळी असायला हवी. आयुष्यात किमान संधी मिळायला पदवीपर्यंतचे शिक्षण आवश्यक असले, तरी

पदव्युत्तर शिक्षण ही काहींसाठी खास बाब असते. ज्यांना विशेषज्ञ व्हावयाचे आणि ज्यांना अध्यापक व्हावयाचे, त्यांच्यासाठी पदव्युत्तर शिक्षण आहे. इतरांना नोकरीत घेताना बी.ए. आणि एम्.ए. ह्यांपैकी एम्.ए. ला नेमले जाते, असे नाही. विशेषज्ञ आणि अध्यापक समाजात फार लागतात, असे नाही. जे थोडे विशेषज्ञ आणि अध्यापक असतात, ते मात्र खरोखरच त्यांच्या त्यांच्या विषयात चांगले माहीतगार असले पाहिजेत आणि त्यांना वेगळी दृष्टी प्राप्त झाली पाहिजे. ह्या माहितीमुळे आणि दृष्टीमुळे एम्. ए. झालेला माणूस बी. ए. झालेल्या माणसापासून वेगळा उठून दिसायला हवा.

पदव्युत्तर केंद्रात खऱ्या अर्थाने तज्ज्ञ प्राध्यापक आढळले पाहिजेत आणि तेथले ग्रंथालय उत्तमांतल्या उत्तम ग्रंथांनी समृद्ध असले पाहिजे. तेथे प्राध्यापकांस आणि विद्यार्थ्यांस एकत्रित बसून चर्चा करता आल्या पाहिजेत आणि पुस्तके पाहता आली पाहिजेत. तेथे प्राध्यापकांस आणि विद्यार्थ्यांस एकत्र काम हाती घेता आले पाहिजे. तेथे अनेक ठिकाणांहून येणारे विद्यार्थी भेटले पाहिजेत. तेथे विद्यार्थ्याला पुढच्या आयुष्याची स्थूल आखणी करता आली पाहिजे. विद्यापीठामध्ये ह्या सोयी करता येणे शक्य असते, त्यामुळे पदव्युत्तर शिक्षणाची केंद्रे विद्यापीठात असणे साहजिक आहे. कॉलेजात ही केंद्रे असावयाची, तर अशी कॉलेजे हाताच्या बोटांवर मोजता येण्याएवढीच असणार.

पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा कमी झाला, तर शिक्षणक्षेत्रासकट सर्व समाजाची हानी होते. पदव्युत्तर शिक्षण घेतलेला शिक्षक आपल्या विषयात सामान्य राहिला, तर शाळा–कॉलेजचे शिक्षण खालावते. जे शिक्षण पसरवायचे आहे, तेच कमदर्ज्याचे राहते. हा समाजावर अन्याय होतो. ज्या विशेषतेवर शासन चालते, ती सामान्य राहिली, तर समाज विकास पावणे आणि कार्यक्षमतेने जगाच्या स्पर्धेत टिकणे अवघड बनते.

पदव्युत्तर वर्गांना विद्यार्थी खूप येतात हे बऱ्याचे लक्षण असेलच, असे मानता येत नाही. खालच्या शिक्षणात फारसे हाती लागले नाही, म्हणून पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यार्थी जाण्याची शक्यता आहे. खालचे शिक्षण दुर्बल राहिल्याची ही साक्ष आहे. दुसरे काही करायला नाही, म्हणूनही विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणाला जाण्याची शक्यता आहे. हे बेकारीचे लक्षण आहे. पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी चालेल, पण जे विद्यार्थी हे शिक्षण घेतील, त्यांना ज्ञानाची कल्पना आली पाहिजे. निदान त्यांची एकंदर ज्ञानाबद्दल आणि स्वतःच्या ज्ञानाबद्दल खोटी कल्पना होता कामा नये. अशी खोटी कल्पना झाली, तर त्या वंचनेला तोड नाही. उलट, येथेही काहीच हाती लागले नाही अशी विद्यार्थ्याची भावना झाली, तर त्याला शिक्षणाविषयी अनादर वाटेल.

३

संशोधन कॉलेजांमध्ये होत नसते. विद्यापीठांत ते थोडेसे होत असते. जे संशोधन होते, ते मुख्यतः पीएच्.डी. पदवीसाठी असते. ते फार वरच्या दर्ज्याचे असते, असे नाही. पीएच् डी. झाल्यावर विद्यार्थ्याचा किंवा अध्यापकाचा संशोधन कार्यातला रस संपलेला असतो. पी.एच्डी. झाल्यावर किंवा पीएच्.डी.शी संबंधित नाही, असे संशोधन अगदीच थोडे आहे. त्यामुळे काही पुस्तके वाचून तीच दरवर्षी शिकविण्याचा शिक्षकांचा नीरस धंदा चालू असतो. त्याचा प्रत्यक्षाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न होत नाही. त्यातले खरेखोटे ठरत नाही. समाजातले प्रश्न सुटण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संशोधनातून हातभार लागत नाही. भोवताल आणि अध्यापन यांचा दुवा जुळत नाही. कॉलेजांमधल्या नव्या प्राध्यापकांना एम्. फिल्.ची पदवी घ्यावी लागेल. ह्या पदवीसाठी संशोधन पद्धतीचे शिक्षण त्यांना घ्यावे लागेल आणि लहानसा प्रबंधही तयार करावा लागेल. पुढे काय, असा प्रश्न राहीलच. पीएच्.डी. नंतर काही संशोधन नाही, तसेच एम्. फिल्. नंतर काही नाही, असे होण्याची शक्यता दिसते. कॉलेजातल्या आणि विद्यापीठातल्या प्राध्यापकांकडून संशोधन झाले पाहिजे आणि ते त्यांच्या त्यांच्या अध्यापनविषयाला किंवा समाजाला उपयोगी झाले पाहिजे. विद्यापीठाच्या गावी आणि जवळपास अनेक लहान लहान धंदे असून त्यांच्या लहान लहान प्रश्नांची सोडवणूक विद्यापीठात व्हावयास हरकत नाही. एक उदाहरण द्यावयाचे, तर चांदीचे दागिने करण्याच्या धंद्यात दागिन्यांना पॉलिश करण्यासाठी जे द्रव्य वापरतात, ते विषारी असते. त्याऐवजी दुसरे द्रव्य शोधून काढले पाहिजे. साखरनिर्मितीतले मोठे प्रश्न कानपूर येथील संस्थेत सोडविता येतील, पण काही स्थानिक स्वरूपाचे प्रश्न कॉलेजात किंवा विद्यापीठात संशोधनाने सोडविता येतील. भोवतालच्या प्रदेशातील बारीकसारीक आर्थिक क्रिया–प्रक्रियांचा अभ्यास करणे शक्य आहे. दीपकलाल नावाच्या गृहस्थाने अहमदनगरमधील विहिरींचा खर्च आणि पिकांचा खर्च याबद्दल अतिशय चांगला अभ्यास केला आणि त्याने 'वेल्स् ॲन्ड वेलफेअर' हे पुस्तक (येथे ए. सी. पिगू ह्यांच्या 'वेल्थ ॲंड वेलफेअर' ह्या ग्रंथाची आठवण होते) ओ. इ. इ. सी. ह्या ख्यातनाम संस्थेने प्रसिद्ध केले आहे. ॲन्थनी कार्टर ('द एलिट पॉलिटिक्स् इन रूरल इंडिया'), मेरी कॅरस ('द डायनामिक्स ऑफ इंडियन पोलिटिकल फॅक्शन्स्') आणि गेल ऑमवेद ('कल्चरल रिवोल्ट इन कलोनिअल सोसायटी') ह्या परदेशी लोकांनी अलिकडच्या काळात पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे अभ्यास केले. हे अभ्यास आमच्या विद्यापीठांमधून का होऊ नयेत ?

जे पीएच्.डी.चे आणि इतर संशोधन होते आहे, त्यातही संयोजनाची जरूरी

आहे. काही विषयांवर नको तितके संशोधन होते आहे आणि काही विषय ताटकळत उभे आहेत. नको तितक्या संशोधनाची उदाहरणे हवी तितकी सापडतात, पण ती सांगणे फार अप्रिय होते म्हणून येथे उदाहरणे टाळतो. अशा संशोधनात द्विरुक्ती होते आहे. एकाच विषयावर दोन प्रबंध झाल्यामुळे हे प्रकरण कोर्टात गेल्याचे मी पाहिले आहे. ताटकळत राहिलेल्या विषयांची यादी मारुतीच्या शेपटासारखी वाढते. प्रत्येक विद्यापीठात संशोधनाचे विषय निवडण्याबद्दल जे स्वातंत्र्य आहे, ते अराजकाच्या स्वरूपाचे आहे. संशोधनाच्या विषयात काही सुसूत्रता आणता येईल आणि संशोधन समाजदृष्ट्या अधिक फलदायी करता येईल. त्यात अनेक शास्त्रांची दृष्टी एकत्रित करता आल्यास प्रश्नांचा किंवा अभ्यास-विषयांचा अधिक चांगला बोध होईल. म्हणून संशोधनाचे विषय देणाऱ्या प्राध्यापकांनी आपल्या स्वातंत्र्याला मुरड कशी घालावी, ते ठरवून टाकावे.

स्वतंत्र संशोधनसंस्था वाढत आहेत हे योग्य होय. परंतु विद्यापीठांनी संशोधन त्यांच्याकडे सोपवून आपण केवळ चाकोरीतले अध्यापन आणि पीएच्.डी. चे संशोधन करीत स्वस्थ बसावे, हे इष्ट नाही. अशी श्रमविभागणी नाही. स्वतंत्र संशोधन संस्था आणि विद्यापीठे ह्यांनी एकमेकांना पूरक व्हावे. साहाय्यभूत व्हावे, अशी अपेक्षा आहे. विद्यापीठातले संशोधन वाढले नाही, तर विद्यापीठांची अवस्था महागडी कॉलेजे एवढीच राहील.

४

कॉलेजांची संख्या वाढते आहे. खेड्यापाड्यांत कॉलेजे झाली आहेत, आणि खालच्या आर्थिक सामाजिक स्तरातली मुले कॉलेजांत आली आहेत, त्याचा आनंद वाटतो. "कालचा पाऊस आमच्या गावी आलाच नाही" असे कोणी म्हणू शकणार नाही. जुन्या परंपरेने आणि नंतर शासकीय विद्यापीठीय धोरणामुळे जी विद्या ठरावीक वर्णांमध्ये आणि शहरांमध्ये बंदिस्त राहिली होती, ती आता मुक्त झाली आहे. साचलेल्या पाण्यासारखी विद्या साचून राहता नये, ती नदीसारखी कालव्याकालव्यांनी शेतात पसरावी. त्यात विद्येचे यश आहे आणि समाजाचा फायदा आहे. परंतु या पुढील मुख्य प्रश्न शिक्षणप्रसाराचा नाही. प्रश्न आहेत, ते शिक्षण-प्रसारामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीबद्दल.

शिक्षण-प्रसारामुळे शिक्षणाचा कस खालावला काय? होय, असे उत्तर असले, तर कारणे अशी : शिक्षकांची संख्या वाढल्यामुळे कमदर्ज्याचे शिक्षक घ्यावे लागले, साधनसामग्री कमी पडली, विद्यापीठाकडून-शासनाकडून जे नियमन व्हावयाचे, ते मोठ्या प्रमाणामुळे अवघड झाले. वाढत्या स्पर्धेमुळे झटपट यशाकडे लक्ष असते. ही कारणे खरी आहेत. पण प्रत्येकावर इलाज आहे. आणखी एक

कारण आहे आणि त्याचा स्वतंत्र उल्लेख करावयास हवा. ते असे, की जो नवा वर्ग कॉलेजांमध्ये आला आहे, त्याच्याबद्दल दोन गोष्टी आहेत. एक तर त्याच्याविषयी असे गृहीत धरले जाते, की त्याला दर्जेदार विद्या पेलणार नाही. शिक्षण हलके केले पाहिजे. हे गृहीत–कृत्य तपासून पाहिले पाहिजे. आजच्या शिक्षणात न पेलण्यासारखे काय आहे ? आणि नव्या वर्गांना-वर्णांना ते शिक्षण न पेलण्याइतके दुर्बल मानावयास पुरावा काय आहे ? दुसरे असे, की ह्या नव्या वर्गांना–वर्णांना आजचे ज्ञान काही बाबतींत त्याच्या अनुभवास आलेले नाही किंवा येत नाही. त्यांना ते अर्थपूर्ण वाटत नाही किंवा उपयोगी वाटत नाही. हा दोष त्या ज्ञानाचा नव्हे किंवा ह्या नव्या वर्गांचा–वर्णांचा नव्हे. हा प्रश्न केवळ आमच्यासारख्या मागास देशांचाच नसून पुढारलेल्या देशांतही आहे. तेथे असे म्हटले जाते, की न्यूमन (कार्डिनल न्यूमन) पेक्षा आता न्यू मॅन (नवा माणूस) विचारात घ्यावयास हवा. त्याच्यासाठी नवे विषय आणावयास हवे. त्याचे काही नवे प्रश्न आहेत. मागास देशाच्या संदर्भात वरील कल्पनेस आणखी खूप अर्थ आहे.

अमूक वर्ग–वर्ण कमी पडले, असे नसून सरसहा सर्वांच्या बाबतीत दर्जा घसरलेला दिसतो. आणि घसरगुंडी सतत चालू आहे. समाजातच अशा प्रवृत्ती आहेत, की ज्यांच्यामुळे ही घसरगुंडी चालू आहे. विद्येबरोबर अविद्या जोसात फोफावते आहे, आणि त्यांच्यांतला भेद फारसा मानला जात नाही. शेतीबरोबर गाजर गवत वाढते आहे ते लोकांस कळते; पण अविद्येची वाढ कळत नाही, ही समाजातली अवस्था शोचनीय होय. हा गाफीलपणाचा प्रकार असावा :

" अवडंबरली ढगे कितीतरि
रवि किरणांचा चूर होतसे
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे !
गाफीलगिरी तरिही जगावरि ! "

लगेच काळजी घेतली नाही, उपाय योजना केली नाही, तर ह्या समाजाचे मोठे नुकसान आहे. जगाच्या स्पर्धेत हा समाज कसा काय टिकणार आणि प्रगती करणार ?

सर्व समाजाचा विचार सर्वांनाच सुचतो असे नाही. सबंध समाजाचे काय होते, ते त्यांना दूरकाळात दिसते, नजीकच्या काळात नाही. जेव्हा दिसते, तेव्हा त्याची जबाबदारी एका वर्गाला दुसऱ्या वर्गावर ढकलता येते. म्हणून मुद्दामच नव्या वर्गांच्या–वर्णांच्या दृष्टीने आजच बोलावयास हवे आहे. हे वर्ण नव्याने शिकत आहेत. त्यांना जेवढे शाळा-कॉलेजात शिकविले जाते, तेवढेच त्यांचे

शिक्षण, असे समजावयास हरकत नाही. त्यांना शिक्षणाचे दुसरे मार्ग उपलब्ध नाहीत. म्हणूनच शाळा-कॉलेजांनी आपली जबाबदारी वाढल्याचे मानले पाहिजे. ह्या वर्गांच्या-वर्णांच्या बाबतीत जी पारंपरिक आणि अवास्तव साशंकता आहे, ती दूर व्हावी, ह्यासाठी ह्या संस्थांनी त्यांची तयारी अधिकच करून घेतली पाहिजे. त्याना असे वाटता कामा नये, की आपण क्यूमध्ये पुढे सरकत सरकत आलो असताना वाटप करणाऱ्यांनी हात आखडता घेतला किंवा वाटपाच्या वस्तूंत भेसळ केली. त्यांना वंचना झाल्याचे आढळले, तर ती ज्ञानाची अवज्ञा होय आणि ह्या वंचनेतून उद्‌भवणारा सामाजिक असंतोष हा धोक्याचा ठरेल. लगेच नाही, काही काळाने. पण तो काळ सुज्ञांनी आताच पाहिला पाहिजे आणि तो न उजाडण्याच्या व्यवस्थेला लागले पाहिजे.

ज्ञानेश्वरांनी त्यांच्या काव्याच्या आणि अध्यात्म ज्ञानाच्या बाबतीत त्यांच्या समोरच्या मुमुक्षूंना उद्देशून म्हटले, " अमृतातें हीं पैजेंसीं जींके, ऐसीं अक्षरेंचि रसिकें मेळवीन. " नव्या युगातल्या ज्ञानेश्वरांनी सर्व ज्ञानशाखांच्या बाबतीत आणि सर्व ज्ञानपिपासूंच्या बाबतीत ही प्रतिज्ञा केली पाहिजे.

५

ज्या विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान नको आहे आणि व्यवसायशिक्षण हवे आहे, त्यांची विद्यापीठाच्या स्तरावर मोठ्या प्रमाणात सोय करून दिली पाहिजे. आजच्या शिक्षण-व्यवस्थेत ह्या प्रकारचा विद्यार्थी समाधानी नाही आणि त्याचे लक्ष नसल्यामुळे आजच्या शिक्षणक्रमाचा दर्जा आणि शिस्त ठेवणे अवघड होते. म्हणजे विद्यार्थ्यांच्या व्यवसायशिक्षणाच्या न्याय्य आकांक्षेसाठी आणि इतर शिक्षणाच्या गुणवत्तेसाठीही व्यवसायशिक्षणाची सोय झाली पाहिजे.

पॉलिटेक्निक आणि आय्. टी. आय्. मध्ये शासनाने ही सोय केलेली असते. ती वाढली पाहिजे आणि त्यात विविधता आली पाहिजे. त्यानंतरही एक उणीव राहते. ती म्हणजे विद्यार्थ्यांस विद्यापीठाशी संबंध हवा असतो. निदान विद्यापीठाच्या नावाचा संबंध हवा असतो. म्हणून विद्यापीठांनी अशा सोयींच्या बाबतीत लक्ष देऊन व्यवसायशिक्षणाचे डिप्लोमा आणि सर्टिफिकिटे द्यावयास हवी. विद्यापीठास विविध अभ्यासक्रम काढणे शक्य होत नाही. म्हणून खाजगी संस्थांनी हे अभ्यासक्रम काढावे. अशा संस्थांना विद्यापीठांनी काही अटींवर मान्यता द्यावी आणि परीक्षा घ्याव्या. हा एक नवा प्रयोग होईल. खर्चाची जबाबदारी विद्यापीठांनी घेऊ नये. विद्यार्थी, शासन आणि धनिक यांनी ती घ्यावी. विद्यापीठाच्या कायद्यात संस्थांना ' मान्यता ' असे एक कलम आहे. त्या कलमाप्रमाणे आतापर्यंत फक्त पदव्युत्तर संस्थांना मान्यता दिली जाते. त्याबरोबर वरील

प्रकारच्या संस्थांनही मान्यता द्यावी.

एक वर्षापासून तीन वर्षांपर्यन्तच्या मुदतीचे विविध अभ्यासक्रम निघू शकतील. त्या त्या ठिकाणच्या गरजेप्रमाणे, साधन–उपलब्धतेप्रमाणे आणि लोकांच्या उपक्रमशीलतेप्रमाणे अनंत अभ्यासक्रमांची शक्यता संभवते. डेअरी फार्मिंग, टेक्स्टाईल मॅनेजमेंट, सॉईल टेस्टिंग, नर्सिंग, आर्किटेक्चर, मायक्रो-बायालॉजी, सिव्हिल इंजीनियरिंग वगैरे अभ्यासक्रम निघू शकतील. ज्याच्यातून आर्थिक विकास होईल आणि पोटापाण्याचे काम मिळेल, असे हे अभ्यासक्रम असले पाहिजेत. त्यांच्या जोडीला आयू. ए. एस्. (प्रिलिमिनरी परीक्षा), चित्रकला, संगीत. गृहशास्त्र इ. विषय देता येतील.

अशा काही विषयांच्या संस्था चालू आहेत आणि त्यांची कामे वाखाणण्या-सारखी आहेत. त्यांना मान्यता देणे हे विद्यापीठाचे काम आहे. मान्यतेच्या अटींत ह्या संस्थांचा दर्जा वाढविता येईल. विद्यापीठाच्या अपेक्षित कार्याचे विकें-द्रीकरण केल्यासारखेही होईल. खाजगी क्षेत्रातील कार्यशीलता वाढीस लावल्या-सारखे होईल आणि लोकशाहीत आणि विशेषतः शैक्षणिक प्रयोगांसाठी ह्या कार्यशीलतेची जरुरी आहे. खाजगी क्षेत्रामध्ये समाजाची स्पंदने, समाजातील बदल आणि समाजातील गरजा अधिक लवकर नोंदल्या जातात, ही गोष्टही लक्षात घेणे जरुरीचे आहे. शासनाकडून केली जाणारी 'पाहणी' आणि 'मॅन पॉवर प्लनिंग' इ. बरोबर ह्याही गोष्टींची अतिशय गरज आहे.

येथे शिक्षणाच्या उद्दिष्टाचा प्रश्न संभवतो. हे असले शिक्षण क्राफ्ट (कौशल्य) च्या स्वरूपाचे आहे. ते 'ट्रेनिंग' आहे, 'एज्युकेशन' नव्हे. आतापर्यन्त 'क्राफ्ट' ही शिक्षणाच्या बाहेर ठेवली आहे. शासनातसुद्धा 'एज्यु-केशन' आणि 'टेक्निकल एज्युकेशन' अशी वेगळी खाती पडतात. एकाने दुसऱ्यात पडायचे नाही, असा खाक्या असतो. कोठारी कमिशनने शिक्षण हे राष्ट्रीय विकासाचे साधन ठरविले होते, हे जर लक्षात घेतले, तर 'क्राफ्ट' आणि 'ट्रेनिंग' एज्युकेशनमध्ये जरूर घ्यावयास हवी. त्यासाठी आतापर्यन्तची शिक्षणाची कल्पना बरीचशी उच्चवर्णीय आहे, ती अशी बदलावी लागेल. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजात ह्या 'क्राफ्ट' ची आणि 'ट्रेनिंगची' फार जरुरी आहे. किंबहुना, मागास समाजातील एक विषमतोल दुरुस्त करण्यासाठी त्याची जरुरी आहे. त्या विषमतोलाची उदाहरणे देऊन तो स्पष्ट करता येईल. ह्या समाजात पदवीधर इंजीनियर असतो आणि त्याच्या हाताखाली काम करायला पुरेसे प्रशिक्षित सुपरवायझर नसतात किंवा येथे पदवीधर डॉक्टर असतो पण त्याच्या कामाची पूर्ती करावयास नर्सं नसतात. इंजीनियरचे किंवा डॉक्टरचे काम अर्धे राहते. किंवा तेच कनिष्ठ स्तरावरची कामे करताना आपला वेळ वाया घालवतात.

म्हणून हा विषमतोल दुरुस्त करण्यासाठी मधल्या किंवा खालच्या स्तरावरील शिक्षणाची सोय विद्यापीठांनी केली पाहिजे.

६

विद्यापीठाची स्वायत्तता असा एक मोठा प्रश्न सांगितला जातो. ही स्वायत्तता आज अस्तित्वात नाही, असे सुचविले जाते. खरे पाहता स्वायत्तता अस्तित्वात आहे आणि तिच्यावर मर्यादा आहेत. जेथे स्वायत्तता नाही, असेहीं क्षेत्र आहे. विद्यापीठात पैसा वापरताना आणि जागा भरताना स्वायत्तता राहिली नाही. विद्यापीठे खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी शासनावर अवलंबून असल्यामुळे ह्या पैशाबरोबर खर्चावर बंधने आली आहेत. जागा भरताना, पदोन्नती देताना विद्यापीठांनी पूर्वी औदार्य दाखविल्यामुळेही ही बंधने आली. आजही असे दिसते, की ह्या औदार्याची जे अपेक्षा करतात, तेच विद्यापीठाच्या स्वायत्ततेची उच्चै; भलावणी करतात. नियोजनाच्या जमान्यात विद्यापीठांची आर्थिक स्वायत्तता मागण्यात अर्थ नाही, हे ओळखले पाहिजे. वेतनश्रेणी आणि सेवानियम ठरविण्यातही स्वायत्तता टिकविणे शक्य नाही. कारण सर्वच सरकारी आणि निमसरकारी क्षेत्रांत ह्या बाबतीत सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न राहणे साहजिक आहे.

शैक्षणिक स्वायत्तता आहे. अभ्यासक्रम कोणते असावे, हे संपूर्णपणे विद्यापीठे ठरवितात. शासनाकडून अमूक विषय ठेवावा अशा सूचना येतात, पण होय किंवा नाही म्हणणे संपूर्णपणे विद्यापीठांच्या हाती आहे. प्रश्न उद्भवतो, तो पुढे विद्यापीठांनी अभ्यासक्रम ठरविल्यावर. त्यातील नवे विषय शिकविण्यास घेताना कॉलेजांचा शिक्षकांवरील खर्च वाढत असेल, तर तो सर्व खर्च शासनाकडून घ्यावयाचा असल्यामुळे शासनाची त्या बाबतीत परवानगी लागते. हे योग्य आहे काय? होय म्हणता येत नाही; पण नाहीही म्हणता येत नाही. कारण हे सर्वच विषय समाजाला लगेच आवश्यक आहेत, असे ठामपणे सांगता येत नाही. खर्चाची जबाबदारी कॉलेजांवर नसल्यामुळे कमी सामाजिक अग्रक्रमाचे विषय निवडले जाण्याची शक्यता असते.

शैक्षणिक स्वायत्ततेच्या बाबतीत आणि आर्थिक नियंत्रणांच्या बाबतीत विद्यापीठांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. एखादा समाजाला आवश्यक असणारा विषय सरकारच्या नकाराला बळी जाण्याची शक्यता आहे. नेमणुकांच्या बाबतीत शासन मूठ फार घट्ट ठेवण्याची शक्यता अनुभवाला येते. ह्या दोन्ही बाबतींत शासनातील अधिकाऱ्यांचा निर्णय विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या निर्णयापेक्षा नेहमीच अधिक अचूक असेल असे म्हणवत नाही. शासनाच्या निर्णयात जो वेळ जातो, तोही विचारात घेतला पाहिजे. शासनाचे अधिकारी आणि विद्यापीठाचे

अधिकारी यांच्यांत विश्वासाचे वातावरण आणि सामंजस्य नसले, तर नजीकच्या काळात विद्यापीठांना मोठ्या कामाच्या अडचणींना तोंड द्यावे लागेल. ही परिस्थिती टाळावी.

७

विद्यापीठ–शिक्षणाची आणि विद्यापीठाची विश्वासार्हता वाढविणे, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. इतकी महत्त्वाची, की तुलनेने इतर गोष्टी कमी महत्त्वाच्या वाटतात. विश्वासार्हता वाढली नाही, तर अनेक सुधारणा पुष्कळ अंशी वायां जाणार आहेत. काहींचा थोडासा उपयोग विश्वासार्हता वाढविण्यास होईल. उदा., शिक्षण चांगले झाले, उपयोगी संशोधन झाले, तर शिक्षण आणि विद्यापीठ 'वर्थव्हाईल' वाटतील. परंतु विश्वासार्हता वाढण्यासाठी काही लहान–मोठ्या गोष्टी कराव्या लागतील. काही प्राथमिक वाटतील, तरी त्या महत्त्वाच्या आहेत. परीक्षा वेळेवर आणि व्यवस्थित पार पाडणे, परीक्षांचे निकाल संशयातीत असणे आणि वेळेवर जाहीर करणे हे किती महत्त्वाचे आहे ! जेथे ते जमले नाही, तेथील अनुभवाने हे कळले असेल. हे घडले नाही, तर सर्व पालकांची आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांची नाराजी आणि तिरस्कार विद्यापीठांना फार बाधक ठरतो. पुढच्या वर्षी वेळेवर कॉलेजे सुरू झाली नाहीत, त्या त्या विषयांचे पुरे माप विद्यार्थ्यांच्या पदरात पडले नाही, तर शिक्षक आणि विद्यार्थी पुन्हा 'डिमॉरलायज्' होतात. एकंदर नियमनाबद्दल, शिस्तीबद्दल बेदरकार बनतात. चुकार शिक्षक, चुकार विद्यार्थी आणि चुकार प्रशासक यांचे फावते. मोठ्या ठिकाणी विद्यार्थी नसलेले गुंड सुद्धा शिथिलतेचा फायदा उठवतात. ते कॉलेजच्या इमारतींचा सुखेनैव वापर करतात ! हे सगळेच भयानक आहे.

दररोजच्या व्यवस्थापनात आणि वागण्यात शिस्त आणि प्रतिष्ठा ठेवली पाहिजे. वैयक्तिक उचापती आणि वृत्तपत्रांतील आरोप इत्यादी गोष्टींमुळेही शैक्षणिक संस्थांबद्दल आदर वाटेनासा होतो. ह्या परिस्थितीत शिक्षण-संस्थांतील संबंधित जबाबदार असतात; त्याचप्रमाणे वृत्तपत्रेही अप्रत्यक्षरीत्या जबाबदार ठरतात. वृत्तपत्रांची जबाबदारी अशी, की त्यांच्याकडे आलेल्या लिखाणातील किंवा बातम्यांतील तथ्य त्यांनी चौकशी करून पारखून घ्यावे आणि पारखल्यावरसुद्धा शिक्षण–संस्थेच्या प्रतिमेची हानी झाल्यामुळे जो समाजावर परिणाम होतो त्याचाही विचार करावा. शिक्षण-संस्थांची प्रतिमा चांगली ठेवणे हे त्या संस्थांचे कार्य आहे, तरी काही अंशी ही जबाबदारी टीकाकारांनीही घ्यावी. वाईटास वाईट म्हणावे त्यापेक्षा अधिक अंशांनी चांगल्यास चांगले म्हणावे. आजचा 'क्रायसिस्' एवढा मोठा आहे, की त्यात ही सबुरी किंवा संयम राखणे अतिशय जरुरीचे

झाले आहे.

विद्यापीठातील संबंधितांना संयमाबद्दल किती म्हणून सांगावे ? विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांनी टीका, निदर्शने, 'नियमाप्रमाणे काम' मोर्चे, संप इत्यादींचा अधिक संयमाने आणि विवेकाने वापर करावा. त्यात त्यांचे हित असून विद्यावर्धनाचे आणि समाजाचे हित आहे, असे मला मनोमन वाटते. हा माझा विचार अप्रिय वाटला, तरी मला सांगितले पाहिजे, की आज कॉलेजांची आणि विद्यापीटांची जी अवस्था आहे, ती बदलण्यासाठी ह्या मार्गांऐवजी दुसऱ्या मार्गांचा अवलंब करावयास हवा. विद्यापीठे विग्रहाच्या बाहेर ठेवली पाहिजेत. देशभर टीकेचे आणि संपांचे पेव फुटले आहे, त्यातून शिक्षणसंस्थांनी प्रयत्नपूर्वक बाहेर राहिले पाहिजे. शिक्षणसंस्थांतील वरपासून खालपर्यंतचे लहानमोठे कार्यकर्ते इतर क्षेत्रांतील कार्यकर्त्यांपेक्षा ह्या बाबतीत वेगळे राहिले पाहिजेत. 'विश्व झालिया वन्ही, संतमुखें व्हावें पाणी,' ह्यातील संताची भूमिका ही काही व्यक्तींची असते, तशी ती समूहाची असली पाहिजे. तो समूह जास्तींत जास्त शिक्षणक्षेत्रातच असण्याची अपेक्षा आहे. जास्तींत जास्त सामंजस्य ह्या क्षेत्रात असण्याची अपेक्षा आहे. ही भूमिका एकदा सोडली, की शिक्षणक्षेत्राच्या सुधारणेची आशा सोडलेलीच बरी. हे पक्के समजावे, की अशांततेत शिक्षण होणे नाही.

REFBK-0023070